सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# अवकाशकन्येची घरवापसी!

**विशेष प्रतिनिधी**

**गेल्या नऊ महिने तेरा दिवसांपासून अंतराळ स्थानकावर अडकून पडलेल्या भारतीय वंशाच्या अंतराळवीर सुनीता विलियम्स अखेर पृथ्वीवर सुखरूप परतल्या. त्यांच्या चेहर्यावरील गोड हास्यात ९ महिन्यांच्या संयम दिसून आला. आपल्या आयुष्यातील त्यांचे हे तिसरे आणि सर्वात कठीण असे अंतराळ वास्तव्य होते. आतापर्यंत त्यांनी अंतराळात ६०८ दिवस वास्तव्य केले आहे. हा तिसर्‍या क्रमांकाचा जागतिक विक्रम आहे. ही मोहिम फस्ते करून आलेल्या अमेरिकन अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विलमोर यांचा एकप्रकारे हा पुनर्जन्म झाला असेच म्हणावे लागेल. भारतीय वंशाच्या सुनीताची अशा प्रकारे पृथ्वीवर सुरक्षितपणे वापसी झाल्यामुळे तमाम भारतीयांनासुद्धा आनंद झाला आहे.**

अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विलमोर हे ५ जून २०२४ रोजी बोईंग कंपनीच्या स्टारलाईनर या अंतराळ यानातून केवळ आठ दिवसांच्या मोहिमेसाठी अंतराळात गेले होते. सुनीता १३ जून २०२४ रोजी त्या सहकार्यासोबत पृथ्वीवर परतणार होत्या. पण तांत्रिक बिघाड दुरूस्तच न झाल्याने या दोघांना ९ महिने स्पेस स्टेशनमध्येच अडकून पडावे लागले. त्यांच्या सुटकेचे या दरम्यान पराकोटीचे प्रयत्न झाले. पण त्यात यश आले नाही. बोईंगऐवजी जागतिक अब्जाधीश एलॉन मस्क यांच्या स्पेसएक्स कंपनीने त्यांची अंतराळातून सुटका केली. त्यामुळे आता बोईंगच्या या अंतराळयानावरच नाही तर कंपनीच्या भवितव्यावरच मोठे प्रश्नचिन्ह उभं ठाकलं आहे.

नऊ महिन्यांच्या कालावधीमध्ये सुनीता विल्यम्स आणि विलमोर अवकाशात अडकून पडले असे आपल्याला वाटत असले तरी त्यांनी त्या कालावधीचा योग्य उपयोग करून वेगळ्या प्रकारचे संशोधनही केले आहे. या कालावधीमध्ये सुनीता विल्यम्सने १७ ते १८ वेळा स्पेसवॉक केला आहे आणि पूर्वीच्याच आपल्या विक्रमामध्ये भर घातली आहे. इतक्या वेळा अंतराळामध्ये स्पेसवॉक करणारी ती पहिली महिला अंतराळवीरही आता ठरली आहे. अमेरिकन हवाई दलात काम करणार्या सुनीताने आपल्यातील लढावूवृत्ती समोर आणल्यामुळेच तिला अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात नासातर्फे संधी देण्यात आली. २००० नंतर तिने अनेक यशस्वी अवकाश मोहिमा पूर्ण केल्या. महिला अंतराळवीर म्हणून तिने अवकाश संशोधनाच्या क्षेत्रात आपला एक वेगळा ठसा निर्माण केला आहे. गेल्या वर्षी जूनमध्ये जेव्हा सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी विलमोर आठ दिवसांच्या मोहिमेसाठी अवकाशात झेपावले तेव्हा त्यांच्यापुढे असे कोणते संकट निर्माण होणार आहे त्याची कल्पनाही नसेल. पण आठ दिवसांनंतर पृथ्वीवर परतण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा कोणत्यातरी बिघाडामुळे आपण पृथ्वीवर परत येऊ शकणार नाही हे या दोन्ही अंतराळवीरांना समजले होते. मात्र, आपण लवकरच परतू हा विश्वासही त्यांच्यामध्ये होता. पण हा कालावधी तब्बल नऊ महिन्यांचा असेल असेही त्यांना वाटले नसावे. महिन्याभराच्या कालावधीमध्ये बिघाड दुरुस्त करून आपल्याला पुन्हा यशस्वीपणे पृथ्वीवर आणले जाईल असे त्यांना वाटले असावे. पण अमेरिकेतल्या नासासारख्या सर्वश्रेष्ठ अवकाश संशोधन संस्थेलासुद्धा हा बिघाड दुरुस्त करून त्यांना पृथ्वीवर परत आणण्यासाठी तब्बल नऊ महिन्यांचा कालावधी लागला ही गोष्टही लक्षात घेण्यासारखी आहे. आधुनिक काळातील तंत्रज्ञानामुळे आणि संदेशवहन यंत्रणेमुळे अंतराळातील सुनीताच्या सुरक्षिततेची जाणीव सर्वांना होत होती. या कालावधीमध्ये ती सर्वांना शुभेच्छाही देत होती. नववर्षाच्या शुभेच्छासुद्धा तिने तमाम पृथ्वीवासीयांना दिल्या होता. आता हे दोघेही सुरक्षितपणे परत आल्यामुळे एका आव्हानाची समाप्ती जरी झाली असली तरी आगामी कालावधीमध्ये त्यांना पृथ्वीवरील नैसर्गिक वातावरणामध्ये स्वतःला जुळवून घेण्यासाठी आणखी काही आरोग्य विषयक आव्हानांचा मुकाबलाही करावा लागणार आहे.

सुनिता विल्यम्स यांचे हे तिसरे आणि सर्वात कठीण असे अंतराळ वास्तव्य होते. आतापर्यंत त्यांनी अंतराळात ६०८ दिवस वास्तव्य केले आहे. हा तिसर्‍या क्रमांकाचा विक्रम आहे. यापूर्वी पेगी व्हिटसन या अंतराळवीराने अवकाशात एकंदर ६७५ दिवस वास्तव्य केले आहे. मात्र, हा विक्रम रशियाचे अंतराळलीर ओलेग कोनोनेंको यांच्या नावावर असून त्यांनी अंतराळत एकंदर ८७८ दिवस वास्तव्य केले आहे. सुनिता विल्यम्स आणि बुच विल्मोर यांनी आपल्या २८६ दिवसांच्या अंतराळ वास्तव्यात ४ हजार ५७६ वेळा पृथ्वीप्रदक्षिणा केली आहे. तसेच एकंदर १९ कोटी ५० लाख किलोमीटर इतक्या अंतराचा अंतराळ प्रवास केला आहे.

सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विलमोर यांचा अंतराळातून पृथ्वीपर्यंतचा हा प्रवास १७ तासांचा होता. मात्र, या लँडिंग प्रक्रियेदरम्यान सर्वांना श्वास रोखायला लावणारा ७ मिनिटांचा एक महत्त्वाचा टप्पा होता. आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकातून पृथ्वीपर्यंतचा १७ तासांचा प्रवास अत्यंत आव्हानात्मक ठरला. जेव्हा स्पेसक्राफ्ट पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करते, तेव्हा त्याचे तापमान १६०० अंश सेल्सिअसपेक्षा जास्त होते. याच वेळी सात मिनिटांसाठी कम्युनिकेशन ब्लॅकआउट होतो. हा काळ सामान्य असला तरीही अत्यंत जोखमीचा असतो, कारण या दरम्यान नासाचा स्पेसक्राफ्टशी कोणताही संपर्क राहत नाही. स्पेसएक्सच्या ड्रॅगन स्पेसक्राफ्टलाही अशाच परिस्थितीचा सामना करावा लागला. मात्र, सात मिनिटांनंतर, बुधवारी पहाटे सुमारे ३.२० वाजता, स्पेसक्राफ्टशी पुन्हा संपर्क झाला. हा सात मिनिटांचा ब्लॅकआउट काळ कोणत्याही स्पेसक्राफ्टसाठी निर्णायक ठरतो. या काळात प्रचंड उष्णतेमुळे स्पेसक्राफ्ट क्रॅश होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. १ फेब्रुवारी २००३ रोजी नासाच्या कोलंबिया अंतराळयानाला असाच अपघात झाला होता. पृथ्वीच्या वातावरणात प्रवेश करताच यान कोसळले होते, आणि प्रसिद्ध भारतीय-अमेरिकन अंतराळवीर कल्पना चावला यांच्यासह संपूर्ण क्रूचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यामुळे, कोणत्याही स्पेसक्राफ्टसाठी हा टप्पा अत्यंत जोखमीचा आणि काळजीपूर्वक हाताळण्यासारखा असतो. हा टप्पा जेव्हा पार पडला तेव्हा जगाने सुटकेचा निश्वास सोडला.

अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीतही या आंतराळवीरांना परत पृथ्वीवर आण्याचा मुद्दा चांगलाच गाजला होता. आपला विजय झाल्यास विल्यम्स आणि विल्मोर यांना अंतराळातून परत आणण्यात येईल, असे आश्वासन डोनाल्ड ट्रंप यांनी निवडणूक प्रचार काळात दिले होते. अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे ट्रंप यांनी २० जानेवारीला घेतली. त्यानंतर दोन महिन्यांपेक्षाही कमी काळात त्यांनी हे आश्वासन पूर्ण केले आहे. दोन्ही अंतराळवीर परतल्यानंतर व्हाईट हाऊसने प्रसारित केलेल्या संदेशात ट्रंप यांनी आश्वासनाची पूर्ती केल्याचा उल्लेख केला गेला आहे. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे सुनीता विल्यम्सने ज्या अंतराळ मोहिमा यशस्वीपणे पूर्ण केल्या होत्या त्यातील ही सर्वात कठीण मोहीम जरी असली तरी तिच्या नावावर अनेक विक्रमही या निमित्ताने नोंदवले गेले आहेत.

आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर विस्तारित मोहिमेवर यशस्वीपणे कार्य करून सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बुच विलमोर हे सुरक्षित परतले, हे अतिशय गौरवशाली आहे. नासा, स्पेसएक्स आणि अमेरिकेच्या अवकाश संशोधनातील योगदानाचा हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. सुनीताची जिद्द आणि समर्पण जगभरातील अवकाशप्रेमींसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरणारी आहे.

**भारतासह संपूर्ण जगाला स्थलांतर आणि त्यामुळे निर्माण होणार्‍या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय समस्यांनी ग्रासले आहे. अमेरिकेसारख्याने देशाने तर स्थलांतरांविरोधात मोहीम राबवून त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्या धर्तीवर भारतातही सध्या सुरू असलेल्या संसदीय अधिवेशनात ‘आप्रवासन आणि विदेशी नागरिक विधेयक, २०२५’ मांडण्यात आले असून, हे विधेयक स्थलांतर व्यवस्थापन अधिक सुसूत्र, सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. त्यानिमित्ताने याविषयी गृहमंत्रालयाचे धोरण, योजना आणि अंतर्गत सुरक्षा यांचा ऊहापोह करणारा हा लेख...**




# भारताचे आधुनिक व्हिसा व स्थलांतरण धोरण


**वेधक**
**अभिषेक चौधरी**

मानवी स्थलांतर हे सातत्याने घडत आलेले एक वैश्विक सत्य आहे. प्रारंभी मानवाने संसाधनांची उपलब्धता, सुरक्षितता आणि अनुकूल पर्यावरण शोधत स्थलांतर केले. स्थलांतर हा जरी प्राचीन मानव संस्कृतीचा अविभाज्य भाग असला तरी, गेल्या काही दशकांत त्याचा प्रकार, प्रमाण आणि गुंतागुंतीत लक्षणीय वाढ झाली आहे. आधुनिक आर्थिक, सामाजिक आणि राजकीय कारणांमुळे स्थलांतराचे स्वरूप अधिक व्यापक आणि जटिल झाले आहे.स्थलांतराच्या बदलत्या स्वरूपामुळे आजच्या घडीला ही केवळ एकमानवी प्रवास प्रक्रिया नसून, अर्थव्यवस्था, संस्कृती आणि सुरक्षिततेची नवीन समीकरणे घडवणारी प्रक्रिया झाली आहे.

**स्थलांतर ही संधी आहे की आव्हान?** भारताचे धोरण केवळ भारतात होणारे अवैध स्थलांतरण अथवा परदेशात काम करणार्‍या भारतीयांपुरते मर्यादित न ठेवता, जागतिक स्थलांतर धोरण घडवण्याचा सक्षम प्रयत्न आहेत का? याच प्रश्नांचा वेध घेण्याची ही वेळ आहे. आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांची संख्या १९९० साली जगाच्या एकूण लोकसंख्येच्या २.९ टक्के होती, तर २०२० पर्यंत ती ३.६ टक्क्यांपर्यंत वाढून २८ कोटी इतकी झाली आहे. जर केवळ स्थलांतरितांसाठी स्वतंत्र देश तयार केला गेला, तर तो जगातील पाचव्या क्रमांकाचा सर्वांत मोठा देश असेल. याशिवाय, स्थलांतराचा जागतिक अर्थव्यवस्थेवरही मोठा परिणाम झाला आहे. २००० ते २०२२ या कालावधीत आंतरराष्ट्रीय स्थलांतरितांनी पाठवलेल्या निधीमध्ये ६५० टक्के वाढ झाली आणि हा आकडा १२८ अब्ज डॉलर्सवरून ८३१ अब्ज डॉलर्स झाला आहे. हे स्थलांतराचे आर्थिक महत्त्व अधोरेखित करते.

भारताबद्दल बोलायचे झाले तर जवळपास दोन कोटी भारतीय जगभर पसरले आहेत. परिणामी १३० अब्ज डॉलर्सहून अधिक परकीय चलन भारतात येते, जे जागतिक स्तरावर सर्वाधिक आहे. दुसरीकडे, भारताने आठ दशकांत वेळोवेळी अनेक स्थलांतरितांना स्वीकारलेदेखील आहे.

एका अंदाजानुसार, जवळपास ५० लाख स्थलांतरित भारतात स्थायिक झाले आहेत. विशेषतः बांगलादेश, नेपाळ, अफगाणिस्तान आणि तिबेटसारख्या शेजारील देशांतील नागरिक भारतात स्थलांतरित झाले आहेत. याशिवाय, भारतीय प्रवासी समुदाय जगभरातील आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रांत प्रभावी आहे. अमेरिका, कॅनडा, ब्रिटन, मध्य-पूर्व आणि ऑस्ट्रेलियामध्ये भारतीय वंशाचे लोक उच्चपदांवर कार्यरत असून, जागतिक व्यापार, तंत्रज्ञान आणि प्रशासनात त्यांचा मोठा वाटा आहे. व्हिसा, स्थलांतरण आणि नागरिकता या क्षेत्रांमध्ये सध्या जागतिक मोठे बदल घडत आहेत. म्हणूनच स्थलांतरण धोरणांमध्ये उदारता आणि नियंत्रण यामधील संतुलन राखणे आवश्यक आहे. भारत पर्यटन आणि व्यापाराला चालना देण्यासाठी व्हिसा सुधारणा करत आहे. (पान ४ वर)



# पाकिस्तानची अवस्था बुडत्याचा पाय खोलात!

**गेल्या काही दिवसांपासून बलुचिस्तानमधील पाकिस्तानी सैन्यावरील लक्ष्यित हल्ल्यांची संख्या सातत्याने वाढत असून, स्वतंत्र बलुचिस्तानच्या मोहिमेने पाकिस्तानची पुन्हा झोप उडविली आहे. त्यात भारतातील मोदी सरकार आणि आता अमेरिकेच्या ट्रम्प सरकारनेही दहशतवादाविरोधी कठोर धोरण स्वीकारल्याने पाकिस्तानची अवस्था बुडत्याचा पाय खोलात अशी झाली आहे.**

**परराष्ट्रकारण**
**अनय जोगळेकर**

पाकिस्तानचा सर्वांत मोठा प्रांत असलेल्या बलुचिस्तानमध्ये अराजकसदृश्य परिस्थिती आहे. क्वेटाहून पेशावरला जात असलेली ‘जाफर एक्सप्रेस’ ही रेल्वेगाडी ‘बलुचिस्तान लिबरेशन आर्मी’च्या सदस्यांनी ताब्यात घेतली. पाकिस्तानने केलेल्या कारवाईत ‘बीएलए’चे सर्व ३३ दहशतवादी मारल्याचा दावा केला असला, तरी ‘बीएलए’ने हा दावा खोडून काढला. या हल्ल्यानंतर अवघ्या तीन दिवसांनी नुस्खी जिल्ह्यामध्ये झालेल्या आत्मघाती हल्ल्यामध्ये तीन सैनिकांसह पाचजण मारले गेले.

बलुचिस्तानचा आकार पाकिस्तानच्या ४० टक्के इतका असला, तरी बलुची लोकांची संख्या अवघी ७० लाखांच्या आसपास आहे. पाकिस्तान सरकारने इतर प्रांतातून सुमारे एक कोटी लोकांना तिथे आणून वसवले असले, तरी बलुचिस्तानचा बराचसा भाग निर्मनुष्य आहे. चांगल्या दूरसंचार व्यवस्थेच्या अभावामुळे आणि पाकिस्तान सरकारने माध्यमांवर या विषयावर वार्तांकन करण्यात निर्बंध लादल्यामुळे सत्य काय आहे, हे समोर येणार नाही. पाकिस्तानच्या ‘जमात उलेमा-इ-इस्लाम (फजल)’ पक्षाचे नेते मौलाना फजलुर रेहमान यांनी गेल्याच महिन्यात पाकिस्तानच्या नॅशनल असेम्ब्लीमध्ये बोलताना बलुचिस्तानच्या अनेक जिल्ह्यांमध्ये पोलीस आणि सैन्याचे अस्तित्व नसल्याचा दावा केला. खैबर पख्तुनख्वा प्रांतातही परिस्थिती हाताबाहेर गेल्याचे त्यांनी सांगितले. बलुचिस्तानची लोकसंख्या छोट्या छोट्या टोळ्यांमध्ये विभागली गेली आहे. (पान ४ वर)

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# मराठी साहित्य आणि भारताची सुरक्षा

## चिनी हायब्रीड वॉर, ग्रे झोन वॉर, अनरिस्ट्रिक्टेड युद्धावर मराठी साहित्य जरुरी

**भारता आम्ही तुलाच देव मानतो,**
**हाच महाराष्ट्र धर्म एक जाणतो**
**राखतो महान आमची परंपरा,**
**रक्त शिंपुनी पवित्र ठेवती धरा ।**
**ह्याच मातीवरी प्राण गेला तरी,**
**अमुची वीर गाथा उरे ।।**
**मर्द आम्ही मराठे खरे...**

नवी दिल्ली येथील ९८ व्या साहित्य संमेलनाच्या स्मरणिकेकरिता लिहिलेल्या. लेखाचा तिसरा आणि शेवटचा भाग खालील प्रमाणे होता.

### बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरी हा भारताला लागलेला कॅन्सर

आज चार ते पाच कोटी बांगलादेशींनी भारतामध्ये घुसखोरी केली असावी. ही घुसखोरी अजूनही पश्चिम बंगालमधून सुरू आहे. दरवर्षी भारतीय पोलिस तीन ते चार हजार बांगलादेशी पकडतात, परंतु घुसखोरी थांबण्याचे काही लक्षण दिसत नाही. मतपेटीच्या राजकारणाला विरोध करावा लागेल. त्यासाठी सातत्याने त्याच्या विरोधात लेखन आणि प्रचार करायला हवा. ही राष्ट्रीय सुरक्षेची समस्या आहे, हे लक्षात घेऊन सर्व राजकीय पक्षांनी एकत्र आले पाहिजे. आताच झालेल्या निवडणुकांमध्ये अनेक बांगलादेशींनी मतदान केल्याच्या बातम्या प्रकाशित झाल्या आहेत. घुसखोरी जर चालू राहिली तर २०२९ पूर्वी आसाम व पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रिपदी बांगलादेशी बसल्याचे पाहण्याची दुर्दैवी वेळ आपल्यावर येईल.

'बांगलादेशी घुसखोरी : भारताच्या सुरक्षेसमोरील सर्वात मोठे आव्हान?' या विषयावर मी लिहिलेली पुस्तके सोडून अजून कुठलीही पुस्तके प्रकाशित झाल्याचे दिसत नाही. जर यावर पुस्तके प्रकाशित झाली तर जास्त चांगले होईल.

**आव्हान चिनी हायब्रीड वॉर, ग्रे झोन वॉर, अनरिस्ट्रिक्टेड वॉर, अनियमित युद्ध किंवा मल्टी डोमेन युद्धाचे** गलवानच्या लढाईमध्ये आपण चीनचे ७० हून जास्त सैनिक मारले होते. चीनबरोबर पारंपरिक लढाईची आपल्याला चिंता नको; चिंता आहे ती ३६५ दिवस चालणाऱ्या हायब्रीड वॉरची.

भाग ३



९८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, दिल्ली २०२५

सध्या चीनचे भारताविरुद्ध (आणि जगातील अनेक देशांविरुद्ध) एक नवीन प्रकारचे युद्ध चाललेले आहे. त्याला हायब्रीड वॉर, झोन वॉर फेअर किंवा अनरिस्ट्रिक्टेड वॉर किंवा अनियमित युद्ध म्हणून ओळखले जाते. हे युद्ध ३६५ दिवस सुरू असते; ते वेगवेगळ्या स्तरावर लढले जाते. या युद्धाचा उद्देश आहे की, भारतात हिंसाचार वाढवून, अराजकता माजवून भारताच्या आर्थिक प्रगतीचा वेग कमी करायचा. त्यामुळे भारत चीनचा प्रतिस्पर्धी म्हणून पुढे येणार नाही आणि कायमचा चीनच्या अधिपत्याखाली राहील.

### नवीन युद्ध, अनरिस्ट्रिक्टेड वॉर/ हायब्रीड वॉर

२०१४ नंतर नवीन युद्ध सुरू झाले; ज्याला अनरिस्ट्रिक्टेडवॉर/हायब्रीड वॉर किंवा नियम नसलेले युद्ध असे म्हटले जाते. या युद्धामध्ये चीन वेगवेगळ्या पद्धतीने भारताची आर्थिक प्रगती थांबविण्याचा प्रयत्न करीत आहे. याचे अनेक पैलू आहेत. आर्थिक युद्ध, व्यापार युद्ध, मानसिक युद्ध, प्रोपोगंडा वॉर, सायबर युद्ध, सोशल मीडियात घुसखोरी आणि अनेक पैलू. हायब्रीड वॉर ही एक लष्करी रणनीती आहे, जे पारंपरिक युद्ध, राजकीय युद्ध, अनियमित युद्ध, सायबर युद्ध, मानसिक युद्ध यांचे मिश्रण आहे. हायब्रीड वॉरफेअर मुत्सद्देगिरी, निवडणूक हस्तक्षेप यांसारख्या इतर प्रभावी पद्धतींना एकत्र करते. हा लढा केवळ शस्त्रास्त्रांनी लढला जात नाही, तर त्यात लोकांची विचारसरणी बदलण्याचा प्रयत्न केला जातो. अशा प्रकारच्या युद्धांत अफवा, चुकीची माहिती आणि बनावट बातम्या पसरवल्या जातात. इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या युगात असे करणे पूर्वीपेक्षा सोपे आहे.

### आर्थिक युद्ध, व्यापार युद्ध

चीनने भारतात केलेली आर्थिक घुसखोरी, भारताशी चाललेले आर्थिक युद्ध किंवा व्यापार युद्ध हा एक महत्त्वाचा आयाम आहे. आर्थिक युद्ध लढण्याकरिता आपण आत्मनिर्भर भारताच्या कार्यक्रमाने चीनची आपल्या आर्थिक व्यवस्थेमध्ये झालेली घुसखोरी कमी करीत आहोत. 'मेक इन इंडिया'ला महत्त्व देऊन चीनमधून येणाऱ्या गोष्टी भारतात बनवत आहोत, बनवणार आहोत. मात्र ही लढाई अनेक वर्षे चालणार आहे.

### मानसिक युद्ध, प्रोपोगंडा वॉर

मानसिक युद्ध, प्रोपोगंडा वॉर, दुष्प्रचार युद्धाकरिता चीनने भारतात अनेकांना विकत घेतले आहे. त्यांचे हस्तक भारताच्या प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, आणि सोशल मीडियावर चीनच्या बाजूने प्रचार करतात. हे युद्ध सामान्य माणसाच्या मोबाईलमध्ये घुसलेले आहे.

### हे युद्ध कसे जिंकायचे?

प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये देशभक्ती, देशप्रेमाची भावना जागृत व्हायला पाहिजे. त्यांनी चीनच्या दुष्प्रचाराला बळी पडू नये. प्रत्येक भारतीयाने आपल्या देशाचे कान आणि डोळे बनले पाहिजे. भारताचे शत्रू कुठलाही दुष्प्रचार करत असतील, मानसिक युद्ध करत असतील अशांना शोधून त्यांची माहिती आपल्या सुरक्षा यंत्रणेला दिली पाहिजे, ज्यामुळे हे युद्ध जिंकण्यात मदत मिळेल.

### सायबर युद्ध

चीन आपल्यासोबत सायबर युद्ध लढत आहे. सायबर युद्ध जिंकण्याकरिता आपल्याला देशाची सायबर यंत्रणा अधिक मजबूत करावी लागेल आणि हे काम सतत सुरू राहणार आहे. ज्याप्रमाणे आपण आपल्या कॉम्प्युटरमधील अँटी व्हायरस अपडेट करत असतो, त्याच प्रमाणे सायबर वॉरपासून वाचण्याकरिता आपल्याला आपल्या देशाची सुरक्षा यंत्रणा अपडेट करावी लागणार आहे.

### सोशल मीडियात घुसखोरी

चीनने आपल्या सोशल मीडियात घुसखोरी केली आहे; आपण मात्र चीनच्या सोशल मीडियात घुसखोरी करू शकत नाही. कारण सोशल मीडिया चिनी कंट्रोल आहे. त्यामुळे सोशल मीडियात त्यांच्या दुष्प्रचाराला कसे प्रत्युत्तर द्यायचे?

### हायब्रीड युद्धाला प्रत्युत्तर

स्वतःचे रक्षण करणे हे नेहमीच कठीण असते. परंतु, हायब्रीड 'ऑपरेशन्स' आपणसुद्धा चीन, पाकिस्तानमध्ये करू शकतो. तुम्ही आमच्या देशामध्ये हस्तक्षेप केला, तर आम्हीसुद्धा तिबेट, शिनझियांग, हाँगकाँग इथल्या नेत्यांशी संवाद साधून त्यांना आम्ही राजकीय मदत करू शकतो. हायब्रीड युद्धाच्या विविध प्रकारांमध्ये चीन भारताच्या पुष्कळच पुढे आहे. म्हणून हायब्रीड युद्धाच्या प्रत्येक प्रकारच्या लढाईमध्ये प्रत्युत्तर देण्याची क्षमता भारताला निर्माण करावी लागेल. हायब्रीड युद्धात प्रत्येक भारतीय फ्रंट लाईन सैनिक आहे. कारण हे युद्ध बंदुकीने लढले जात नाही. आता प्रत्येकाने स्वत:ला प्रश्न विचारला पाहिजे की, देशाला सुरक्षित करण्याकरिता मी काय करू शकतो? प्रत्येक भारतीयाने चिनी वस्तूंवर बहिष्कार घालून या युद्धात आपले योगदान दिले पाहिजे.

मराठी भाषेत चीनी हायब्रीड वॉर, ग्रे झोन वॉर, अनरिस्ट्रिक्टेड वॉर, अनियमित युद्ध किंवा मल्टी डोमेन युद्ध, आर्थिक युद्ध, व्यापार युद्ध, मानसिक युद्ध, प्रोपोगंडा वॉर, दुष्प्रचार युद्ध, सोशल मीडियात घुसखोरी, सायबर युद्ध, मुत्सद्देगिरी, निवडणूक हस्तक्षेप यावर काहीच साहित्य प्रकाशित झालेले नाही.

### बहुतेक मराठी वाचकांना मल्टी डोमेन युद्धाविषयी कल्पना नाही

अनेक सुशिक्षित असा प्रश्न विचारतात की, चीनबरोबर आपले तिसरे महायुद्ध तर होणार नाही? त्यांना ही कल्पना नसते की, चीन आपल्याशी गेले अनेक वर्षे ३६५ दिवस, दिवसातून २४ तास मल्टी डोमेन युद्ध लढत आहे आणि देशातील नागरिकांना याविषयी माहिती नाही किंवा फारशी पर्वाही नाही. अनेक, खास तर कॉर्पोरेट वर्ल्ड चीनला आपला शत्रूच मानत नाही. त्यांना वाटते की, चीनशिवाय ते आपला उद्योगधंदा चालवू शकत नाही. म्हणून हे अत्यंत जरूरी आहे की, चीन वेगवेगळ्या प्रकारे भारताची प्रगती कशी थांबवतो आहे, हे भारतीयांना कळायला पाहिजे आणि सगळ्यांनी योद्धे म्हणून चीनविरुद्धच्या या युद्धामध्ये भाग घेतला तरच आपण चीनविरुद्ध मल्टी डोमेन युद्ध जिंकू शकतो.

मराठी साहित्यिक मल्टी डोमेन युद्धाविषयी मराठीमध्ये साहित्य निर्माण करून देशभक्त नागरिकांना एक माहिती योद्धा आणि मल्टी डोमेन युद्धात देशाला मदत करणारा देशभक्त नागरिक म्हणून तयार होण्यामध्ये मदत करू शकतात. देशभक्त नागरिकांची चीन, पाकिस्तान आणि देशाच्या शत्रूंनी चालविलेल्या मल्टी डोमेनमध्ये काय जबाबदारी असेल हा एक महत्त्वाचा विषय आहे. त्यावर मराठी साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे. मात्र, याकरिता मराठी साहित्यिकांना मेहनत करून मल्टी डोमेन युद्धाच्या वेगवेगळ्या आयामांवर साहित्य निर्माण करून आम जनतेला शिक्षित करावे लागेल. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

---

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे



# भक्ती प्रेमाविन ज्ञान नको देवा...!

संतांनी आपल्या अभंग वाङ्मयातून सातत्याने समाजातील सर्वांच्या कल्याणाची आर्त तळमळ मांडली आहे.

**'बुडती हे जन न देखवे डोळा ।**
**म्हणूनही कळवळा येतसे ।।'**

त्या तळमळीतून सर्वांना शाश्वत सुख मिळावे, सर्वांचा संसार सुखाचा व्हावा, असा भाव प्रकट होतो. त्यासाठी त्यांनी समाजातील लोकांना कर्तव्यकर्माचा व सदाचाराचा जो उपदेश केला आहे, तो सर्वच काळातील समाजाला संबद्ध आहे. म्हणून संतांचे जगावर उपकार आहेत.

**'काय सांगू आता संतांचे उपकार ।**
**माझा निरंतर जगविती ।।'**

मानवी संसार जरी दुःखमय असला, तरी मनामध्ये सतत परमेश्वराचे नामस्मरण व हातामध्ये सदाचारयुक्त कर्तव्यकर्म असेल तर संसाराची भीती बाळगण्याचे कोणतेही कारण नाही.

**'आता तरी पुढे हाची उपदेश ।**
**नका करू नाश आयुष्याचा।।'**

या प्रपंचामध्ये कोणीही उच्च-नीच नाही. संसारामध्ये परमेश्वराचे नामस्मरण करण्याचा अधिकार सर्वांना आहे. भक्तिरस हा ईश्वरी प्रसाद आहे. ब्राह्मण, वैश्य, शूद्र, चांडाळ, वेश्यांनाही तो अधिकार आहे. आचारधर्माचा संपूर्ण सारांशच प्रस्तुत अभंगातून मांडला-

**पुण्य परउपकार पाप ते परपीडा ।**
**आणीक नाही जोडा दुजा यांसी ।।१।।**
**सत्य तो चि धर्म असत्य ते कर्म ।**
**आणीक हे वर्म नाही दुजे ।।२।।**
**गति ते चि मुखी नामाचे स्मरण ।**
**अधोगति जाण विन्मुखता ।।३।।**
**संताचा संग तो चि स्वर्गवास ।**
**नरक तो उदास अनर्गळा ।।४।।**
**तुका म्हणे उघडे आहे हित घात ।**
**जयाचे उचित करा तैसे ।।५।।** (तु. गा. १०२१)

संत तुकारामांनी पाप आणि पुण्याची अगदी साधी-सोपी असणारी व्याख्या सांगितली आहे. काया, वाचा आणि मन याद्वारा एखाद्या असहाय्याला साहाय्य करणे म्हणजे परोपकार होय व परोकारासारखे पुण्य जगात दुसरे कोणतेही नाही.

साध्या-भोळ्या, निरपराध लोकांना विनाकारण त्रास देणे, छळणे म्हणजेच परपीडा. ते पाप होय. नीतिशास्त्रातसुद्धा पाप-पुण्याच्या संकल्पनेला अवर्णनीय असे महत्त्व आहे. वेदविहित सत्य आचरण हा स्वधर्म मानावा. जीवनामध्ये नीतिशास्त्राविरुद्ध असत्य आचरण करणे हा अधर्म आहे. पूर्व मीमांसाशास्त्रातही याचे दाखले आढळतात.

संतांचा सहवास म्हणजेच स्वर्गसुख तर दुर्जनांशी सख्य म्हणजे नरकवास होय. आपले हित व अहित कशामध्ये आहे हे आपण स्वतः ओळखणे आवश्यक आहे.

**पाप आणि पुण्य दुसरीकडे नसून ते आपल्या वर्तणुकीमध्ये आहे. त्यांच्या शिकवणुकीमध्ये-**

१) ज्ञानातील डोळसपणा आहे. २) कर्मातील शुचिता पाळणे आवश्यक मानतात. ३) भक्तीतील समर्पणता जीवनामध्ये महत्त्वपूर्ण आहे.

मनुष्याने याचकाला यथाशक्ती दान करावे. परमेश्वराशी नाते जोडण्यासाठी दया आणि दान हे दोन महत्त्वपूर्ण टप्पे आहेत. आतिथ्य आणि परोपकार यांसोबतच दया व दान ही सर्वोत्तम जीवनमूल्ये आहेत. जीवनातील सर्वात्मभाव वाढविणारे ते संस्कारमोती आहेत.

समाजाच्या उत्थानाकरिता, उन्नतीकरिता प्रत्येकाने या सामाजिक सद्‌गुणरूपी जीवनमूल्यांचे पालन करून भक्तिमार्गाने जीवन जगावे, असा महत्त्वपूर्ण संदेश संत तुकारामांनी आपल्या आचारधर्मामध्ये सांगितला आहे

**तुका म्हणे तुम्ही चला या चि वाटे ।**
**भरवशाने भेटे पांडुरंग ।।**
(तु. गा. ३७२८)

संतांचा जीवन कल्याणाचा उपदेश वेद, पुराण, श्रुती या सर्व ग्रंथांचा मूळ उद्देश मानवास योग्य आचाराची संहिता दाखवणे हा आहे. संतांनी आपल्या वाङ्मयात वेदमार्गाचा पुरस्कार केला आहे.

आजच्या काळात वेदाचीच आवश्यकता निर्माण झाली आहे. कारण नीतिमत्ता ढासळलेल्या अस्थिर समाजाला फक्त वेदांचे विचारच सन्मार्गाची दिशा दाखवू शकतात.

संतांनी केलेला कर्तव्योपदेश जर शासन स्तरावर अंगीकारला गेला, तर प्रत्येक व्यक्तीला सात्त्विक जीवन जगण्याचा एक आदर्श वस्तुपाठच प्राप्त होईल. कर्माचे तीन प्रकार आहेत- नित्य, नैमित्तिक आणि काम्य.

या कर्मांची व्याप्ती फार गहन असून सर्व जगच कर्माच्या अधीन आहे. गतिमान विज्ञान युगाला स्थैर्यप्राप्तीसाठी, अखिल मनुष्यमात्रांच्या कल्याणाकरिता संतांचा कर्तव्योपदेश आजही ४०० वर्षांनंतर तंतोतंत लागू पडतो तसेच नंतरही तो लागू पडेल, अशी चिरंतन जीवनमूल्ये त्यामध्ये समाविष्ट आहेत. त्यामुळेच संत अभंग वाङ्मय हे अक्षर वाङ्मय ठरले आहे.

आचरणाचे सर्व सिद्धांत संत स्वतःच्या आचरणातून व काळाच्या कसोटीवर तपासून पाहिले, तेव्हाच त्यांनी ते जगासमोर मांडले. लोककल्याणाची आंतरिक तळमळ असल्यामुळेच संतांनी ही आचारसंहिता मांडली.

**आपुलिया हिता जो असे जागता। धन्य माता पिता तयाचिया**

संतांचे योग्य दिशा दर्शन भरकटलेल्या दिशाहीन समाजाला, जीवनमूल्ये हरवून बसलेल्या युवा पिढीला व येणाऱ्या आगामी असंख्य पिढ्यांना हा कर्तव्योपदेशाचा उपदेश निश्चितच मार्गदर्शक ठरेल. संत विचारांच्या आचाराशिवाय आजच्या नीतिमत्ताहीन समाजाला त्रिकालातही शांती मिळणे शक्य नाही.

संत साहित्यात सांगितलेली मूल्ये घराघरांतून, विविध शैक्षणिक संस्थांच्या माध्यमातून समाजामध्ये रुजविली गेली तर समाजाची झालेली नीतिमूल्यांची हानी भरून निघण्यास मदत होईल.


संतांच्या उपदेशाचे पालन केल्यास विज्ञान युगातील अस्थिर व तणावग्रस्त मानवी जीवनाला चिरंतन शांती तद्वतच समाधान प्राप्त होईल.

---

वेधक

चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

# सत्त्वशील




वैद्यकशास्त्र सुद्धा मानते की प्रत्येक माणसाला मन असते; तो अवयव म्हणून प्रत्यक्षात दाखवता आला नाही तरी! संस्कृती असे मानते की प्रत्येकाला सदसदविवेकबुद्धी असतेच असते, त्याने उपयोगात आणली नाही तरी! आता हे दोन्ही आठवायचे कारण म्हणजे आत्ताच्या आता, अगदी अलिकडच्या काळात महाभारतातील महामंत्री विदुर. या व्यक्तिमत्व विषयी दोन पुस्तके लागोपाठ वाचली. त्यातले पहिले म्हणजे महाकवी सुधाकर शुक्ल यांचे महामंत्री विदुर आणि यातले दुसरे पुस्तक म्हणजे मृणालिनी शिवाजी सावंत यांचे सत्वशील. आणि त्यावेळी असे मनात आले की....महामंत्री विदुर हे महाभारताचे मन आहे; विदुर ही महाभारताची सदसदविवेकबुद्धी आहे. या दोन्ही पुस्तकांचे वाचन सुरू असताना सारख्या काही गोष्टी मनात येत होत्या.

* पहिली गोष्ट म्हणजे महाभारतातील महामंत्री विदुर आणि पेशवाईतील नाना फडणवीस या दोन व्यक्तिमत्वात काळ, व्यक्तिमत्व, कौटुंबिक पार्श्वभूमी याबाबत काही साहजिकच असे फरक असले तरी काही बाबतीत साम्य आहे. महामंत्री विदुर आणि नाना फडणवीस या दोघांनीही रणांगणात प्रत्यक्ष उतरून लढाया जिंकल्या नाहीत; पण या दोघांची व्यवस्थापन आणि मुत्सद्देगिरी यावर घट्ट पकड होती.

* दुसरी गोष्ट म्हणजे तत्कालीन राज्यकर्त्या मंडळींनी त्यांनी दिलेला सल्ला ऐकला असेल किंवा नसेल; पण या दोघांनीही राज्याला हितकारक असा सल्ला देण्यात महामंत्री विदुर आणि नाना फडणवीस यांनी कधीही कुचराई केलेली नाही.

* तिसरी गोष्ट म्हणजे महामंत्री विदुर आणि नाना फडणवीस या दोघांचेही वर्णन त्यांच्या त्यांच्या काळाची सदसदविवेकबुद्धी असे सहज करता येईल.

* चौथी गोष्ट म्हणजे महाभारतात विदुर आणि पेशवाईत नाना फडणवीस यांचे एक तर फारसे उल्लेख येत नाहीत आणि आले तरी त्यांचे एकट्याचे असे फारसे येत नाहीत. नाना फडणवीस यांचा उल्लेख नेहमीच इतर कोणत्या ना कोणत्या तरी सरदार किंवा मनसबदार मंडळी बरोबर येतो आणि महामंत्री विदुर यांचा उल्लेख अनेकदा पितामह भीष्म, कृपाचार्य, द्रोणाचार्य यांच्या बरोबर येतो.

महामंत्री विदुर हे केवळ महाभारतात अनुल्लेखाचे अधिकारी आहेत असे नाही तर मराठी साहित्यात सुद्धा महामंत्री विदुर यांना केंद्रीभूत धरून फारसे ललित लेखन झालेले नाही. महामंत्री विदुर या व्यक्तिमत्वावर मराठीपेक्षा हिंदीत जास्त पुस्तके आहेत. असाच प्रकार भगवान परशुराम यांच्या बाबतच्या पुस्तकांबाबत सुद्धा आहे. दुसरे म्हणजे मराठीत जी काही मोजकी पुस्तके महामंत्री विदुर यांना केंद्रीभूत धरून लिहिली गेली आहेत ती पुस्तकेही सहजासहजी मिळत नाहीत. त्यातल्या त्यात सहजासहजी मिळणारे महामंत्री विदुर हे नायक म्हणून लिहिलेले मराठी पुस्तक म्हणजे मृणालिनी शिवाजी सावंत यांनी लिहिलेले, हेडविग मीडिया हाऊसने प्रकाशित केलेले, २५ जून २०२३ रोजी पहिली मराठी आवृत्ती प्रसिध्द झालेले, ३१८ पानांचे, ३९९ रुपये किंमत असलेले पुस्तक सत्वशील!

पहिली मराठी आवृत्ती म्हणायचे कारण म्हणजे सत्वशील या पुस्तकाच्या लेखिका मृणालिनी शिवाजी सावंत या मराठी मधे जसे लेखन करतात तसे हिंदी मधेही करतात. सुप्रसिद्ध मराठी लेखक शिवाजी सावंत यांच्या त्या पत्नी. महामंत्री विदुर यांच्या बाबतीत अजून एक योगायोग आहे. त्यांच्यावर मराठीत त्यातल्या त्यात उपलब्ध असणारी दोन पुस्तके म्हणजे मृणालिनी शिवाजी सावंत यांचे सत्यशील आणि महाकवी सुधाकर शुक्ल यांचे महामंत्री विदुर. हे दोन्ही लेखक, सुधाकर शुक्ल आणि मृणालिनी शिवाजी सावंत असे आहेत की ते मराठी पेक्षा हिंदी लेखन जास्त करतात आणि ते मराठी पेक्षा हिंदी लेखक म्हणून जास्त प्रसिध्द आहेत. असो!

सत्वशील! व्यक्तिमत्वाचे नाव सार्थ करणारे चपखल विशेषण. तेच या पुस्तकाचे शीर्षक. पुस्तकाच्या पिवळ्या मुखपृष्ठावर, हस्तिनापुराच्या कल्पना चित्राच्या पार्श्वभूमीवर खूप उंच ताठ उभा असणारा विदुर... एक एकदम योग्य चित्रण. पण... त्याचवेळेला ते चित्र थोडे खटकते. कारण विदुराची ही मूर्ती या मुखपृष्ठावर काळया रंगात चितारली आहे. हे खटकते. अगदी निश्चीत खटकते. कारण एरवीही महाभारतात आणि अगदी या पुस्तकातही, भेटणारे विदुराचे व्यक्तिमत्व हे काळे नसून हस्तिनापुरावर पडलेल्या काळया सावलीतून सत्व, स्वत्व, सत्य, यांचे प्रकाशचित्र दाखवत राहणारे व्यक्तिमत्व असे आहे. मग इथे विदुर काळे का? रामानंद सागर यांच्या महाभारत मालिकेमुळे शकुनी ( गुंफी पटेल) काळया वेशभूषेत पाहायची सवय झाल्यानेही असे वाटत असेल कदाचित! पण वाटते हे खरं! या पुस्तकाचा सगळ्यात जास्त विलोभनीय भाग म्हणजे या संपूर्ण पुस्तकात विदुर आणि युधिष्ठिर यांचे उमगत व उमलत जाणारे बौद्धिक भावबंध. घरातल्या कर्त्या पुरुषाने आपला वैचारिक आणि व्यावहारिक वारसदार आयुष्यभर निर्माण करत राहावं असे हे चित्रण आहे. या पुस्तकाच्या शेवटी येणारा युधिष्ठिर आणि विदुर यांच्यात घडणारा प्रसंग हा तर अत्युत्तम सर्वोच्च बिंदू ( क्लायमॅक्स अशा अर्थाने ) आहे. अगदी त्यात साहित्यिक स्वातंत्र्य घेतले गेले आहे किंवा असेल हे मान्य केले तरी! या पुस्तकातले हे सारे प्रसंग वाचत असताना वाटत राहते की सदसदविवेकबुद्धी सुद्धा स्वखलनशील असते याचे उदाहरण म्हणजे युधिष्ठिर आणि अशी सदसदविवेकबुद्धी सक्रीयही असते आणि तरीही स्वखलनशील नसते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे विदुर! या पुस्तकाचा असाच एक अत्यंत वाचनीय भाग म्हणजे द्रोणाचार्यांनी एकलव्याचा अंगठा मागितल्या नंतर द्रोणाचार्य आणि विदुर यांच्यात घडतो आहे असे कल्पून येणारा संवाद. या प्रसंगाचे वर्णन करणारे संवाद या पुस्तकात सलग तीन पानभर आहेत. त्यांना पसरलेले म्हणवणार नाही इतके ते बोलके आहेत. एकीकडे ते राज्यशासन नियुक्त गुरू आणि त्या राज्याचे महामंत्री यांच्यात घडणारा संवाद आहे. त्याचवेळी त्याच्या पलीकडे जात एक शिक्षण देणारा आणि एक शिक्षणाविषयी ध्यास आणि उत्सुकता सजग ठेवणारा यांच्यातला तो संवाद आहे. आजच्या Knowledge Based Economy मध्ये नवीन शैक्षणीक धोरण राबवताना प्रत्येकाने तो अंमलात आणण्याचा कसोशीने प्रयत्न करावा असा हा संवाद आहे. या पुस्तकाचा असाच एक उत्तम भाग म्हणजे आपण दासीपुत्र म्हणून वागवले जातो याची मनोमन प्रचंड खंत असली तरी त्याचे नेमके भान आयुष्यभर बाळगणारे असे विदुराच जाणवणारे व्यक्तिमत्व.

(पान ६ वर)

# किसी की मुस्कुराहटों पे हो निसार...

यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

**१.** एक उर्मट श्रीमंत माणूस त्याची महागडी कार स्वच्छ करायलाएका कार सर्व्हिस सेंटरमध्ये घेऊन आला. फक्त अर्ध्या तासात मला माझी कार आतून-बाहेरून नीट स्वच्छ करून हवी आहे. पाच सेकंद जरी उशीर झाला तर मी पैसे देणार नाही. तेथील मॅनेजरने अशा कामात वाकबगार असलेल्या संतोषला बोलावले. पण संतोषचे ६० वर्षांच्या वरील वय पाहून तो श्रीमंत माणूस कुरकुरला. पण मॅनेजरने म्हटले,''तुम्हाला तक्रार करावी लागणार नाही.'' मग संतोषने अगदी वेळेच्या आत ते काम पूर्ण केले. पण तेवढ्यात त्या गाडी मालकाने गाडी भोवती फिरताना कारला एकाठिकाणी मुद्दाम बोटाने घाण लावली व ओरडून म्हटले,''हे बघा, इथे अजूनही स्वच्छ झालेले नाही.

मी आता पैसे देत नाही,'' असे म्हणून रागाने गाडीत बसून निघून गेला. मॅनेजरने त्याला थांबवायचा असफल प्रयत्न केला. मग मॅनेजर संतोषवर चिडला व म्हणाला,''तुझ्यामुळे नुकसान झाले.''सर्व्हिस सेंटर बंद व्हायची वेळ झाली म्हणून संतोष तेथून आपल्या घराकडे निघाला. वाटेत त्याला रस्त्याच्या कडेला एक कार उभी दिसली. तिचे पार्किंग लाईटस् सुरू होते व ड्रायव्हरच्या जागी एक गरोदर तरुण स्त्री प्रसूती वेदनांनी तळमळत होती. संतोषने ती आपत्कालीन परिस्थिती आहे, हे ध्यानात घेऊन लगेच तिच्याच कारमध्ये बसून तिला हॉस्पिटलमध्ये पोहोचवले. तिची योग्य काळजी घेतल्या जातेय, याची खात्रीकरून तो आपल्या घरी गेला.

घरी त्याची आजारी बायको वाट पाहत होती. खरेतर बायकोच्या आजारपणामुळेच त्याला छोट्या शहरातील सर्व्हिस सेंटरमधील जुनी नोकरी सोडून दोन महिन्यांपूर्वी या मोठ्याशहरात यावे लागले. तिच्या आजारपणात त्याची जमापुंजी संपली. अंगावर कर्ज वाढत चालले होते. तरीही तो प्रामाणिकपणे आपले काम करत होता. आणि, आज अशा परिस्थितीत त्या उर्मट व दुष्ट श्रीमंत माणसाने जाणूनबुजून पैसे द्यावे लागू नये म्हणून स्वत:च कारला बोटाने घाण लावली.

दुसऱ्या दिवशी सर्व्हिस सेंटरच्या मालकाने त्याला कार्यालयात बोलावले व कालच्या माणसाने कंपनीच्या मुख्य शाखेत तक्रार नोंदविल्याचे सांगितले. त्याने संतोषला नोकरीतून काढून टाकले. त्यानंतर संतोष प्रयत्न करीत असूनही त्याला नोकरी मिळत नव्हती. बघताबघता महिना झाला. आता संतोष व त्याच्या पत्नीची परिस्थिती आणखी कठीण झाली. रोज त्यांचा घरमालक भाड्यासाठी तगादा लावत होता. दार वाजले तेव्हा पुन्हा कुणीतरी बिल मागायला आले असेल असे त्याला वाटले. पण दार उघडले तेव्हा त्याला आश्चर्य वाटले. बाहेर तीच स्त्री उभी होती जिला त्याने मदत केली होती.

तिला त्याने घरात आमंत्रित केले. त्यांची वाईटआर्थिक परिस्थिती तिच्या पासून लपली नाही. मग संतोषने विचारले,''तुम्हाला माझा पत्ता कसा काय मिळाला?'' तिने सांगितले,''त्या दिवशी तुम्ही मदत केल्यामुळे माझा व माझ्या बाळाचा जीव वाचला. तुमच्या त्यादिवशी घातलेल्या गणवेशावरून मी तुमच्या सर्व्हिस सेंटरपर्यंत पोहोचली. तिथून तुमचा पत्ता कळला. मग मी तुमची पूर्ण माहिती काढली.तुमच्या पत्नीच्या प्रकृतीमुळे तुमची बिघडलेली परिस्थिती कळली. पण आज तुमचे दु:खाचे व गरिबीचे दिवस संपलेत. मी आणि माझा नवरा आम्ही एक मोठी कंपनी चालवतो. आमच्या अनेक ठिकाणी शाखा आहेत.

त्यात मला तुमच्यासारखा सहृदयी व प्रामाणिक माणूसच प्रमुख व्यवस्थापक म्हणून हवा. तुम्हाला रुजू करून घेण्यासाठीच मी आली आहे. हे तुमचे नियुक्तिपत्र आणि हा दोन लाखांचा नियुक्ती बोनस! तुमची पोस्ट सर्वात वरची असल्यामुळे तुम्हाला कार, ड्रायव्हर, केबिन, चपराशी या सगळ्या सोयी मिळतील. तसेच तुम्हाला वेळेचे बंधन नाही. कंपनीचे काम नीट चालवण्यासाठी आमच्या कुठल्याही कार्यालयात तुम्ही हवे तेव्हा जाऊ-येऊ शकता.

सुरुवातीला तुमचा पगार दर महिन्याला पाच लाख असेल. कंपनीच्या नियमांनुसार दरवर्षी त्यात १२ टक्क्याने वाढ होत जाईल...''हे सगळे ऐकून, हे सत्य आहेकी स्वप्न तेच त्याला कळेना. त्याच्या व त्याच्या बायकोच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्याने मनोमन देवाला नमस्कार केला. दोघांनी त्यांच्या पाहुणीला धन्यवाद दिला.

दुसऱ्याच दिवशीपासून नवीन संतोषने नवीन जबाबदारीच्या पदावर काम करणे सुरू केले. सर्वप्रथम त्याच्या कंपनीच्या मालकिणीने सर्व शाखाप्रमुखांना बोलावून सगळ्यांना त्याची रीतसर ओळख करून दिली. तसेच सर्वांनी त्याच्या आज्ञांचे संपूर्ण पालन करण्याची तंबी दिली. नंतर संतोषने त्याच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व कार्यालयांना भेटी दिल्यात. प्रत्येक कार्यालयात शाखाप्रमुखाने त्यात्या शाखेतील लोकांना त्याची नवीन चीफ मॅनेजर म्हणून ओळख करून दिली. काही महिन्यातच त्याच्या प्रामाणिकपणामुळे व शिस्तबद्ध कामाच्या पद्धतीनेसर्वांचा विश्वास जिंकला.

एक दिवस त्याच्या कंपनीसाठी एका मोठ्या यंत्रांची खरेदी करायची होती. त्यासाठी काही व्यापाऱ्यांनी त्यांचे प्रेझेंटेशन दिले




व त्यांच्या मुलाखती झाल्यात. त्यात एक मोठा व्यापारीसुद्धा आला होता. पण त्याची प्रत्यक्ष भेट झाल्याबरोबर संतोषने त्या व्यापाऱ्याशी कुठलाही व्यापार करूनये, अशी सगळ्यांना ताकीद दिली. कारण हा तोच व्यापारी होता ज्याने सर्व्हिस सेंटरमध्ये पैसे द्यावे लागू नये म्हणून संतोषची खोटी तक्रार केली होती.

तुम्ही प्रामाणिक नाही म्हणून तुमच्याशी कुठलाही व्यवहार कंपनी करणार नाही तसेच त्याच्याशी कंपनीचे ठरलेले जुने काही व्यवहारदेखील रद्द केले.

**२.** अमेरिकेतील एका मॅक्डोनाल्ड रेस्टॉरंटमध्ये घडलेला हा प्रसंग.''अरे दिप्या, तू इथे? तेही एक साधा वेटर म्हणून? अरे तू वर्गात टॉपर होतास. मी बॅकबेंचर होतो. तुझा स्कोअर पाहून मी वडिलांच्या शिव्या खायचो. तू अमेरिकेत आहेस हे कळले; पण आज काय पाहतोय मी? ५५ वर्षांचा झाला असूनही तू फक्त एक साधा वेटर म्हणून काम करतोस?'' असे म्हणत त्या माणसाने दीपकचा वेटरच्या पोशाखातला एक फोटो काढला आणि लगेच कॉलेजच्या ग्रुपवर पोस्ट केला.

दीपकला ओळखणारा सुरेश आधी खरेच एक बॅकबेंचर होता आणि नेहमीच दीपकचा द्वेष करायचा. अशा सुरेशने एक महाग खाद्यपदार्थाचा ऑर्डर दिला आणि आणल्यावर कुणाचे लक्ष नाही, असे पाहून टेबलाच्या खाली सांडवला. शिवाय दीपकला दोष दिला की, तू तो पदार्थ टेबलवर नीट न ठेवल्यामुळे खाली पडला. मग दीपकला स्वच्छ करायला सांगितले. त्याच हॉटेलमध्ये टिना नावाची १६ वर्षांची एक भारतीय मुलगीसुद्धा वेटर होती. तिने हे सगळे काय घडतेय ते पाहिले.

दीपकचा सगळ्यांना मदत करण्याचा नम्र स्वभाव तिला व तेथील सर्वांनाच आवडायचा. त्यांना ती आपल्या वडिलांसारखा मान द्यायची. अमेरिकेतील कोरोनाच्या काळात दीपकच्या बायकोला कोरोना झाला.

तिला वाचवण्याच्या प्रयत्नात त्याचे खूपच आर्थिक नुकसानतर झाले व त्याचा व्यवसाय पूर्ण बंद पडला. शेवटी तिचा मृत्यू झाला. त्यांना काहीच मूलबाळ नव्हते. तेव्हापासून सुरेश मनाने खचला व एकटा पडला. पण पोटाची खळगी भरण्यासाठी शेवटी त्याने वेटरची नोकरी जॉईन केली. ही सर्व माहिती टिनाला असल्यामुळे ती जमेल तशी त्याची काळजी घ्यायची.

नुकत्याच घडलेल्या प्रसंगात सुरेशने दीपकला त्रास दिलेला पाहून तिला सुरेशची चीड आली. दुष्ट सुरेशने जाण्यापूर्वी मॅनेजरला सांगितले की, दीपक कसा वेंधळा आहे.तुम्ही तरुण लोकच ठेवत जा. मॅनेजरने दीपकला बोलावून दाटले व नवीन नोकरी शोधायला सांगितले. स्टाफमधील सगळेच लोक दीपकचे चाहते व हितचिंतक होते. मॅनेजर मात्र नवीन होता.टिनाने तेथील कॅमेऱ्याच्या फुटेजची कॉपी तेथील सुरक्षा अधिकाऱ्याला दाखवण्याची विनंती केली.

दीपकसाठी त्यानेसुद्धा ती विनंती मान्यकरून कॉम्प्युटरवर त्या प्रसंगाचे सगळे चित्रण टिनाला दाखवले. ते तिने आपल्या मोबाईलमध्ये रेकॉर्ड केले. नंतर त्याच रात्री तिने त्या व्हिडीओ फुटेजचे तुकडे वापरून आपल्या होस्टेलच्या खोलीत बसून एक रील तयार केली व सुरेशचा दुष्टपणा सोशलमीडियावर पोस्ट केला. तो व्हिडीओ बनवताना ती खरोखर खूपच भावुक झाली. तिच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते. दीपक स्वभावाने नम्र व प्रेमळ आहे आणि त्याला लगेच नोकरीची खूप गरज आहे, हे सांगून तिने मदतीचे आवाहन केले तसेच सुरेशबद्दलची चीडसुद्धा त्यात व्यक्त झाली. तिच्या या प्रामाणिक प्रयत्नांमुळे फक्त२० दिवसात तिचा व्हिडीओ खूप व्हायरल झाला.

मदतीचा अक्षरश: महापूर आला आणि दीपकच्या बँक खात्यात एक लाख डॉलर जमा झाले. या सगळ्या प्रकाराबद्दल अनभिज्ञ असलेला दीपक आपल्या खोलीत उदास बसून होता. तिने येऊन त्याला सर्व सांगितले तेव्हा आधी त्याचा विश्वासच बसेना; पण बँकेतील नोंदी पाहून सोशल मीडियाची जादू त्याने पवहिली व त्याचा विश्वास बसला. मग त्याने टिनाच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारली व त्याचा जुना व्यापार पुन्हा उभारला. सुरेशचा दुष्टपणा जगजाहीर झाल्यामुळे त्याची नोकरी गेली!

शिकायचे काय ? तुमच्या जवळ धन असो किंवा नसो; पण संवेदनशील मन असावं. दुसऱ्याच्या मनाची, दु:खाची परिस्थितीची जाण असावी. समाजाबद्दल प्रेम असावं. दुसऱ्याच्या दु:खावर फुंकर घालून प्रेमाने त्यांना यथाशक्ती मदत करून त्यांच्या चेहऱ्यावर हसू आणायचा प्रामाणिक प्रयत्न असावा, आपसात विश्वास असावा... तेच खरे यशस्वी जीवन! हाच संदेश या गीतात आहे. १६ जानेवारी १९५९ साली प्रदर्शित झालेल्या 'अनाडी' या चित्रपटातील राजकपूर यांच्यावर 'किसी की मुस्कुराहटों पे हो निसार' हे मधुर गीत चित्रित झाले होते. गायक मुकेश, गीतकार शैलेन्द्र व संगीतकार शंकरजयकिशन यांची ही अजरामर कलाकृती.

किसी की मुस्कुराहटों पे हो निसार किसी का दर्द मिल सके तो ले उधार किसी के वास्ते हो तेरे दिल में प्यार जीना इसी का नाम है...

माना अपनी जेब से फ़क़ीर हैं फिर भी यारों दिल के हम अमीर हैं मिटे जो प्यार के लिए वो ज़िन्दगी जले बहार के लिये वो ज़िन्दगी किसी को हो न हो हमें तो ऐतबार जीना इसी का नाम है...

रिश्ता दिल से दिल के ऐतबार का ज़िन्दा है हमीं से नाम प्यार का कि मर के भी किसी को याद आएंगे किसी के आंसुओं में मुस्कुराएंगे कहेगा फूल हर कली से बार बार जीना इसी का नाम है... (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## दिसे विटेवरी । आत्मरूप ।।

मनीचे तरंग । आत्ममग्न व्हावे ।।
अंतरी रूजावे शांतीब्रह्म ।।१।।

एकांती घडावा । आत्म्याशी संवाद ।।
आणिकांशी वाद । नको जीवा ।।२।।

तुटता तुटेना । पाश विकारांचा ।।
त्यात संसाराचा । घोळ सारा ।।३।।

पिढीजात दु:ख । जहागिरी माझी ।।
काळा भीती तुझी । कैसी सांग ।।४।।

एकतारी गुंजे । देहाच्या गाभारी ।।
दिसे विटेवरी । आत्मरूप ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## असे जगावे, असे जगावे...

कर्तव्यपथावरील प्रतिष्ठित
आत्मनिर्भर सन्मानित महिला..!
लढाऊ धैर्यशील साहसी निर्भय
पराक्रमी अस्तित्व अस्मिता असलेल्या महिला !
गगनाला गवसणी घालणाऱ्या
वायुकन्या जलमार्गाने रक्षण करणाऱ्या जलकन्या..
युद्धात शत्रूला नमविणाऱ्या
भूमिकन्या चांद्रयानाच्या
प्रयोगात सहयोगी राष्ट्रकन्या...
स्वरक्षित सुशिक्षित स्वयंसिद्धा सबल,
सशक्त, सक्षम महिला व्हावे !.
स्त्रीने आदर्शातून अभिमानाने
सांगावे असे जगावे, असे जगावे, असे जगावे..!

मीना खोंड

## अबला नाही... मी दुर्गा

मी दुर्गा अबला म्हणून नका घेऊ कधी गैरफायदा माझा
कोणी... बदलुनी क्षणार्धात दाखवीन मी माझी अद्भुत
शक्ती घेईन तलवार हाती, होईन झाशींची राणी लक्ष्मीबाई
बनेन तारा राणी, पाजून मोगलां सह्याद्रींचे पाणी नाही
मक्तेदारी पुरुषांची, आहे मी आनंदी जोशी घेण्या शोध ग्रह
ताऱ्यांचा जाईन मी अवकाशी बनेन सुनीता विलियम्स,
कल्पना चावला लेखू नका तुच्छ मला,
नाही मी कशात कमी होईन सायना नेहवाल दाखवीन
भरारी कर्तृत्वाची उसळेन मी, चमकेन मी कडाडणाऱ्या
बिजलीपरी करून दाखवीन अशक्याला शक्य घालून
यशाला गवसणी बनविते तुमचे जीवन परिपूर्ण माझ्या
कार्यातुनी भान असू दे सदैव तुम्हा सन्मान,
आदर जपण्याचे स्वार्थी नजर ठेवून नका मजवरी हेच मागणे
माझे समजू नका दुर्बल मला मानव वंश माझ्याच पोटी

अशोक जोशी

# अब्जाधीश, खादी, रिअल इस्टेट झळाळली

अर्थोद्योग

महेश देशपांडे

**स**रत्या आठवड्यात विविधरंगी बातम्यांची बहार अनुभवायला मिळाली. वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये या लक्षवेधी घडामोडी आकाराला आल्या. सर्वप्रथम पुढे आलेले खास वृत्त म्हणजे महाकुंभात १२ कोटींच्या खादीची विक्री झाली. दुसरीकडे भारत आता रशिया, इराणऐवजी अमेरिकेतून इंधन आयात करणार असल्याचे समोर आले. याच सुमारास भारतात अब्जाधीशांची संख्या वाढणार असल्याचा निष्कर्ष समोर आला. आणखी एक लक्षवेधी वृत्त म्हणजे छोट्या शहरांतील रिअल इस्टेटमधील गुंतवणूक फायद्याची ठरत असल्याचे दिसून आले आहे.

प्रयागराज येथे १४ जानेवारी ते २७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत महाकुंभदरम्यान राष्ट्रीय स्तरावरील खादी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यात १२.०२ कोटी रुपयांच्या खादी उत्पादनांची ऐतिहासिक विक्री नोंदविण्यात आली होती. खादी ग्रामोद्योग आयोगाचे अध्यक्ष मनोजकुमार यांनी सांगितले की, प्रदर्शनात खादी उत्पादनांचे ९८ स्टॉल्स आणि ५४ ग्रामोद्योग स्टॉल्स लावण्यात आले होते. यामध्ये खादी उत्पादनांची विक्री ९.७६ कोटी रुपये तर ग्रामीण उद्योग उत्पादनांची विक्री २.२६ कोटी रुपये होती. यावेळी सहा राज्यांमधील २०५ मधुमक्षिका पालकांना २,०५० मधमशांच्या पेट्या, मध वसाहती आणि टूलकिटचे वाटप करण्यात आले. मधमाशी पाळणाऱ्यांना मधमाशांच्या पेट्या वाटप करण्यासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाने २०१७ मध्ये 'हनी मिशन' लाँच केले. त्याअंतर्गत आतापर्यंत २० हजारांहून अधिक लाभार्थींना दोन लाख मधमाश्यांच्या पेट्या देण्यात आल्या आहेत. 'मन की बात'च्या ७५ व्या भागात मधुमक्षिका पालनाच्या फायद्यांविषयी चर्चा करताना पंतप्रधानांनी मधाव्यतिरिक्त मेण हेदेखील उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे, या मुद्यावर भर दिला होता.

सूक्ष्म आणि लघु उद्योग मंत्रालयाच्या माहितीनुसार औषधे, खाद्यपदार्थ, कपडे आणि सौंदर्यप्रसाधने बनवण्यासाठी मेणाची मोठी मागणी आहे. त्यामुळे अधिकाधिक शेतकऱ्यांनी मधुमक्षिका पालनात सहभागी व्हायला हवे. त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढेल. त्यांच्या जीवनात गोडवा येईल आणि देश मध उत्पादनात स्वावलंबी होईल, असे मनोज कुमार यांनी सांगितले. खादी क्षेत्रातील गेल्या १० वर्षांमधील कामगिरीबद्दल बोलताना मनोजकुमार म्हणाले

> सरत्या आठवड्यात विविधरंगी बातम्या झळकल्या. सर्वप्रथम पुढे आलेले खास वृत्त म्हणजे महाकुंभात १२ कोटींच्या खादीची विक्री झाली. दुसरीकडे भारत आता रशिया, इराणऐवजी अमेरिकेतून इंधन आयात करणार असल्याचे समोर आले. याच सुमारास भारतात अब्जाधीशांची संख्या वाढणार असल्याचा निष्कर्ष समोर आला. याच वेळी रिअल इस्टेट क्षेत्रात छोट्या शहरांमधील गुंतवणूक फायद्याची ठरत असल्याचे दिसून आले.

की, खादी आणि ग्रामोद्योग उत्पादनांच्या विक्रीमध्ये पाचपटीने वाढ झाली आहे. ३१ हजार कोटी रुपयांवरून १ लाख ५५ हजार कोटी रुपयांपर्यंत विक्री वाढली आहे. एकट्या खादी कापडाच्या विक्रीमध्ये १ हजार ८१ कोटी रुपयांवरून ६ हजार ४९६ कोटी रुपये अशी सहापट वाढ झाली आहे. गेल्या आर्थिक वर्षात १०.१७ लाख नवीन नोकऱ्याही निर्माण झाल्या आहेत. गेल्या दशकात खादी कारागिरांच्या उत्पन्नात २१३ टक्क्यांनी वाढ झाली असून त्यापैकी ८० टक्क्यांहून अधिक नोकऱ्या महिलांसाठी निर्माण झाल्या आहेत.

दरम्यान, अमेरिकेतून भारताला कच्च्या तेलाची निर्यात गेल्या महिन्यात दोन वर्षांमधील सर्वोच्च पातळीवर पोहोचली आहे. रशियन तेल उत्पादक आणि टँकर्सवर अमेरिकेने घातलेल्या निर्बंधानंतर भारत पर्यायी पुरवठादारांच्या शोधात होता. 'केप्लेअर'च्या जहाज ट्रॅकिंग डेटावरून दिसून आले आहे की, जगातील तिसरा सर्वात मोठा आयातदार आणि तेलाचा ग्राहक असलेल्या भारताला अमेरिकेतून ३ लाख ५७ हजार पिंप प्रतिदिन कच्च्या तेलाची निर्यात होते. गेल्या वर्षी ही निर्यात २ लाख २१



हजार पिंप प्रतिदिन होती. भारताला कच्च्या तेलाच्या निर्यातीत झालेली ही वाढ हा संकेत आहे की, इराण आणि रशियामधून तेल आणणाऱ्या जहाजांवर आणि कंपन्यांवर अमेरिकेने ऑक्टोबरपासून लादलेल्या निर्बंधांच्या अनेक फेऱ्यांनंतर भारताला या देशांसोबत कच्च्या तेलाचा व्यापार करण्यात अडचणी येत आहेत. भारताने गेल्या महिन्यात म्हटले होते की, अमेरिकेकडून गेल्या वर्षीच्या १५ अब्ज डॉलरवरून नजीकच्या भविष्यात २५ अब्ज डॉलरपर्यंत इंधन खरेदी वाढू शकते. 'शिप ट्रॅकिंग फर्म व्होर्टेक्सा'चे वरिष्ठ विश्लेषक रोहित राठोड म्हणाले की, अलिकडे रशियन जहाजांवर अमेरिकेने लादलेल्या निर्बंधांमुळे भारत इतर ठिकाणांहून कच्च्या तेलाचा पुरवठा शोधत आहे. त्यासाठी प्रमुख खरेदीदारांमध्ये इंडियन ऑईल कॉर्पोरेशन, रिलायन्स इंडस्ट्रिज आणि भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशनचा समावेश आहे, तर सर्वात जास्त तेल ऑक्सिडेंटल पेट्रोलियम, इक्विनॉर आणि एक्सॉन मोबिल आणि ट्रेडिंग हाऊस गुन्व्हर सारख्या अमेरिकेतील तेल उत्पादक कंपन्यांकडून विकले गेले. आता एक खास बातमी. भारतातील श्रीमंत लोकांची संख्या सतत वाढत आहे. 'नाईट फ्रँक' या जागतिक मालमत्ता सल्लागार संस्थेच्या अहवालानुसार १० दशलक्ष डॉलर पेक्षा जास्त मालमत्ता असलेल्या भारतीयांची संख्या गेल्या वर्षी सहा टक्क्यांनी वाढून ८५ हजार ६९८ झाली आहे. २०२३ मध्ये ही संख्या ८० हजार ६८६ होती. अर्थव्यवस्थेतील स्थैर्य आणि अन्य कारणांमुळे भारतात अब्जाधीशांच्या संख्येत भर पडणार आहे. 'नाईट फ्रँक'चा अंदाज आहे की, २०२८ पर्यंत भारतात उच्च निव्वळ मालमत्ता असलेल्यांची संख्या ९३ हजार ७५३ पर्यंत वाढेल. ही वाढ भारताचा मजबूत आर्थिक विकास दर, गुंतवणुकीच्या वाढत्या संधी आणि लक्झरी मार्केटचा विस्तार दर्शवते.

भारतातील 'एचएनडबल्यूआय'ची संख्या २०२४ मध्ये ८५ हजार ६९८ पर्यंत पोहोचली असण्याची शक्यता आहे. २०२३ च्या तुलनेत ती सहा टक्के जास्त आहे. ही संख्या २०२८ पर्यंत ९३ हजार ७५३ पर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. करोडपतींशिवाय अब्जाधीशांच्या संख्येतही मोठी उडी दिसून आली आहे. २०२४ मध्ये भारतातील अब्जाधीशांची संख्या १९१ पर्यंत वाढेल. गेल्या वर्षी २६ नवे अब्जाधीश निर्माण झाले. २०१९ मध्ये ही संख्या फक्त सात होती. भारतीय अब्जाधीशांची एकूण संपत्ती ९५० अब्ज डॉलर (सुमारे ७९ लाख कोटी रुपये) आहे.



ही आकडेवारी भारताला जगात तिसऱ्या क्रमांकावर आणते. अमेरिका पहिल्या स्थानावर तर चीन (१.३४ ट्रिलियन डॉलर) दुसऱ्या स्थानावर आहे. 'फोर्ब्स'च्या अहवालानुसार २०२४ मध्ये जगभरातील ७८ देशांमध्ये २ हजार ७८१ अब्जाधीश होते. यामध्ये सर्वाधिक अब्जाधीश अमेरिकेत आहेत. भारताने या यादीत तिसरे स्थान पटकावले आहे. रिअल इस्टेट क्षेत्राचे भवितव्य आता दिल्ली-मुंबई-बंगळुरूसारख्या मोठ्या मेट्रो शहरांनी लिहिलेले नाही, तर देशातील टियर-२ आणि टियर-३ शहरांनी लिहिले आहे. रिअल इस्टेट क्षेत्रातील आघाडीची संस्था 'क्रेडाई' आणि 'लियाझ फोराज' यांच्या संयुक्त अभ्यासात अनेक अनोख्या गोष्टी समोर आल्या आहेत. डेटा विश्लेषणाच्या आधारे आढळून आले की, विकासकांनी २०२४ मध्ये एकूण ३,२९४ एकर जमिनीची खरेदी आणि विक्री केली आहे. यातील टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये सुमारे ४४ टक्के जमीन खरेदी करण्यात आली. पायाभूत सुविधांमध्ये सरकारच्या मोठ्या गुंतवणुकीमुळे छोट्या शहरांची कनेक्टिव्हिटी सुधारली आहे. त्याच वेळी ही शहरे खर्चाच्या बाबतीत अजूनही परवडणारी आहेत. त्यामुळे या शहरांमध्ये निवासी आणि व्यावसायिक वाढीच्या दृष्टीने लोकांची गुंतवणूक वाढत आहे. खरेदी केल्या गेलेल्या जमिनीपैकी जवळपास निम्मी जमीन विकासकांनी छोट्या शहरांमध्ये खरेदी केली आहे. या ६० छोट्या शहरांमध्ये घरांची विक्री २० टक्क्यांनी वाढली आहे. एकूण ६ लाख ८१ हजार १३८ निवासी युनिट्सची विक्री झाली आहे. मूल्याच्या दृष्टीने पाहिल्यास ही वाढ ४३ टक्क्यांनी वाढून ७.५ लाख कोटी रुपये झाली आहे. आलिशान घरांच्या विक्रीमुळे या वाढीला मोठी मदत झाली आहे. भारताच्या रिअल इस्टेट बाजाराचा आकार २२.५ लाख कोटी रुपये आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेत त्याचे योगदान ७.२ टक्के आहे. रिअल इस्टेटसाठी उदयोन्मुख बाजारपेठांमध्ये गाझियाबाद, नोएडा, कल्याण, ठाणे यांसारख्या मोठ्या शहरांमधील सॅटेलाईट शहरांचा समावेश होतो. लखनऊ, जयपूर आणि भुवनेश्वर या राज्यांच्या राजधानीदेखील या श्रेणीत येतात. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)



वसंतोत्सव म्हणजे खर्या अर्थाने निसर्गाचा एक उत्सव आहे. सर्वसामान्यपणे कोणत्याही ऋतूतील निसर्ग म्हणजे नितळ आणि निर्मळ सौंदर्याचा खजिना असतो. त्यातही ऋतूंचा राजा वसंत म्हटला की, त्याच्या सौंदर्यात राजेशाही थाट येणारच. कुंडीतल्या फुलांपासून माळरानावरील पळस, काटेसावरी, पळसपांगरा आणि अगदी बाभूळ सुद्धा अशा झाडाझुडपांच्या डोईवर कधी लाल, केसरी तर कधी गर्द पिवळा फुलांचा साज घेऊन उभा असलेला वसंत मला डोक्यावर निसर्गाचे प्रतीक म्हणून मोराचे पीस धारण केल्याप्रमाणे विलोभनीय वाटतो. वसंत रानात असतो, वसंत गाण्यात असतो, वसंत मनात असतो आणि वसंत जगण्यात सुद्धा असतो. निसर्ग आणि मानव या एकाच नाण्याच्या दोन बाजू असून वसंत जसा निसर्गात असतो तसेच आपल्या जगण्यात सुद्धा असतो.



# हरवू नये ह्या जगण्यातला वसंत...!

ऋतूरंग.....

किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

वसंतात सुरुवातीला पानगळीच्या काळात अंगावरची हिरवीगार शाल पिवळ्या पानाच्या रूपाने निखळून पडत असताना ज्या वेदना त्या झाडाला होत असतील त्याचा ठाव आपल्याला लागणे कठीण आहे. मूळ, खोड, फांद्या, देठ अशा प्रवासातून कोवळ्या पानापासून गर्द हिरवळ अंगावर पांघरायची आणि उदास ओसाड मनाने एक एक करून पान गाळायचे, पिंपळासारखी, वडासारखी, पळस आणि काटेसावरीसारखी काही झाडे तर अगदी बोडकी होऊन जातात.

एकही पान त्यांच्या जवळ शिल्लक उरत नाही, गुलमोहरही तसाच, पानझडीनंतर या काही झाडांकडे पाहिले की, असं वाटतं संपलं सारं...! आयुष्याच्या वळणावर प्रचंड उदासी एकाकीपण झेलणाऱ्या झाडांवर त्याचेच अवयव असलेले पाने आणि फुले तर दिसतच नाही त्याशिवाय झाडावरचे पाखरे ही झाडाला एकटं सोडून गेलेले दिसतात. जोपर्यंत समृद्धता तुमच्याजवळ आहे. तोवर सगळा लवाजमा तुमच्या खातरदारीस हजर असतो आणि एकदा वैभवाचा म्हणा की सौंदर्याचा म्हणा बहर संपून गेला की, पानगळीचे उदास ऋतू दाटून घेतात.

पाने, फळे, फुले नसलेल्या झाडांवर नाही म्हणायला एखादा दुसरा कावळ्याचा खोपा आपलं अस्तित्व राखून असतो. मात्र, त्यात कावळा दिसत नाही. असे एकाकी पडलेले खोपे पाहिले की, गाव खेड्यातून कामा अभावी शहरात स्थलांतरित झालेले अनेक जीव आठवतात. पंखात बळ आल्यावर उडून जाणार्या पक्षांच्या पिलाप्रमाणे नवी पिढी शहर जवळ करत आहे आणि पानझडल्या झाडावर उरलेल्या काड्या काट्यामधून एखादा आर्त व्याकुळ पक्षी जुन्या खोप्यापाशी बसून झाडाला फुटणाऱ्या पालवीमधून वसंताचे चैतन्य पाहून आनंदाने गात असतो. तेव्हा तो वसंतातल्या तुकाराम बीजेसाठी मंदिराच्या पारावर जमलेल्या आणि घरातील दुभंगलेपण तुकोबाच्या अभंगात तल्लीन होत विसरणाऱ्या म्हाताऱ्या टाळकऱ्यासारखा वाटतो, जो बहरलेल्या ऋतूत सोडून गेलेल्या पाखरांना हरिनामाच्या बेहोशीत तल्लीन होऊन विसरतो.

निष्पर्ण आणि निष्पुष्प उदासीचा काळ अनेकांच्या जीवनात येतो. मात्र, या पानगळीनंतर मोहरून आलेला वसंत फार कमी लोक जगत असतात, जागवत असतात. आदिलशाहीतील सरदार मुरार जगदेव याने पुण्यात प्रचंड लुटालुट केली. अख्खं पुण जाळून बेचिराख केलं संपूर्ण पुणे शहर उध्वस्त झालं होतं. मुरार जगदेवने जमिनीत खोचलेली एक पहार त्यावर अडकवलेली चप्पल आणि फुटकी कवडी एवढचं ठेवलं याचा अर्थ या गावात आता कोणीही राहायचं नाही अथवा कोणतही पिक घ्यायचं नाही. पुण्यासारख्या समृद्ध शहरावरून गाढवाचा नांगर फिरावा तशी अवकळा आली असे म्हटले जाते ही उध्वस्त अवकळा पानगळीमध्ये हिरवळ गमावलेल्या उदास आणि ओसाड झाडांसह अस्तित्व हरवलेल्या शिशिर ऋतूसारखी असेल. मात्र, शहाजीराजांकडे त्या शहराची जहागिरी परत आल्यावर बाल शिव-ाजी आणि राष्ट्रमाता जिजाऊ यांनी याच शहरातून सोन्याचा नांगर फिरवून जो कायापालट केला त्याची संपन्नता पानगळीनंतर पाना-फुलांनी बघून आलेल्या समृद्ध वसंताप्रमाणे असावी नाही का?

दुष्काळात सावकारी बुडाल्यावर आणि सर्व कर्ज वह्या इंद्रायणीत बुडवून आल्यावर तुकारामाच्या अभंगातून जीवनाची जी नवलास उगवली तो पानगळीनंतरचा मधुमास होय. वसंत स्वतः उन्हात तापून फुलांची गर्द छाया देत असतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जीवन उन्हाने भरलेल्या पण जीवनाची स्फूर्ती देणार्या वसंतासारखेच म्हणूनच सुरेश भटांनी त्यांना आपल्या कवितेतून शब्द वंदना देताना; हे वसंता घे मनाच्या मोहरांची वंदना; असे म्हटले आहे. वसंत म्हणजे मनाला आणि जगण्याला मोहर फुलवणारा ऋतू होय.

वसंत हा जगण्याचा एक चैतन्यमय काळ आहे किंवा माणसाच्या चैतन्यमय जगण्याला सुद्धा आपण वसंत म्हणायला हरकत नाही. जगण्यातील वसंत फुलून येतो तेव्हा पाना- फुलांनी डवरलेल्या वृक्षावर जशी पाखरांची किलबिल सुरू असते तशी आयुष्यात अनेक नात्यांची वर्दळ असते. आंब्याचा मोहोराचा असो की पाडाला पिकलेल्या आंब्याचा.... वसंतात वाहणारा वारा जीवनात सुगंध पसरून देण्यासाठीच वाहत असतो. झाडाच्या वाळलेल्या पानातून येणारा आवाज भरलेल्या घरातील लेकरांच्या गुंजारवासारखा अल्लड आणि अवखळ वाटतो.

पिंपळाच्या झाडावरचे पान आणि पान गळून पडल्यानंतर पुन्हा नव्याने लालसर ओल्या हिरव्या नाजूक पानांसह जे जीवन पेरते ते जीवन तथागत गौतमाला नवी जाणीव देणारे, जीवन विषयक ज्ञान देणारे वाटले. संपूर्ण झडून जाऊन वसंतात नवे संजीवन पेरणारा पिंपळवृक्ष फक्त स्वतःच्या मोठ्या आकारामुळे आणि गर्द सावलीमुळे गौतमाने तपश्चर्येसाठी निवडला नसावा तर त्या तथागताने सर्व काही गमावून पुन्हा नव्याने उभे राहण्याची वृत्ती ह्या पिंपळ वृक्षात पाहिली असावी आणि म्हणूनच पाहता पाहता पिंपळवृक्ष बोधी वृक्ष म्हणून ओळखला जाऊ लागला असावा.

माणसाच्या जगण्यात वसंत ऋतूच्या जाणिवा समृद्धपणे पेरल्या गेलेल्या असल्या तर फिनिक्स पक्ष्यांच्याप्रमाणे राखेतून जसा नवा फिनिक्स जन्म घेतो त्याच पद्धतीने वसंत ऋतूमध्ये आपला पूर्ण पर्णसांभार गळून गेल्यावर कोवळ्या पानासह, रंगीत पुष्प आणि मधुर फळे यासह झाडा झुडपातुन जो सळसळत प्रसन्नतेने उभा राहतो, तो ऋतू म्हणजे वसंत होय. चैत्राच आगमन म्हणजे वसंत ऋतूतील उत्साहाची उल्हासाची, रंगाची आणि गंधाची उधळण करणारी परिसीमा होय.

जोपर्यंत वसंतातील रंगोत्सव आणि गंधोत्सव शाश्वत आहे. तोवर जगण्याच्या रंगात कितीही व्यापारीकरण, यांत्रिकीकरण, हेवेदावे, आपसी मतभेद, स्वार्थ, भ्रष्टता मिसळली गेली तरी एका निर्मळ क्षणी वसंतातील नितळता आणि प्रसन्नता आकारास येणार आणि उदास, अमंगल अशा जाणीवांच्या पुढे जाऊन जीवनात आणि जगण्यात प्रसन्नतेची पालवी आश्वासन रूपात आकारास येणार हे नक्की.... म्हणूनच कधी कधी वाटते, जोवर वसंत, तोवर तुम्ही आम्ही जिवंत...! त्यामुळे धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनात सर्व हरवले तरी चालेल मात्र जगण्यातील वसंत हरवू देऊ नका. कारण वसंत हरवला म्हणजे जगण्यात ना रस उरतो ना जिव्हाळा.

पान१ वरून

## भारताचे आधुनिक व्हिसा व स्थलांतरण धोरण

परंतु, राष्ट्रीय सुरक्षा आणि लोकसंख्याशास्त्रीय स्थैर्य राखण्यासाठी स्थलांतरण धोरण अधिक नियंत्रित ठेवले जात आहे. या पार्श्वभूमीवर, राष्ट्रीय सुरक्षा कायम राखत 'व्हिसा आणि स्थलांतरण' व्यवस्थेला अधिक उदार करण्यासाठी गेल्या काही वर्षांत भारतातील गृहमंत्रालयाने क्रांतिकारी सुधारणा केल्या आहेत. २०१४ साली 'ई-व्हिसा' प्रणाली सुरू करण्यात आली, जी आता 'कोविड'नंतर १६९ देशांसाठी लागू करण्यात आली आहे. याअंतर्गत 'ई-पर्यटन', 'ई-बिझनेस', 'ई-मेडिकल', 'ई-आयुष', 'ई-स्टुडंट' यांसह नऊ प्रकारच्या व्हिसा सुविधा, ३१ आंतरराष्ट्रीय विमानतळांवर व सहा प्रमुख बंदरांवर पुरवण्यात येत आहे. यामुळे भारतात येणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढली असून, व्हिसा प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी काही आठवड्यांवरून फक्त एका दिवसावर आणण्यात आला आहे. तसेच, 'व्हिसा ऑन अरायव्हय' सुविधा जपान, दक्षिण कोरिया आणि युएई या देशांसाठी लागू करण्यात आली आहे, ज्यामुळे व्यापार आणि पर्यटनाला चालना मिळाली आहे. भारतातील व्हिसा व्यवस्थापन अधिक पारदर्शक आणि गतिमान करण्यासाठी 'ई-एफआरआरओ' प्रणाली सुरू करण्यात आली आहे. यामुळे विदेशी नागरिकांसाठी व्हिसा नोंदणी, मुदतवाढ, राहण्यासंबंधी परवानगी आणि प्रवास व्यवस्थापन ऑनलाईन शक्य झाले आहे. याशिवाय, 'सू-स्वागतम' मोबाईल ॲप लाँच करण्यात आले आहे, जे ६० देशांसाठी १३ परदेशी भाषांमध्ये उपलब्ध आहे. गृहमंत्रालयाच्या दूरदर्शी दृष्टिकोनातून साकारलेला 'विश्वसनीय प्रवासी' कार्यक्रम म्हणजेच 'फास्ट ट्रॅक इमिग्रेशन-ट्रस्टेड ट्रॅव्हलर प्रोग्राम' हा भारताच्या स्थलांतरण व्यवस्थापनातील एक महत्त्वपूर्ण बदल आहे. मानवी हस्तक्षेपाशिवाय बोर्डिंग पास आणि पासपोर्ट स्कॅन करून प्रवासी सहजपणे सीमा ओलांडू शकतात. ज्यामुळे इमिग्रेशनसाठी लागणारा वेळ अडीच-तीन मिनिटांवरून कमी होऊन अवघ्या ३० सेकंदांवर आला आहे. ही सुविधा सध्या दिल्ली, मुंबई, चेन्नई, कोलकाता, बंगळुरु, हैदराबाद, कोची आणि अहमदाबाद या प्रमुख आंतरराष्ट्रीय विमानतळांवर उपलब्ध आहे आणि लवकरच ती २१ विमानतळांवर विस्तारली जाणार आहे. हा भारताच्या प्रगत आणि डिजिटल युगातील महत्त्वाचा टप्पा आहे.

भारतातील शिक्षणाची जागतिक मान्यता वाढत आहे. त्यादृष्टीने जागतिक विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी गृहमंत्रालयाने 'स्टडी इन इंडिया' हे पोर्टलदेखील सुरू केले आहे. ज्याद्वारे परदेशी विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करू शकतात. तसेच, विद्यार्थी आणि संशोधकांसाठी स्वतंत्र व्हिसा श्रेणी निर्माण करण्यात आली आहे.

नागरिकता सुधारणा अंतर्गत 'सीएए' कायद्याच्या अंमलबजावणीसाठी भारतीय नागरिकता ऑनलाईन पोर्टल आणि मोबाईल ॲप सुरू करण्यात आले आहे. व्यवसाय आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी 'ई-कॉन्फरन्स व्हिसा' सुरू करण्यात आला आहे. ज्यामुळे कंपन्या आणि उद्योगसंस्था भारतात विविध व्यावसायिक परिषदांचे आयोजन करू शकतात. २०२५' मांडले असून, हे विधेयक स्थलांतर व्यवस्थापन अधिक सुसूत्र, सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी महत्त्वाचे ठरणार आहे. या विधेयकाद्वारे प्रवाशांसाठी सुलभता आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या गरजा यामधील समतोल राखण्याचा प्रयत्न केला गेला आहे. या नव्या विधेयकाद्वारे सध्या अस्तित्वात असलेले चार कालबाह्य कायदे रद्द करून अधिक सुस्पष्ट आणि आधुनिक स्थलांतरण धोरण निर्माण केले जात आहे. या विधेयकाद्वारे भारताच्या एकात्मतेस धोका ठरू शकणाऱ्या कोणत्याही परदेशी व्यक्तीला भारतात प्रवेशाची किंवा राहण्याची परवानगी नाकारायचे अधिकार दिले गेले आहेत. व्हिसा उल्लंघन, अनधिकृत प्रवेश आणि खोट्या कागदपत्रांचा वापर केल्यास कठोर शिक्षा आणि दंड आकारले जाणार आहेत. तसेच पर्यटन, शिक्षण आणि व्यापार वाढवण्यासाठी व्हिसा प्रक्रियेत सुलभता राखली जाणार आहे. पण, त्याचवेळी भारतीय सीमांची सुरक्षा अधिक मजबूत केली जाणार आहे. हे प्रस्तावित विधेयक म्हणजे, अमित शाहंच्या गृहदक्षतेचे आणखी एक उदाहरण आहे, जे उपनिवेशकालीन तीन आणि युद्धजन्य परिस्थितीत आणलेल्या एका जुन्या कायद्यांच्या जागी आधुनिक स्थलांतरण व्यवस्था प्रस्थापित करत आहे. जागतिक स्थलांतराच्या कायदेशीर, अवैध आणि मानवतावादी पैलूंची जाणीव ठेवून, गृहमंत्रालय राष्ट्रीय सुरक्षेला बळकट करताना कायदेशीर आणि आर्थिक स्थलांतर सुलभ करण्यासाठी सक्षम भूमिका बजावत आहे.

## पाकिस्तानची अवस्था बुडत्याचा पाय खोलात!

ब्रिटिशांच्या काळातही हा सगळा प्रदेश विविध खानांच्या अधिपत्याखाली होता. त्यातील कलात हे सगळ्यात मोठे संस्थान होते. कलातच्या खानाने भारताच्या फाळणीनंतर कलात आणि अन्य संस्थानांसह स्वतंत्र बलुचिस्तान देश तयार व्हावा, यासाठी मोहम्मद अली जिनांना आपला वकील म्हणून नेमले होते. पण, स्वातंत्र्यानंतर पाकिस्तानने लष्करी बळाचा वापर करून, बलुचिस्तानवर ताबा मिळवला. तेव्हापासून विविध बलुची गट स्वातंत्र्यासाठी लढत आहेत. गेल्यावर्षी पाकिस्तानमध्ये निवडणुका झाल्यानंतर बलुचिस्तानमध्ये स्वातंत्र्य संग्रामाची नवीन लाट उसळली. यावेळी पाकिस्तानच्या मदतीने चीन बलुचिस्तानचे शोषण करत असल्याची तक्रार आंदोलनाच्या केंद्रस्थानी होती. चीनने 'बेल्ट रोड' प्रकल्पाच्या अंतर्गत पाकिस्तानमध्ये मोठी गुंतवणूक केली असून, त्यातील अनेक प्रकल्प बलुचिस्तानमध्ये आहेत. ग्वादर बंदरामुळे आसपासच्या लोकांना समुद्रात मासेमारी करता येत नसल्यामुळे त्यांच्यात नाराजी आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी'ने २६ ऑगस्ट २०२४ रोजी मुसाखेल, पिशिन, क्वेटा, सिबि, मस्तुंग, कलात, बोलान, पंजगुर, बेला, तुर्बात, संतसर आणि पासनी येथे हल्ले केले. त्यात पाकिस्तानचे १०२ सैनिक मारले गेल्याचा दावा करण्यात आला. बेला येथील हल्ल्यात एकाच ठिकाणी ४० सैनिकांना मारल्याचा दावा करण्यात आला. दि. २६ ऑगस्ट रोजी बलुचिस्तानचे माजी मुख्यमंत्री नवाब अकबर शाहबाझ खान बुग्ती यांचा स्मृतीदिन आहे. बलूच लोक टोळ्यांमध्ये विभागले असून, त्यात बुग्ती आणि मर्री या टोळ्या सगळ्यात मोठ्या आहेत. गेल्या सात दशकांमध्ये बलुचिस्तानमध्येही छोटी मध्यम शहरे विकसित झाली आहेत. पुढच्या पिढीतील बलूच तरुणांनी पाकिस्तान किंवा ब्रिटन आणि अमेरिकेत जाऊन शिक्षण घेतल्यामुळे त्यांच्यातून नवीन नेतृत्व उदयास आले आहे. त्यांना पाकिस्तानच्या सत्तेमध्ये समान वाटा हवा आहे. आपल्या प्रांतासंबंधीचे निर्णय घेण्याचे अधिकार हवे आहेत. पण, त्यांना विकास प्रक्रियेत सामील न करता, पाकिस्तानने त्यांची चळवळ दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पाकिस्तानने आपल्या पंजाब आणि अन्य प्रांतातून लोक आणून बलुचिस्तानची लोकसंख्या बदलण्याचे प्रयत्न चालवले आहेत.

बलुचिस्तानमधील सशस्त्र टोळ्या इस्लामिक मूलतत्त्ववादी नसून फुटीरतावादी आहेत. त्यांच्यावर डाव्या-साम्यवादी चळवळीचा प्रभाव आहे. बलुचिस्तानच्या स्वातंत्र्यासाठी त्या एकत्र आल्या असल्या, तरी श्रीलंकेतील तामिळ वाघांप्रमाणे एकत्र न लढता विकेंद्रीकृत पद्धतीने त्या लढत आहेत. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे, आज बलूच तरुण आणि तरुणी इंटरनेट आणि समाजमाध्यमांद्वारे आपली बाजू प्रभावीपणे मांडत आहेत. एकीकडे 'बीएलए' आणि अन्य बलूच संघटना सशस्त्र संघर्ष करत असताना, डॉ. महरंग बलूचच्या नेतृत्वाखाली लाखो लोक शांततापूर्ण आंदोलन करत आहेत. बलुचिस्तानप्रमाणेच खैबर पख्तुनख्वा भागातही परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली आहे. तिथे 'तेहरीक-ए-तालिबान' पाकिस्तानचे लोक मोठ्या प्रमाणावर दहशतवादी हल्ले करत आहेत. त्यांना अफगाणिस्तानमधील तालिबानची मदत मिळत आहे. खैबर आणि बलुचिस्तानमधील मूलभूत फरक म्हणजे, बलूच जनतेचा 'बीएलए' आणि अन्य संघटनांना पाठिंबा आहे, तसा खैबर प्रांतामध्ये तालिबानला पाठिंबा नाही. अशा बिकट परिस्थितीतही पाकिस्तान राजकीयदृष्ट्या दुभंगलेला आहे. बलुचिस्तानमधील घटनांमध्ये अमेरिकेचाही सहभाग असू शकतो, असे त्यांना वाटत आहे. त्यामुळे चीन पाकिस्तानच्या मदतीला धावून येईल, अशी त्यांना आशा आहे. चीन धावून आला तरी पाकिस्तानची अवस्था बुडत्याचा पाय खोलात अशी झाली आहे.

## जेन बेबी बुमर आणि लग्न

कथा

डॉ. साधना कुलकर्णी

'मावशी, मज्जा आली की नाही? आता सगळ्या थीम्स फॉलो करायच्या बरं.' नवरदेवाचा लाडिक (अट्टाहास) हट्ट. ''तुझ्या थीम्स फॉलो करताना माझा बँक बॅलन्स हॉलो होतोय, त्याचं काय? अरे मी स्वतःच्या लग्नातही इतक्या साड्या घेतल्या नव्हत्या.'' ''मावशी, तुझं लग्न आता हिस्टॉरिकल इव्हेंट झालंय. त्या १८५७ च्या गोष्टी आणि आमची जनरेशन यात खूप फरक पडलाय.''

खरंच. आमची 'बेबी बुम जनरेशन' कुठे आणि या मुलांची जेन वाय कुठे? जमीन-अस्मानाचा फरक आम्ही स्वतःच अनुभवला आहे. नकळत मी इतिहासात शिरले आणि जेन बेबी बुमची लग्नं डोळ्यासमोर आली. त्या काळातील लग्नात कसल्या आल्या थीम्स? त्यावेळी आमच्या जगण्याचीच एक थीम ठरली होती. ती म्हणजे जेन सायलेंटचे आज्ञापालन करणे! **'सदासर्वदा बोध अमुचाच घ्यावा। विरोधाचा सूर कधी ना निघावा।।'** असं आमच्या मेंदूचं प्रोग्रॅमिंगच करून ठेवलं होतं. (गरीब बिच्चारी आमची पिढी) अपत्य संगोपनाचा सार्वत्रिक अजेंडा म्हणजे मुलांना धाकात ठेवणं, मुलांचं कौतुक न करणं, त्यांचं ऐकून न घेणं... अशा या जेन सायलेंटच्या दहशतवादात, आमच्या लग्नाबाबत काय बोलावं? लग्न या विषयाची आमची प्रश्नपत्रिका कितीही सोपी वा कठीण असो; सोडवणार तर वडीलधारेच. लग्नसमारंभ म्हणजे मज्जा, धमाल, आनंद, एन्जॉयमेंट अशा भलत्याच संकल्पना त्या काळी नव्हत्या. विशेषतः मुलीचं लग्न असेल तर दडपण, ताण, भीती आणि कष्ट हीच थीम असायची. 'वरपक्ष हा कायम वरचढ असतो', 'पसंतीनापसंती ठरवण्याचा अधिकृत अधिकार वरपक्षाचा असतो' हे आमच्या मेंदूवर कोरलेलं ब्रह्मवाक्य. त्यामुळे घरात मुलीच्या लग्नाच्या हालचाली सुरू झाल्या की आयाबायांच्या डोळ्यातून प्रसंगी टिपं गाळण्याची थीम सुरू व्हायची.

एरवी समंजस, सुस्वभावी, सुसंस्कृत असलेली मंडळी वरपक्षाची असली की त्यांची छाती ५६ इंच झालीच समजा. कांदेपोह्यांच्या प्रसंगी मुलीने मान वर करून बघायचं नाही, तर पायाच्या अंगठ्याकडे बघावं अशी आवर्जून सूचना दिली जाई. पायाच्या अंगठ्याने माती उकरणं ही संस्कारी परंपरा, फरशी किंवा टाईल्समुळे कठीण होऊ लागली होती. तरीसुद्धा 'प्रयत्ने फरशी रगडता मातीही निघे' असा बाणा असलेल्या मुलींच्या अंगठ्याला नाहक इजा झाल्याच्या अनेक घटना समोर आल्या. त्यामुळे 'अंगठ्याकडे केवळ बघावं' अशी तरतूद सूचनेत करण्यात आली तसंच मुलीला हसण्याची बंदी असे. मख्ख, गंभीर किंवा तणावात असलेला चेहरा जेन सायलेंटला फारच सोयीचा वाटे. एकदाचा होकार आला की दोन्ही कुटुंबातील वृद्ध, वृद्धतर, वृद्धतम (जेन ग्रेटेस्ट हो) व्यक्तींचा भाव अचानक वाढत असे.

हुंडा, सालंकृत कन्यादान, मानपान, देणीघेणी, मुलामुलीचा कपडा, जाण्यायेण्याचं भाडं, वरात, घोडा ही अस्त्रं-शस्त्रं केव्हा आणि कशी चालवायची... या बाबतीत ही मंडळी अनुभवी. त्यांच्या उपस्थितीतच मंडळींची व्यवहाराची बोलणी होत आणि कुटुंबाच्या जाज्वल्य इतिहासात वृद्धतम खापर पणजोबांच्या खाती नववं लग्न जमवण्याचा विक्रम सुवर्णाक्षरात नोंदवला जाई. असो. तर लग्न जमताक्षणी नवरीसाठी खास आचारसंहिता लावली जाई.

हल्ली प्री वेडिंग फोटोशूट असतं म्हणे (हे नेमकं काय आणि कशासाठी?) जेन बे.बु.तील भावी वधुवरांमध्ये जरासंही खुट्ट झालं की शूट असायचं. 'शूट बाय साईट' हो... म्हणजे जेन सायलेंटची जळजळीत नजर.

लग्नाचा बस्ता ही महत्त्वपूर्ण घटना. दोन्ही पक्षातील महत्त्वाचे आणि मानाचे, अर्थातच जेन ग्रेटेस्ट... असा २०-२५ जणांचा जथ्था लग्नाचा बस्ता खरेदी करायला जाई. कारण विवाह समारंभात मानापमान नाट्य घडू नये म्हणून. नवरीसाठी फक्त पाच (अरेरे!) साड्या. त्यापैकी दोन घरी नेसायला (अरेरेरेरेरे...) आणि तीन लग्नाच्या. त्यावेळी शालूला फार महत्त्व होतं. समोरच्या ढिगातून शालूचा नेमका कोणता रंग घ्यावा, यावर सासूबाईंचं निळ्याकडे तर सासरेबुवांचं हिरव्याकडे बोट.. आणि डोळ्याच्या कोपऱ्यातून मुलीनं हळूच मुलाच्या बोटाकडे बघावं तर ते सद्गृहस्थ शालूंच्या किमतीचे लेबल बघण्यात गुंतलेले. बाकी मंडळी चहाच्या वाटेकडे डोळे लावून, जांभया दाबत बसलेली.

आचारसंहितेमुळे वधुपक्षाला ब्र काढायची परवानगी नसे. परिस्थितीचा नेमका अंदाज आल्याने शेवटी निर्णय आपल्यालाच घ्यायचा आहे हे चाणाक्ष नोकराला समजे. ताईवर गुलाबी रंग किती खुलतो, असं म्हणत गुलाबी शालू बाजूला ठेवी. ठरावीक रंग 'ताईला शोभतो' हा जप करत कमीत कमी वेळात तो ताईची खरेदी निपटून टाकी. त्यानंतर पोटझाकणी, नणंददुरडी, आजीबोंद्री अशा जेन सायलेंटच्या अगम्य विधींसाठी साड्या खरेदी होई. खरेदी संपल्यावर नेमक्या कोणाच्या पसंतीच्या साड्या घेतल्या हे कधीच कुणीच सांगू शकत नसे. वधुपक्षाकडे आता रुखवत अंगात येई. नवरी मुलगी सर्वगुणसंपन्न आहे याचं प्रमाण म्हणजे रुखवत.

युद्धपातळीवर चादरी, उशा, पडदे, टेबल क्लॉथ, रुमाल, साडी यावर भरतकाम, कापसाचा ससा, पेपरमिंटचे तुळशी वृंदावन, आईस्क्रीमच्या काड्यांची होडी, पैशाच्या नाण्यांचं देऊळ... अशा कलात्मकतेशी फारकत घेणाऱ्या आणि प्राथमिक शाळेतील प्रोजेक्टप्रमाणे बाळबोध भासणाऱ्या कलाकृती तयार होत. गोळाफेकीतल्या गोळ्याप्रमाणे अगडबंब लाडू, कासवछाप कॉईलशी स्पर्धा करणाऱ्या चकल्या आणि एका हातात न मावणाऱ्या महाकाय करंज्याही रुखवतासाठी सज्ज होत.

हळदीच्या दिवशी नवरीचा खरा रंग ओळखू येणार नाही आणि पुढील १५ दिवस पिवळा रंग पक्का राहील, याची काळजी घेत घरातील तमाम माउल्या तिला मुक्तहस्ते हळद लावत. माझ्याच लग्नात माझ्या डोळ्यात, नाकात, कानात गेलेल्या हळदीमुळे मला १५ दिवस पिवळ्या रंगाचीच स्वप्नं पडत होती...! लग्नाचं कार्यालय म्हणजे एक मोठ्ठा हॉल.

वरपक्षाला दोन, वधुपक्षाला दोन खोल्या आणि कोठीघर अशा चार खोल्या. वऱ्हाडी मंडळींची संख्या आणि शौचालय, बाथरूम, गाद्या, उशा, चादरी, पंखे यांच्या संख्येचे गुणोत्तर कायम व्यस्त. त्यामुळे इकडे सीमांतपूजन तर दुसरीकडे पंगतीतली जागा आणि पंख्याखालची गादी एकाच वेळी आरक्षित करण्यासाठी मंडळींच्या कोलांट्या, सूरपारंब्या, लांब उडी, उंच उडी यांची प्रात्यक्षिकं! जेवावं तर गादी निसटणार. गादी पकडणार तर उपाशी राहणार, अशी अटीतटीची परिस्थिती. बरं, सीमांत पूजनाचं जेवण तरी कसलं हो? फोडणीचं आंबटगोड वरण, भाजी, पोळ्या, भात. असलाच तर घासभर साखरभात किंवा शिरा. दीड वितीच्या पोटाची खळगी भरणं आणि देहासाठी साडेतीन हाताची गादी... लागतंच काय माणसाला शेवटी? असा साक्षात्कारही (तात्पुरता!) काही पुण्यवान जीवांना त्या प्रसंगी होत असे. पण काहीही म्हणा, हल्लीच्या 'संगीत'पेक्षा हा रिॲलिटी शो नक्कीच अस्सल असे.

**भारत सरकारने १९७२ साली 'पद्मभूषण' देऊन सन्मानीत केलेले, हिंदी भाषेचे विद्वान आणि राम, रामायण आणि समग्र विश्वातील रामकथेचे ख्यातनाम मर्मज्ञ-संशोधक डॉ. कामिल बुल्के यांचा 'रामकथा ... उगम आणि विकास' हा हिंदी भाषेत लिहिलेला शोधप्रबंध जगातील सर्वच विद्यापीठांनी गौरवलेला आहे. रामकथेचा विश्वविख्यात विदेशी अध्ययनकर्ता संशोधक म्हणून डॉ. कामिल बुल्के ओळखले जातात. एक विदेशी गोरा माणूस ईसाई मिशनरी म्हणून भारतात येतो काय आणि हिंदी भाषेवर प्रभुत्व मिळवून रामकथेचा मर्मज्ञ होतो काय, रामकथेचा अभ्याच हीच माझी साधना, म्हणत राममय जीवनाची भारतभूमीत सांगता करतो काय, सारेच आश्चर्यकारक आहे. डॉ.बुल्केचा राम प्रबंध, रामकथेचा विश्वकोश मानला जातो.**

लेखांक ६३

# रामकथांचा विश्वविख्यात विदेशी अभ्यासक, साधक राममय झालेले डॉ. कामिल बुल्के

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**राम तेरा चरित्र स्वयं काव्य है।**
**कोई कवी बन जाये सहज संभव है।**

श्रीरामाची कथा ही सदा सर्वदा प्रेरणेचा स्त्रोत राहिलेली आहे. रामकथेच्या प्रेरणेने अनेक जण कवी झाले, अनेक जण निरुपणकार-भाष्यकार झाले आणि काहीजण अभ्यासक, संशोधक, लेखक झाले. डॉ. कामिल बुल्के अशा रामकथेच्या प्रभावाने राममय झालेले एक थोर अभ्यासक, संशोधक आहेत.

भारतीय ज्ञानसंपदा, संत साहित्य हा विदेशी अभ्यासक संशोधकांचा नेहमीच कुतुहलाचा, जिज्ञासेचा विषय आहे. विदेशातून भारतात येऊन, येथील प्रादेशिक भाषा शिकून, येथील संतसाहित्य, प्राचीन ज्ञान ग्रंथ, आणि तीर्थक्षेत्रे- स्थल माहात्म्ये यांचा अभ्यास करणार्या नामवंत संशोधकांची परंपरा मोठी आहे. केवळ महाराष्टापुरते बोलायचे तर श्रीक्षेत्र पंढरपूर- पांडुरंग आणि मराठी संतसाहित्य याचा अभ्यास-संशोधन करणारांमध्ये फादर जस्टिन ॲबट, डॉ. रिसाईड, डॉ.गुन्थर सोन्थामयर, फादर जी.ए.डलरी, डॉ. एरिक सॅन्ड ही काही नावे महत्त्वाची आहेत. या अभ्यासकांमध्ये दोन ईसाई धर्मप्रचारक (मिशनरी) आहेत हेही लक्षात घेण्यासारखे आहे. (मॅक्समुलर आदी ब्रिटीश काळातील मनी कुटिल षडयंत्राचा भाव बाळगून भारतीय विद्या- ग्रंथाचा अभ्यास करणारे काही विदेशी अभ्यासकही होते.)

डॉ. कामिल बुल्के वयाच्या २५ व्या वर्षी इ.स. १९३४ मध्ये भारतात आले आणि तुलसीदासांच्या रामकथेच्या प्रेमात पडले. राममय होऊन त्यांनी भारतीय नागरिकत्व घेतले. ४८ वर्षाच्या भारत वास्तव्यात राम अध्ययनरत जीवन जगून अखेर दिल्लीत त्यांनी १९८२ साली अंतिम श्वास घेतला. रामकथा हाच त्यांचा ध्यास-अभ्यास होता. त्यासाठी ते हिंदी, अवधी, बृजभाषा शिकले. संस्कृतचाही अभ्यास केला. सदैव विद्यार्थी दशेत वावरले. आपल्या रामकथा प्रेमाविषयी डॉ.बुल्के म्हणतात गोस्वामी तुलसीदासांच्या 'रामचरित्रमानस'ने मला श्रीराम व रामकथेचा महामार्ग दाखवला. वाल्मिकी-तुलसीदास माझ्या अध्ययनाचे दीपस्तंभ आहेत.

स्नेह, वात्सल्य आणि करुणामूर्ती म्हणून ओळखले जाणारे डॉ. कामिल बुल्के यांचा जन्म बेल्जीयम देशातील 'रम्सकपैले' या गावी इ.स.१९०९ साली झाला होता. १९३० साली त्यांनी इंजिनिअरींगची पदवी प्राप्त केली.




एकदा फुटबॉल मैदानावर खेळ संपल्यावर ते एक पुस्तक वाचत असतानाच, आपण संन्यास घेऊन ईसाई मिशनरी व्हावे आणि भारतात जावे असे त्यांच्या मनात आले. जेसुईट ख्रिश्चन धर्मप्रसार संस्थेशी त्यांनी संपर्क केला आणि भारतात पाठवणार असाल तर मी मिशनरी कार्यास जीवन समर्पित करू इच्छितो म्हणत ते ईसाई धर्मप्रचारक (फादर) झाले.

१९३४ मध्ये ते भारतात आले. मुंबई, दार्जिलिंग येथील मिशनमध्ये काम करून ते तत्कालिन बिहारच्या गुमलारांचीमध्ये आले. तेथील ख्रिश्चन महाविद्यालयात गणिताचे प्राध्यापक झाले. आता भारत हीच आपली कर्मभूमी असे मानून त्यांनी हिंदी, बृजभाषा, अवधी भाषा आत्मसात केल्या. पंडित बद्रिप्रसाद शास्त्री हे त्यांचे भाषा गुरू होते. हिंदी समवेतच संस्कृतचाही त्यांना अभ्यास केला. त्यांनी गोस्वामी तुलसीदासजींचे 'रामचरितमानस' वाचले, ऐकले, पंडिजींकडून समजून घेतले आणि ते श्रीराम कथा-तुलसीदास यांचे उपासक झाले.

१९४० प्रयाग विद्यापीठातून त्यांनी हिंदी विशारद पदवी घेतली तर १९४३ साली कलकत्ता विद्यापीठातून संस्कृतची पदव्युत्तर पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी 'रामकथा' हा विषय घेऊन केवळ भारतातीलच नव्हे तर देशविदेशातील रामकथांचा शोध घेऊन अत्यंत तार्किक व वैज्ञानिक निकषावर पीएच.डी.चा प्रबंध लिहिला. 'रामकथा उदय आणि विकास' या त्यांच्या प्रबंधास १९४५ मध्ये प्रयाग विद्यापीठाने पीएच.डी देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ. माताप्रसाद गुप्त हे त्यांचे प्रबंध मार्गदर्शक होते. विशेष म्हणजे डॉ.बुल्के यांनी हट्टाने आपला प्रबंध इंग्रजीत न लिहिताच हिंदीतून लिहिला. तेव्हा प्रबंध फक्त इंग्रजीतच मान्य केले जात होते. डॉ.बुल्केच्या हट्टापायी विद्यापीठाने नियमात बदल केला. डॉ.बुल्के हे हिंदी भाषेत प्रबंध लिहिणारे पहिले विद्यार्थी ठरले. डॉ. बुल्के हे आज 'हिंदीचे विद्वान, भाषातज्ज्ञ' आणि 'रामकथेचे मर्मज्ञ' म्हणून जगभर ओळखले जातात.



भारत सरकारच्या केंद्रीय हिंदी समितीचे सदस्य म्हणून त्याचे योगदान मोठे आहे. त्यांचे 'हिंदी-इंग्रजी शब्दकोशाचे' कार्य, आणि त्यांचा 'रामकथा ... उदय आणि विकास' हा जगविख्यात प्रबंध याची दखल घेऊन १९७२ साली भारत सरकारने बुल्के यांचा 'पद्मभूषण' या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरव केलेला आहे. 'रामकथा ... उदय आणि विकास' या पुस्तकांच्या आजवर २९ आवृत्त्या प्रकाशित झालेल्या आहेत.

डॉ.कामिल बुल्के यांनी जगभरातील रामकथांचा जेव्हढा व्यापक शोध घेतला तेव्हढा आजवर अन्य कोणाही अभ्यासकाने घेतलेला नाही. त्यांचा अभ्यास-लेखन भाबडे नाही, तर पूर्णत... तार्किक, चिकित्सक आणि वैज्ञानिक पद्धतीने केलेले आहे. वाल्मिकी रामायण हे महाकाव्य श्रेष्ठ दर्जाचे असून राम हे काल्पनिक पात्र नाही तर तो भारताच्या इतिहासातील एक इतिहासपुरुष आहे. असे डॉ. बुल्के यांनी ठामपणे साधार प्रतिपादन केलेले आहे. 'रामकथा ... उगम आणि विकास' या प्रबंधामध्ये ५ प्रकरणे (अध्याय) आहेत.

१) वैदिक साहित्य आणि रामकथा (वाल्मिकी कृत रामायण, महाभारत, बौद्ध, जैन रामायणे),

२) रामकथेची उत्पत्ति (विविध मतांचा उहापोह)

३) अर्वाचिन रामकथा (सर्व प्रादेशिक, भाषिक व विदेशात रामकथाचा आढावा), ४) रामकथेचा विकास (प्रत्येक कांडाचे विश्लेषण व मतमतांतरे),

५) उपसंहार (निष्कर्ष). रामकथेची शोध यात्रा ही माझी अध्यात्मिक 'साधना' आहे, रामकथेचा विश्वसंचार हा भारतीय संस्कृतीचा दिग्विजय आहे असे डॉ.बुल्के म्हणतात.

**।। जय श्रीराम।।**



# हवामान बदलाला पुरुन उरायचे तर...

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

अति उष्मा, मुसळधार पाऊस, प्राणघातक पूर आणि विनाशकारी वादळे अशा अतितीव्र हवामानाच्या घटनांचा उद्रेक आता जगभरात सामान्य बनतो आहे. 'क्लायमेट रिस्क इंडेक्स'मुळे कोणते देश किंवा प्रदेश हवामानबदलामुळे जास्त प्रभावित होत आहेत, हे समजते. अशा हवामानातील घटनांमुळे कोणत्या देशाचे सर्वाधिक नुकसान होत आहे, हे हा निर्देशांक दर्शवतो.

हवामान जोखीम निर्देशांकाच्या अहवालात नमूद केले गेले आहे की, गेल्या ३० वर्षांमध्ये (१९९३ ते २०२३ पर्यंत) नैसर्गिक आपत्तींनी सर्वाधिक प्रभावित झालेल्या देशांमध्ये भारत सहाव्या क्रमांकावर आहे. 'सीआरआय'ने २०२२ मध्ये जगभरात अतितीव्र हवामानामुळे घडणाऱ्या घटनांचेही विश्लेषण केले आहे. यावर्षी पाकिस्तान, बेलीज आणि इटली हे सर्वाधिक प्रभावित देश होते. यानंतर ग्रीस, स्पेन आणि पोर्तो रिकोचा क्रमांक लागतो. अमेरिका, नायजेरिया, पोर्तुगाल आणि बल्गेरिया सातव्या ते दहाव्या क्रमांकावर आहेत. १९९३ ते २०२२ दरम्यानच्या ९४०० हून अधिक घटनांमुळे जगभरात ७ लाख ६५ हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आणि अंदाजे २४.२ ट्रिलियन डॉलरचे थेट नुकसान झाले. या कालावधीत डोमिनिका, चीन आणि होंडुरास हे सर्वाधिक प्रभावित देश होते. त्यानंतर म्यानमार, इटली आणि भारत यांचा क्रमांक लागतो. डोमिनिका देशाचे सर्वात जास्त नुकसान होत आहे. कारण तेथे बरेच आर्थिक नुकसान झाले असून बऱ्याच लोकांना जीव गमवावा लागला आहे. अत्यंत तीव्र हवामानबदलाच्या घटना आता भारतात वारंवार आणि अधिक तीव्रतेने घडत आहेत. या आपत्तींमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागत असून देशाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे.

१९९८ मध्ये गुजरातमध्ये तर १९९९ मध्ये ओडिशामध्ये आलेले चक्रीवादळ, २०१४ आणि २०२० मध्ये आलेले हुदहुद आणि अम्फान चक्रीवादळ, १९९३ मध्ये उत्तर भारतात आलेला पूर, २०१३ मध्ये उत्तराखंडमध्ये आलेला पूर आणि २०१९ मधील भीषण पूर यांसारख्या घटनांनी भारताचे मोठे नुकसान केले आहे. भारतात वारंवार आणि असामान्यपणे तीव्र उष्णतेच्या लाटा येतात, तापमान जवळपास ५० अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. १९९८, २००२, २००३ आणि २०१५ मध्ये अशा तीव्र उष्णतेच्या लाटांनी अनेकांचे प्राण घेतले. गेल्या तीन दशकांमध्ये भारतात ४०० हून अधिक अतितीव्र हवामानाच्या घटना घडल्या. त्यामुळे अंदाजे १८० अब्ज डॉलरचे नुकसान झाले आणि किमान ८० हजार लोक मारले गेले. अतितीव्र हवामानाचा गरीब देशांवर अधिक परिणाम होत असल्याचे 'सीआरआय'च्या अहवालातून समोर आले.

गेल्या ३० वर्षांमध्ये सर्वाधिक उद्ध्वस्त झालेल्या १० देशांपैकी ५ 'ग्लोबल साऊथ' देश होते. ते म्हणजे होंडुरास, म्यानमार, भारत, वानुआतु आणि फिलिपाईन्स. विकसनशील, कमी विकसित किंवा अविकसित देशांना 'ग्लोबल साऊथ' म्हणतात. या देशांमध्ये पूर, वादळ, दुष्काळ यासारख्या आपत्ती अधिक येतात. श्रीमंत देशांबद्दल बोलायचे, तर या यादीत इटली, ग्रीस आणि स्पेनचाही समावेश आहे; परंतु त्यांची स्थिती थोडी चांगली आहे. गरीब देशांनी हवामानबदलाची तीव्रता कमी करण्यासाठी फारसे काही केले नाही, तरी त्यांना सर्वाधिक त्रास होत आहे. आता २०२२ च्या यादीत पाकिस्तान आणि नायजेरियासारखे गरीब देशच नाहीत, तर अमेरिका, स्पेन, इटलीसारखे श्रीमंत देशही आहेत. 'सीआरआय'च्या अहवालानुसार अद्याप सर्व काही संपलेले नाही. आपण योग्य लक्ष दिले आणि आपत्ती टाळण्यासाठी योग्य पद्धतींचा अवलंब केला, तर धोका कमी करू शकतो. बांगलादेशमधील आपत्ती व्यवस्थापनात सुधारणा झाल्यामुळे वादळामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. १९७० मध्ये तिथे पाच लाख लोकांनी जीव गमावला होता. २००७ मध्ये ही संख्या ४२३४ वर आली.त्याचप्रमाणे भारतातील अहमदाबाद शहराला २०१० मध्ये प्रचंड उष्णता जाणवली, त्यानंतर त्यांनी हीट ॲक्शन प्लॅन बनवला. हवामानबदल हे भारतातील गंभीर संकट म्हणून उदयास येत आहे. वाढते तापमान, अनियमित मान्सून, दुष्काळ आणि पूर यांसारख्या आपत्ती, हिमालयातील हिमनद्या वितळणे आणि किनारी भागात समुद्राची वाढती पातळी याचा भारताच्या सामाजिक आणि आर्थिक जडणघडणीवर परिणाम होत आहे. भारतासारख्या विकसनशील देशासाठी, हवामानबदल ही केवळ पर्यावरणीय समस्या नाही, तर त्याचा कृषी, उद्योग, सार्वजनिक आरोग्य आणि जलस्रोतांवरही विपरीत परिणाम होत आहे. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि जीवाश्म इंधनावरील अवलंबित्वामुळे ही समस्या अधिक जटील बनली आहे. (पान ६ वर)

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२


(भाग ३९)

रवींद्रनाथांनी चित्रकलेच्या प्रांतात जरी उशिरा प्रवेश केला तरी त्यांनी भारतीय चित्रकलेचे उत्तम निरीक्षण आणि अभ्यास केलेला होता. साहित्याच्या अन्य प्रांताप्रमाणेच भारतीय चित्रकलेचे सुद्धा पुनरुज्जीवन कसे करता येईल याचा विचार त्यांच्या मनात नेहमी असायचा. अवनींद्रनाथ हा रवींद्रनाथांचा पुतण्या कलकत्यामध्ये एक उत्तम चित्रकार म्हणून प्रसिद्ध होता. त्याच्या चित्रकलेचे निरीक्षण आणि अभ्यास रवींद्रनाथ करीत असत. त्याला चित्रकलेमध्ये आणखी प्रगती करता यावी म्हणून त्याला अनुकूल वातावरण कसे निर्माण करता येईल याकडेही त्यांचे लक्ष होते.

काही भारतीय चित्रकारांना त्यांनी जपान आणि इतर देशांमधील चित्रकलेचे निरीक्षण आणि अभ्यास करता येईल अशी व्यवस्था केली आणि त्यांच्यात एक नवी प्रेरणा निर्माण केली. त्याचप्रमाणे एका प्रसिद्ध जपानी चित्रकाराला भारतात बोलावून प्राचीन भारतीय चित्रकलेच्या पुनरुत्थानासाठी प्रयत्न केले. भारतीय चित्रकारांनी पाश्चात्य चित्रकलेचे अंधानुकरण न करता प्राचीन भारतीय आणि पौर्वात्य चित्रकलेचे पुनरुज्जीवन घडवून आणावे यासाठी ते आग्रही होते. स्वतः उत्तम कलाकार असले तरी रवींद्रनाथांना इतर कलाकारांबद्दलही आदर होता. हे त्यांचे कलाकार म्हणून मोठेपण आहे. त्यांना ते प्रोत्साहन देत असत.

शांतिनिकेतनमध्ये मुकुल नावाचा एक विद्यार्थी अभ्यासापेक्षा चित्रकलेत अधिक रस घेत असे. त्याची चित्रकलेत प्रगती व्हावी म्हणून रवींद्रनाथांनी त्याला वेळोवेळी उत्तेजन दिले. एवढेच नव्हे तर त्यांना जेव्हा जपानला जाण्याचा योग आला तेव्हा ते त्याला आपल्या सोबत जपानला घेऊन गेले आणि तेथील चित्रकारांसोबत त्याची भेट घडवून आणली.

पुढे मुकुलला त्यांनी एक पत्र लिहिले. त्या पत्रात त्याला चित्रकलेबद्दल बहुमोल मार्गदर्शन त्यांनी केले. ते म्हणतात, सौंदर्य म्हणजे भ्रम नव्हे, चेटूक नव्हे किंवा नजरबंदीही नव्हे. सौंदर्य म्हणजे सत्य. तुमच्याभोवती असंख्य क्षुद्र आणि कुरूप वस्तू असतात, पण तुमच्या ध्यानामुळे त्यांच्यातले सौंदर्य तुम्हाला पाहता आले पाहिजे. आणखी एका पत्रात ते त्याला लिहितात,




आपल्या भोवतालचे जग नीट बघा आणि तुम्हाला असे आढळून येईल की ते बळकट आहे, भक्कम आहे आणि टणक आहे. जगाचे विराट सौंदर्य आपला विरुप भाग लीलया आणि निःसंकोचपणे पेलू शकते. तुमचा कुंचला असा नसावा की, जो एखाद्या भ्रामक सरस्वतीच्या पावलांना अळीता लावण्यातच गर्क राहील.

गगनेंद्रनाथ हा त्यांचा पुतण्या देखील एक उत्तम चित्रकार होता. त्याला एका पत्रात मार्गदर्शन करताना ते म्हणतात, गगन, तू कधी घराबाहेर पडून आजूबाजूचे जग पाहणार आहेस? तुझे नाव तू सार्थक केले पाहिजे. कारण बाहेर पडून निसर्गाचे अवलोकन केल्याशिवाय चित्रकलेमध्ये प्रगती होणार नाही हे त्यांना माहिती होते.

अवनींद्रनाथ या आपल्या पुतण्याला लिहिलेल्या एका पत्रात ते म्हणतात, अवन, मी जितका येथे जपानमध्ये फिरतो आहे तेवढ्या तीव्रतेने मला असे वाटते की तू येथे असायला हवे होते. जपानच्या जिवंत कलेला जाणून घेणे हे किती महत्त्वाचे आहे, जेणेकरून आपलीही कला पुनरुज्जीवित होऊन बहरेल. मात्र हे तुला तुझ्या दक्षिणेकडील व्हरांड्यात बसून कधीही कळणार नाही. तू येथे असता तर तुझ्या डोळ्यांवर असलेली जाड पट्टी गळून पडली असती आणि तुझ्यातील कलादेवतेला तिची योग्य भेट मिळाली असती. रवींद्रनाथांच्या आपल्या पुतण्यांना आणि शिष्यांना दिलेल्या या सर्व सूचना आजही चित्रकला शिकू इच्छिणार्यांना मार्गदर्शक ठराव्यात अशाच आहेत. चित्रकलेच्या अध्यापकांना देखील आपल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना देखील या सूचना मोलाच्या ठराव्यात अशाच आहेत.

आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात चित्रकलेकडे वळलेल्या रवींद्रनाथांना त्याची एवढी गोडी लागली होती की ते एकदा म्हणाले माझी पहाट फुलांनी डवरली होती, माझे मावळते दिवस रंगांनी बहरून निघोत. चित्रकलेच्या जरी अनेक पद्धती असल्या तरी रवींद्रनाथांनी कुठल्याही शैलीचे अनुकरण केले नाही. त्यांची शैली ही त्यांची स्वतःची होती. त्यात वास्तवतेला, नाविन्याला आणि सौंदर्याला महत्त्व होते. चित्रकार म्हणून साधारणपणे १७/१८ वर्षांची त्यांची कारकीर्द होती. एवढ्या कालावधीत त्यांनी दोन हजारांवर चित्रे काढली. विश्वभारतीने रवींद्रनाथांची चित्रे छापून त्यांचे दोन खंड 'चित्रलिपी' या नावाने प्रकाशित केले.

आपल्या बऱ्याच चित्रांवर रवींद्रनाथांनी निवेदनपर अशी काही इंग्रजी वाक्ये लिहिली आहेत. त्यामुळे या चित्रांमधील खुबी समजण्यासाठी मदत तर होतेच पण त्या चित्रात त्यांना काय सांगायचे आहे हेही लक्षात येते. त्यांच्या पेंटिंगच्या खास पद्धतीवरही प्रकाश पडतो. त्यांच्या या चित्रांमधील काही चित्रांबद्दल या ठिकाणी जाणून घेण्याचा प्रयत्न आपल्याला करता येईल. एका चित्रात त्यांनी एका प्रचंड अजगरावर एक मनुष्य बसलेला दाखवला आहे. या चित्रातून त्यांचा एक आवडता विचार व्यक्त होतो.

या चित्रातून मानवी मनाची उत्क्रांती त्यांना दाखवायची आहे. हा प्रचंड अजगर म्हणजे इतिहासपूर्वकालीन प्रचंड शारीरिक वाढ. पण जसजसा मानवाचा विकास किंवा बौद्धिक उत्क्रांती होत गेली तसतसा तो या प्रचंड अजगरावर स्वार झाला आहे. आणखी एका चित्रात रस्त्याच्या कडेला एक दगड आहे. त्यातील कडेच्या भेगेतून दोन फुले फुलली आहेत आणि जणू असे सुचवत आहेत की हे राकट दगड पृथ्वीचा सूर आणि फुलणारे जीवन दडपून टाकू शकत नाही. त्यातून त्यांना असेही सुचवायचे आहे की मानव आधुनिकीकरणामुळे निसर्गापासून दूर जात आहे. त्याने निसर्गाकडे परत यावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांच्या 'रक्तकरबी' या नाटकात हीच प्रतीकात्मक मध्यवर्ती कल्पना आहे.

रवींद्रनाथांची चित्रे कलेच्या नावाखाली चाललेल्या सर्व प्रकारच्या गोंधळापासून कोसो दूर होती. आपल्या स्वतंत्र प्रतिभा शैलीने या चित्रात रंग आणि रेषांच्या माध्यमातून काव्य आणि उच्च मुल्यात्मक विचार ते व्यक्त करतात. त्यांनी रंगरखांचा कल्पकतेने आणि काटकसरीने वापर केला. माणसाचा चेहरा रेखाटताना डोळे, ओठ, नाक इत्यादी काढण्याची गरज त्यांना वाटत नसे तर केवळ लंबाकृतीद्वारे चेहर्याची आकृती ते सुचित करत आणि उरलेले सारे पाहणार्याच्या कल्पनेवर सोडून देत. त्यामुळेच नंदलाल बोस यांच्यासारख्या प्रसिद्ध चित्रकाराला रवींद्रनाथांच्या चित्रात आणि रेखाटनात वास्तवता नसूनही ती 'वास्तव' वाटली.

स्त्री म्हणजे रवींद्रनाथांच्या दृष्टीने एक गूढ रहस्य होते. त्यांनी स्त्रियांची जी चित्रे काढली त्यात अश्लीलता किंवा कामुकता कुठेही आढळून येत नाही. त्यांच्या चित्रातील स्त्रियांमध्ये लज्जा, शालीनता आणि कारुण्य या स्त्री सुलभ वैशिष्ट्यांचे दर्शन आपल्याला घडते. त्यांनी केलेले फुलांचे अथवा निसर्गाचे चित्रण म्हणजे जणू त्यांनी अनुभवलेला निसर्ग! त्यांच्या चित्रातील फुले, पाने आपल्याला निसर्गात आढळणार नाहीत कारण निसर्ग चित्रित करताना एकूणच वातावरण निर्मिती करणे हा त्यांचा प्रमुख हेतू असे. ही चित्रे त्यांनी शांतीनिकेतनच्या परिसरातील टवटवीत निसर्गाकडून प्रेरणा घेऊन साकारली आहेत. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, २३ मार्च ते शनिवार, २९ मार्च २०२५)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

* **रविवार, २३ मार्च-** हुतात्मा भगतसिंग, सुखदेव, राजगुरू शहीद दिन, जागतिक हवामान दिन, छत्रपती राजाराम महाराज पुण्यतिथी, वाघजाई यात्रा शिंदेवाडी, शिवानंद महाराज ढवळीकर पुण्यतिथी ढवळी (ता. मिरज) * **सोमवार, २४ मार्च-** क्षयरोग दिन, कालभैरव यात्रा वर्षे आबापुरी (जि. सातारा), बिडकर महाराज पुण्यतिथी पुणे, देव ताटम्हंकाळेश्वर छबीना जांब बु।। (ता. कोरेगाव) * **मंगळवार,२५ मार्च-** पापमोचनी (स्मार्त) एकादशी, श्रवणोपवास * **बुधवार, २६ मार्च-** भागवत एकादशी, संत बाळूमामा उत्सव आदमापूर, भैरवनाथ यात्रा भैरववाडी, श्री यशवंतबाबा रथोत्सव मायणी (ता. खटाव) * **गुरुवार, २७ मार्च-** प्रदोष, शिवरात्री, मधुकृष्ण त्रयोदशी, वारुणी योग (सूर्योदय ते सूर्यास्त), विठ्ठलाई यात्रा दुर्गमानवाड, जागतिक रंगभूमी दिन, दत्तानंद महाराज पुण्यतिथी मुर्टी (बारामती)* **शुक्रवार, २८ मार्च-** विप्रनाथ महाराज पुण्यतिथी अंजनवती (जि. बीड) * **शनिवार, २९ मार्च-** धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुण्यतिथी, दर्श अमावास्या, मन्वादि, अन्वाधान, सिध्देश्वर यात्रा जयसिंगपूर, आंबाबाई यात्रा येळवडे, सूर्यग्रहण (भारतात दिसणार नाही. वेधादिनियम पाळू नये.) शिवभवानी उत्सव दुधोडी ता. पलूस

**मुहूर्तः-** * **साखरपुडा-** * साखरपुडा- २४ मार्च (१७ पर्यंत), २५, २६ मार्च * **बारसे-** २४ मार्च (१७ पर्यंत), २६ मार्च * **जावळ-** २६ मार्च * **गृहप्रवेश-** २४ मार्च, २६ मार्च

### मेष :- साडेसाती सुरु होणार

दशमेश, लाभेश शनि सप्ताह अखेरीस लोहपादाने व्ययस्थानी आहे. फल कष्ट आहे. आपल्या राशीत बाराव्या शनिमुळे साडेसाती सुरू होत आहे. व्ययात शुभा-शुभ ग्रह आहेत. त्यामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. उत्साह, धडाडीने रेंगाळलेली कामे मार्गी लावू शकाल. मतभेदाचे प्रसंग टाळावेत. महत्त्वाचे विचार विचाराने राबवावेत. शुभ ता. २३, २५

### वृषभः- चिंता राहिल

भाग्येश, कर्मेश शनि शनिवारी अमावस्येत सुवर्ण पादाने लाभस्थानी येत आहे. फल चिंता आहे. एखाद्या गोष्टीची विनाकारण चिंता राहिल. महत्त्वाचे आर्थिक व्यवहार विलंबाने होतील. राशीत गुरू असल्याने सर्व समस्यातून मार्गही निघत जाईल. तिखट पदार्थ जास्त खाऊ नयेत. मुखरोग संभवतो. बोलणेही विचारपूर्वक असावेत. शुभ ता. २५, २६

### मिथुनः- श्री प्राप्ती

अष्टमेश, नवमेष शनि शनिवारी रात्री ताम्रपादाने कर्मस्थानी येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. आपला मार्ग चांगला असेल तर शनिकृपेने व चिकाटीने चांगली प्रगती करू शकाल. कारखानदारीत विशेष चांगल्या संधी लाभतील. उत्साहाने कार्यसिध्दीस जाईल. सरकारी नोकरीत अनुकूलता राहिल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. २३, २६

### कर्कः- छोटी साडेसाती संपणार

सप्तमेश, अष्टमेश शनि २९ मार्च रोजी रौप्यपादाने भाग्यस्थानी येत आहे. फल शुभ आहे. आपली छोटी साडेसाती संपणार आहे. कडू आठवणी आता विसरा व नव्या उमेदीने वाटचाल करा. आपला भाग्योदय होणार आहे. अनावश्यक खर्च टाळावा. नव्या कामात यश मिळेल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. अपेक्षित संधी लाभतील. शुभ ता. २५

### सिंहः- छोटी साडेसाती सुरु

षष्ठेश, सप्तमेश शनि शनिवारी रात्री लोहपादाने अष्टमात येणार आहे. फल भ्रष्ट आहे. आपल्या राशीत छोटी साडेसाती सुरू होणार आहे. मुखख्यतः प्रकृतीच्या तक्रारी राहतील. कार्यक्षेत्रात चिकाटीने प्रगती साधता येईल. विचाराने रहावे. शिक्षणावर अधिक लक्ष द्यावे. संततीच्या प्रगतीबाबत चिंता राहिल. अडचणीतून मार्ग काढावा लागेल. घाईने निर्णय नकोत. शुभ ता. २३, २५

### कन्याः- अडचणी सुटत जातील

पंचमेश, षष्ठेश शनि शनिवारी ताम्रपादने सप्तमात येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. कौटुंबिक जीवनात विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. अडचणी सुटत जातील. सर्व प्रतिकुलतेवर मात करू शकाल. कृषि, वैद्यकिय, मेकॅनिकल अशा क्षेत्रात चांगली प्रगती साधता येईल. आता बिनधास्त रहावे. फार काळजी करू नका. शुभ ता. २३, २५

### तुलाः- स्पर्धात यश

सुखेश, पंचमेश शनि शनिवारी सुवर्णपादाने षष्ठात येणार आहे. फल चिंता आहे. षष्ठात षष्ठग्रही झाली आहे. त्यामुळे प्रकृतीकडे अजिबात दुर्लक्ष करू नका. नोकरीत अधिकार लाभतील. स्पर्धांमध्ये यश मिळणार आहे. अपेक्षित संधी लाभतील. नव्या विचारांना चालना देऊ शकाल. आवडत्या क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. २३, २६

### वृश्चिकः- सौख्याचे दिवस

तृतीयेश, चतुर्थेश शनि रौप्यपादाने पंचमात येत आहे. फल शुभ आहे. आपल्या वृश्चिक राशीची छोटी साडेसाती संपणार आहे. त्यामुळे आता प्रगतीचे मार्ग खुले होतील. कौटुंबिक जीवनात सौख्याचे दिवस येतील. शिक्षण अनुभवातून चांगले मार्गक्रमण करू शकाल. नव्या संधी लाभतील. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. शुभ ता. २५

### धनुः- छोटी साडेसाती

धनेश, तृतीयेश शनि लोहपादाने चतुर्थात येत आहे. फल कष्ट आहे. आपल्या राशीस छोटी साडेसाती सुरू होत आहे. स्थावर प्रश्न वाढवू नका. नोकरी, व्यवसायात विचाराने रहावे. वाहनाचे व्यवहार विचाराने करावेत. विनाकारण फार दगदग करू नका. पोटाच्या तक्रारी राहतील. काळजी घ्यावी. शुभ ता. २३, २६

### मकरः- साडेसाती संपणार

राशी स्वामी लग्नेश, धनेश, शनि २९ मार्च रोजी रात्री तृतीयात येत आहे. आपल्या राशीची साडेसाती संपणार आहे. शनि ताम्रपादाने येत आहे. फल श्री प्राप्ती आहे. आपण बरेच सोसले, अनुभवले. आता सुखाचे दिवस येणार आहेत. नव्या पर्वाच्या स्वागतासाठी सिध्द व्हा. सरकारी कामे होतील. अनुकूल घटना घडतील. शुभ ता. २३

### कुंभः- शुभ घटना

राशी स्वामी व्ययेश, लग्नेश, शनि शनिवारी रौप्यपादाने धनस्थानी येत आहेत. फल शुभ आहे. साडेसातीचे शेवटचे पर्व आता विशेष प्रगतीचे राहिल. चिंता नको. सुखस्वास्थ लाभेल. गृहनिर्माण, कारखानदारी, विधी आदि क्षेत्रात मनासारखी प्रगती साधता येईल. चिंता नको. आता सर्व काही आपल्या मनासारखे घडत जाईल. शुभ ता. २६

### मीनः- शुभ फले मिळतील

लोभश, व्ययेश शनि शनिवारी सुवर्णपादाने राशीत येत आहे. फल चिंता आहे. राशीत षष्ठग्रही झाली आहे. साडेसातीचे पहिले वर्ष संपत आहे. आपण बरेच सहन केले. आता आपल्या सुकर्माची शुभ फले अनुभवास येतील. व्यवसायात चिकाटीने प्रगती साधता येईल. मानसिक स्वास्थ टिकवावे. आपले सर्व चांगलेच होणार आहे. प्रगतीचे मार्ग पुन्हा लाभतील. शुभ ता. २३, २६

!! शुभ भवतु !!



## आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१

**ओल्या वनौषधी बहुतेक खेडेगावी मिळणाऱ्या व सर्वांच्या ओळखीच्या आहेत. घायमारी, धायटी, नागवेल, ब्राह्मी कदाचित सर्वत्र मिळणार नाहीत, पण त्याच्या रोपाच्या कुंड्या आपल्याकडे लावता येतात. परड्यात पण उगवतात. क्षुद्र वनौषधी आहेत. पण त्यांचा गुण अमोल आहे. 'आजीबाईचा बटवा' या सदरात आपण कितीतरी प्रकारच्या वनौषधींची तसेच विविध आजार व त्यावरील उपचारांची माहिती गेल्या अडीच वर्षात घेतली आहे. आज काही ओल्या वनौषधींची माहिती देत आहे.**

# दगडीपाला, धायटी, मांदार (रुई)



**दगडीपालाः-**

दगडीपाला रेताड जमिनीत होतो. जमिनीवर पसरतो. यास एकदांडी असेही म्हणतात. हा पिवळा माका आहे.

**उपयोग-** १) मुले खेळताना पडतात. खरचटते, रक्त येते तेव्हा दगडीपाला चुरगळून जखमेवर लावल्यास सूज येत नाही. दगडीपाला लावल्याने आग होत नाही. उलट थंड वाटते. रक्तस्राव होत असेल तर थांबतो.

२) यकृत, प्लिहा वृध्दीवर याच्या पाल्याचा रस ९० ग्रॅम मधात द्यावा.

कित्येक वनौषधी सहज मिळतात म्हणून त्यांची आपण अपेक्षा करतो. पण लहान वस्तूंची अपेक्षा करणे बरोबर नाही. लहान वस्तू जतकी उपयोगी पडते जितकी मोठी पडणार नाही. पिंडी ते ब्रह्मांडी (जे आपल्या ठायी आहे तेच सर्व जगात आहे) या म्हणीप्रमाणे वनौषधी बाहेर जो गुण दाखवते तोच गुण पोटातही दाखवते. अल्प प्रमाणात घ्यावी परंतु रुई, निवडुंग, काजरा, जेणळ यासारख्या अपवादात्मक वनस्पती केवळ बाह्य उपचारासाठी वापरल्या जातात. तरीपण अल्प प्रमाणात दिल्यास अमृताप्रमा गुण देतात. जास्त प्रमाणात देतल्यास अपाय करतात.

**धायटीः-**

१) प्रदरावर धायटीचे झाड सुमारे १ ते २ फूट उंच होते. याची फुले तांबूस असतात. याच्या फुलांचा औषधात व रंग करण्यासाठी उपयोग होतो.


**उपयोग-** धायटीच्या फुलांचे वस्त्रगाळ केलेले चूर्ण १० ग्रॅम, खडीसाखर १० ग्रॅम तांदळाच्या धुवणातून दिवसातून दोन वेळा १०- १० ग्रॅम घ्यावे. १४ दिवसात प्रदर नाहीसा होतो. २) हगवणीत रक्त पडत असल्यास धायटीची फुले १० ग्रॅम व वाळा १० ग्रॅम ठेचून अर्धाशेर पाण्यात अष्टमांश काढा करून. १० ग्रॅम खडीसाखर घालून सकाळ-संध्याकाळ द्यावे. ३) व्रणावर धायटीच्या फुलांचे चूर्ण जवसाच्या तेलात खलून लावावे. म्हणजे अग्निदग्ध व्रण, विसर्प आणि फार दिवसापासूनचे दुष्ट नाडी व्रण बरे होतात. ४) बालकांच्या दंत पीडेवर दात येण्याच्या वेळी धायटीची फुले वाटून मंध घालून हिरड्यांना चोळावीत. ५) वात, पित्त, ज्वरावर धायटीची पाने २० ग्रॅम व सुंठ २ ग्रॅम यांचा काढा करून १० ग्रॅम खडीसाखर घालून द्यावा. ६) गरोदर स्त्रियांच्या अतिसारावर धायटी फूल, मोचरस व इंद्रजव समान भाग घेऊन दोन ग्रॅम चूर्ण मधातून द्यावे. ७) पित्ताने मस्तक चढल्यास पाल्याचा रस डोक्यावर चोळतात व तोंडात थोडा धरावयास देतात. ८) विषमज्वरावर धायटीची फुले, गुळवेल आणि आवळा यांचा समभाग काढा करून २ ते ५ ग्रॅम द्यावा. ९) धायटीपासून धातक्यादी चुर्ण बनवतात. ते अतिसार नाशक आहे. धायकीपासून धातक्यादी तेल तयार करतात. ते योनी विकारावर उपयोगी आहे. धायकीपासून धातक्यासव तयार केले जाते. ते प्रमेहनाशक आहे.

**मांदार (रूई)-**

रुई व मांदार ही झाडे एकाच जातीची असून त्या दोघांमध्ये फारसा फरक नाही. मांदाराचे झाड पांढरे असून पुष्कळ फांद्यांचे व उंच असते. रुईचे झाड कमी उंचीचे असते. पाने वडाच्या पानासारखी असतात.

**उपयोग-**

१) अपस्मारावर- रूईचे १ ग्रॅम दुधात मालकांगोणीची वस्त्रगाळ केलेली पूड २ ग्रॅम कालवून वाळवून ठेवावी व तपकिरीप्रमाणे ओढावी. २) रुईची पिकलेली पाने गळून पडली म्हणजे त्यांचा रस कालवा व त्यात समान मीठ घालून बारीक खलून ठेवावे. नाकात तपकिरीप्रमाणे ओढावे म्हणजे शिंका येऊन आराम वाटतो. ३) अतिसार आव यावर रुईची साल २ ग्रॅम घेऊन अष्टमांश काढा करून त्यात १ ग्रॅम कुटधजन व दालचिनीची पूड १ ग्रॅम घालून द्यावी. म्हणजे उलट्या न होता आमांश झडून जाईल. ४) बदावर रुईची मुळी पाण्यात उगाळून लेप द्यावा. कसलाही बद असला तरी पिकून फुटतो. ५) कफरोगावर रुईची फुले २ ग्रॅम वेखंडाच्या अर्धा ग्रॅम चूर्णाबरोबर मधातून द्यावी. ६) कर्णरोगावर रुईच्या पिकल्या पानास तूप लावून त्यास विस्तवावर शेकून त्याचा रस काढून २ थेंब कानात घालावा. ७) कामला (काविळ) रोगावर रुईच्या फुलातील गर २ ग्रॅम विड्यांच्या पानातून २ मिरे घालून खावा. ८) खोकला व श्वास यास. रुईच्या फुलातील स्वास्तिकासारखा गर काढून तो २ ग्रॅम मिरी, १ ग्रॅम गुळात खलून तोंडात धरून रस मिळावा.



९) ग्रंथीवर रुईच्या चिकांत कात व रेवा चिनीचा शिरा १ ग्रॅम खलून लेप करावा. सात दिवसात गाठ फुटते. १०) अर्ध शिशीवर वाळलेले रुईचे लाकूड पेटवून नाकाने धूर ओढावा. ११) सुजेवर रुईच्या मुळांचा लेप दिल्याने सूज उतरते. रुईचा चीक अंगावर उततो. जपून वापरावा. उतल्यास खोबरेल तेल लावावे.

पान ५ वरून

## हवामान बदलाला पुरून उरायचे तर...

भारतातील हवामानबदलाचे परिणाम बहुआयामी आहेत. पहिला आणि सर्वात महत्त्वाचा परिणाम कृषी क्षेत्रावर झाला आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग शेतीवर अवलंबून आहे; परंतु हवामानातील बदल, अनियमित मान्सून आणि वाढत्या तापमानामुळे पीक उत्पादन अस्थिर झाले आहे. पंजाब, हरयाणा, महाराष्ट्र आणि कर्नाटक या राज्यांमध्ये पाण्याचे संकट गंभीर होत असून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. उत्तर भारत आणि मध्य भारतात अतिउष्णतेच्या घटना आता सामान्य होत आहेत. लोकांच्या आरोग्यावरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे.

हवामानबदलामुळे उष्णतेच्या लाटेच्या घटनांमध्ये वाढ झाली असून दरवर्षी शेकडो लोकांचा बळी जात आहे. भारतीय हवामान खात्यानुसार, सरासरी तापमानात सातत्याने वाढ नोंदविली जात आहे, यावरून या समस्येचे गांभीर्य दिसून येते. हिमालयातील हिमनद्या वितळल्याने गंगा, ब्रह्मपुत्रा आणि यमुना यांच्या पाण्याच्या पातळीत अस्थिरता निर्माण होऊ शकते. त्यामुळे जलसंकट, पूर अशा समस्या उद्‌भवू शकतात. कोट्यवधी भारतीयांचे जीवनमान या नद्यांवर अवलंबून असल्याने या समस्येमुळे आर्थिक अस्थिरताही येऊ शकते. पश्चिम बंगाल, ओडिशा, केरळ आणि महाराष्ट्र यांसारख्या राज्यांसाठी किनारपट्टीवरील समुद्राच्या पातळीत झालेली वाढ हे एक नवीन आव्हान बनले आहे. सरकारने हवामानबदलाचे परिणाम कमी करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या योजना आणि धोरणे लागू केली आहेत. २००८ मध्ये राष्ट्रीय कृती योजना (एनएपीसी-सी) लाँच करण्यात आली होती. त्यात आठ प्रमुख मोहिमा राबविल्या जात आहेत. यामध्ये नवीकरणीय ऊर्जेला चालना देणे, जलस्रोतांचे संवर्धन आणि हवामान अनुकूलतेच्या उपायांचा अवलंब याकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. राष्ट्रीय सौर मिशन अंतर्गत २०२२ पर्यंत १०० गीगावॉट सौर ऊर्जा उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. त्यात भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. याव्यतिरिक्त हवामान अनुकूलता निधी (एनपीएफ) द्वारे कृषी आणि जलस्रोतांची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत.

सरकारने इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देण्यासाठी फेम-२ योजना लागू केल्यामुळे तेल आयातीवरील अवलंबित्व कमी होईल आणि कार्बन उत्सर्जन कमी होईल. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणाचा परिणाम कमी करण्यासाठी 'स्मार्ट सिटी मिशन 'आणि ऊर्जा कार्यक्षम इमारतींना प्रोत्साहन दिले जात आहे. याशिवाय खारफुटीचे संवर्धन, चक्रीवादळाचा इशारा देणे आणि आपत्ती व्यवस्थापनाशी संबंधित योजना किनारी भागाच्या संरक्षणासाठी राबविण्यात येत आहेत. सरकार हवामानबदलाबाबत आंतरराष्ट्रीय मंचांवरही सक्रिय भूमिका बजावत आहे.



२०१५ च्या पॅरिस करारामध्ये भारताने कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी आणि हवामान बदलाचा सामना करण्यासाठी अक्षय ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी वचन दिले. या पृष्ठभूमीवर आपल्याला हरित ऊर्जेला प्रोत्साहन द्यावे लागेल. कोळसा आणि पेट्रोलियमसारख्या जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करावे लागेल आणि सौर, पवन आणि जलविद्युतसारख्या स्वच्छऊर्जा स्रोतांकडे वाटचाल करावी लागेल. सरकार आणि खासगी क्षेत्राने एकत्रितपणे ऊर्जा उत्पादनात कार्बन उत्सर्जन कमी करणारे तंत्रज्ञान विकसित केले पाहिजे.

जलसंधारण हा देखील एक महत्त्वाचा पैलू आहे. दुष्काळ आणि जलसंकटाचा सामना करण्यासाठी कार्यक्षम जलव्यवस्थापन धोरण अवलंबणे आवश्यक आहे. 'रेनवॉटर हार्वेस्टिंग', 'वॉटर रिसायकलिंग' आणि पारंपरिक जलसंधारण तंत्र पुनरुज्जीवित करण्याची गरज आहे. याव्यतिरिक्त शेतीमध्ये शाश्वत आणि हवामान अनुकूल पद्धतींचा अवलंब करण्यावर भर दिला पाहिजे. नागरिकांच्या पातळीवरही पर्यावरण जागृती वाढण्याची गरज आहे. प्लॅस्टिक कचरा कमी करणे, वृक्ष लागवडीला प्रोत्साहन देणे आणि ऊर्जेची बचत करणे यासारखे छोटेसे उपक्रमही मोठा फरक करू शकतात. शाळा आणि महाविद्यालयांमध्ये हवामान शिक्षण अनिवार्य केले पाहिजे; जेणेकरुन भावी पिढ्यांना हे संकट समजेल आणि त्यावर उपाय शोधण्यास हातभार लागेल. (लेखक वन्यजीव आणि पर्यटनविषयक अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

आपल्या चित्रांबद्दल बोलताना रवींद्रनाथ एका ठिकाणी म्हणतात, मला माझ्या चित्रांचा अर्थ लोक नेहमीच विचारतात. मी गप्प राहतो. तशी माझी चित्रेही गप्प राहतात. यातले सारे अभिव्यक्तीसाठी आहे, स्पष्टीकरणासाठी नाही. आणि ह्या चित्राच्या अभिव्यक्तीत विचार करण्याजोगं आणि शब्दांनी वर्णन करण्यासारखं सुप्त, गुप्त असं काहीच नसतं आणि त्या चित्रात खरोखरच काही दृश्य सत्य असेल तरच ती टिकतात नाहीतर नापसंत ठरवून विस्मृतीत गडप होतात. मग जरी त्यात शास्त्रीय अगर नैतिक तथ्य असलं तरीही... जगभरात अनेक ठिकाणी रवींद्रनाथांच्या चित्रांची प्रदर्शने भरली आणि अनेक पाश्चात्य चित्रकारांनी त्यांच्या चित्रांची प्रशंसा केली. बर्लिनमध्ये जेव्हा त्यांच्या चित्रांचे प्रदर्शन भरले तेव्हा एका वर्तमानपत्राने असे लिहिले की टागोरांनी अत्यंत विस्मयकारक असा रंगांचा चोखंदळपणा दाखवला. त्यांची रंगचित्रे संपूर्ण लय आणि माधुर्याने भरलेली आहेत. बर्मिंगहॅम शहरातील सिटी आर्ट गॅलरीत रवींद्रनाथांच्या चित्रांचे प्रदर्शन भरले होते. ते पाहिल्यानंतर जोसेफ साऊथ हॉल या नावाचा कलासमीक्षक थक्क झाला. रवींद्रनाथांच्या चित्रांबद्दल त्याने प्रशंसोदगार काढले आहेत. त्याने त्यांच्या चित्रातील आध्यात्मिक गुणांचीही नोंद घेतली. तो म्हणतो, टागोरांची जी चित्रे मी पाहिली, त्यात प्रतिभासंपन्न कलाविष्कार आहे. त्यात रंग आणि रेखातील पौर्वात्य शैली दिसते. आकृती आणि लय यातली त्यांची जाण आम्हाला पर्शियन अथवा भारतीय वस्त्राप्रमाणे वा हस्तशिल्पाप्रमाणे सुंदर वाटते. त्यांचे रंगज्ञान तर अतिशय अपूर्व आहे.

पान २ वरून

## सत्वशील

खरं म्हणजे, विदुर हे व्यासपुत्र. त्या अर्थाने ते धृतराष्ट्र आणि पांडू यांचे भाऊ. पण तो मान विदुर यांना कधीच मिळाला नाही. तरीही पांडव वनवासात गेल्यावर कुंतीचा सांभाळ करण्याची जबाबदारी ते टाळत नाहीत. हे फार सांकेतिक आहे. आपल्या सगळ्यांच्या वैयक्तिक आयुष्यात कष्ट, लायकी, संधी असूनही आपले भागदेय आपल्याला अनेकदा मिळत नाही. वेळच्या वेळी तर कधीच मिळत नाही. अशावेळी आपला विदुर झाला आहे असे आपल्याला वाटते ना! तसेच... तुमचे श्रेय तुम्हाला मिळो अथवा न मिळो; तुमची जबाबदारी आणि तुमची कर्तव्ये टाळता येत नाही. त्याशिवाय जो जबाबदारी घेतो त्याच्यावरच जबाबदारी पडते आणि जबाबदारी टाळणारे स्वतः मजा मारत फुकाचे सल्ले देत तुमच्याकडूनच जबाबदारी निभावण्याची अपेक्षा मात्र ठेवतात हा अनुभव आपण सदैव घेत असतो. या परिस्थितीचा आद्य पुरुष विदुर असावा असे वाटावे असा या पुस्तकातला विदुर आहे.

विदुर! महामंत्री विदुर. धृतराष्ट्राच्या आंधळ्या पुत्रप्रेमावर सदैव स्पष्ट आणि सबुरीचा सल्ला देणारा सल्लागार म्हणजे विदुर. अलिप्तता, निर्भयता आणि निःस्पृहता याचे आयुष्भर पालन म्हणजे विदुर. प्रत्यक्ष युद्धभूमीवर उतरली नसली तरी युद्धभूमीवर पराक्रम गाजवणाऱ्या व्यक्तींहून साहस, धैर्य, नैतिक पराक्रम किंचितही कमी नसणारी महाभारतातील व्यक्ती म्हणजे विदुर. धृतराष्ट्राचा चंचल व अस्थिर स्वभाव आणि दुर्योधनाचा पराकोटीचा पांडवद्वेष याची पुरपूर कल्पना असणारी, कदाचित, एकमेव व्यक्ती म्हणजे महामंत्री विदुर. वेदविद्या, धर्मशास्त्र, शस्त्रविद्या, युद्धविद्या, राजनीती यांचा व्यावहारिक कोष म्हणजे विदुर. दुर्योधन राज्यविनाशक होईल असे त्याचे भविष्य जन्मातः च वर्तवले गेल्यावर या बालकाचा त्याग करावा असा सल्ला विदुरानी धृतराष्ट्राला दिला होता. त्याचा राग दुर्योधनाने आयुष्यभर ज्यांच्यावर काढला गेला ती व्यक्ती म्हणजे विदुर. स्वतःचे कौशल्य, सामर्थ्य वाढवत नेत असण्याबरोबरच विरोधकांच्या डावपेचांचा विचार करत राहणे अत्यावश्यक असते अशी नीती महत्त्वाचे सूत्र म्हणून सांगणारा विदुर. संभाव्य शत्रूंची सुद्धा उपेक्षा करणे उचित नाही. राजाने स्वतःच्या आणि शत्रू पक्षाच्याही हालचालींची सविस्तर माहिती गुप्तचारांकडून जाणून घेणे आवश्यक असते हे प्रतिपादन करणारा विदुर. राजनीतीमधे स्वतःचे बल आणि दोष तसेच शत्रूचे सामर्थ्य आणि वैगुण्य जाणून घेऊन त्यानुसार शत्रूशी व्यवहार करणे उचित असते हे परोपरीने पटवणारा विदुर. केवळ चिंता केल्याने, भयभीत झाल्याने, संकटाचे निवारण होत नाही. प्रथमतः संकट येणारच नाही असा उपाय केला पाहिजे. ते शक्य झालेच नाही तर आलेल्या संकटाचा दृढतेने प्रतिकार करणे हाच क्षत्रियधर्म/ राजधर्म आहे. प्लान इ तयार ठेवणे. असे सांगणारा विदुर. भावनांचा उद्रेक संकटाला कारण ठरू शकतो हे विदित करणारा विदुर . स्व सामर्थ्याच्या अहंकाराने उन्मत्त झालेले अंती नष्टच होते हे वारंवार सांगणारा विदुर. अशी विविध रूपे म्हणजे या पुस्तकात भेटणारा- दिसणारा- जाणवणारा विदुर आणि तरीही... हे पुस्तक वाचून खाली ठेवत असताना मनात कुठेतरी असे येत राहते की या पुस्तकाच्या नायकाला न्याय देण्यात हे पुस्तक कमी पडले आहे. फार फार कमी पडले आहे. या नायकाचा काळ हे पुस्तक जितक्या प्रभावीपणे हे पुस्तक उभे करते, तितक्या ठळकपणे विदुर या पुस्तकात समोर येत नाहीत. त्यामुळे या पुस्तकातून विदुर हे व्यक्तिमत्व वाचकाच्या मनात ठसत नाहीत. मराठीत एक काळ ज्या शब्दाची दहशत होती... टोक आले नाही... त्याचे प्रत्यंतर हे पुस्तक देते. सत्वशील...

# ज्येष्ठत्व की वृद्धत्व ?



सकारात्मकतेचे तत्वज्ञान २५९

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

भारतीय संस्कृतीने मानवी जीवनाचे चार छान आश्रम सांगितलेले आहेत- बाल्य, तारुण्य (गृहस्थ), वानप्रस्थ आणि संन्यासाश्रम ! साधारण पंचवीस वर्षे एका टप्प्यात मनमुराद, विनातक्रार जगून शंभराव्या वर्षी (दीर्घायुषी होऊन) देह सोडावा हे त्यामागचे गृहीतक. आम्ही हळूहळू त्याचे दोन भाग केले. वयाच्या पन्नाशीपर्यंत एक इनिंग आणि पन्नाशीनंतर/सेवानिवृत्तीनंतर दुसरी.

दुसऱ्या इनिंगने आजकाल बरेच लक्ष वेधून घेतले आहे. एकुणातच आजकाल आयुर्मर्यादा वाढलेली आहे आणि त्यामुळे सेवानिवृत्तीनंतर घरात, समाजात अनेक ज्येष्ठ नागरिक आढळतात. त्यांच्या हाताला काम असतेच असे नाही. फावल्या वेळात एकतर भ्रमणध्वनी किंवा करमणुकीची साधने यांच्या सान्निध्यात त्यांची कालक्रमणा सुरु असते. बरेचदा वयपरत्वे प्रकृतीच्या काही ना काही तक्रारी असतात. घरातील कर्तेपण नवीन पिढीकडे गेलेले असते. खूपदा घरट्यातील पिल्ले उडून गेल्याने दोघेच दोघे मागे उरलेले असतात, मग तर आयुष्य आणखीच खायला आलेले असते. जोडीपैकी एकजण पुढे गेला असेल तर मागे राहिलेल्या विधवेचा /विधुराचा उर्वरित प्रवास अधिक जीवघेणा होतो. सोबत मनाजोगती असतेच असे नाही, जोडीला छंद किंवा जगण्याचे काही पर्याय नसतील तर माणसे चिडचिडी, किरकिरी होतात. व्याधींनी घेरल्यावर देवा, आता जरा आता उचल रे बाबा पर्यंत प्रार्थना येऊन ठेपतात. अशी रागीट, तापट, कुरकुरी माणसे घरात नकोशी व्हायला लागतात. त्यांना कळत-नकळत टाळले जाते.

वय वाढत असताना नेमकं कसं वाटत असतं? काहीजणांसाठी हा प्रवास एकाकी, बदलांना घाबरणारा असतो. हा अनुभव असाच असायला हवा असं मात्र नाही. खरं तर तो तसा असूच नये. आपण सामाजिक जीव असतो आणि त्यामुळे वय वाढणे हा एकल खेळ अजिबात नसतो. आपण या प्रक्रियेची व्याख्या कशी करतो, तिच्याकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघतो, आणि किती डौलदारपणे त्यांचा स्वीकार करतो हे आपल्या क्षमतेवर अवलंबून असते. अपेक्षित आणि अनपेक्षित अनुभवजन्य बदल आपण कसे हाताळतो यावर बरंच काही अवलंबून असते. जगभरातील संस्कृती याकडे वेगवेगळ्या नजरेतून बघत असतात. काही ठिकाणी घरातील वृद्धांकडे शहाणीव आणि मार्गदर्शन या नजरेने बघितले जाते. इतर देशांमध्ये जिथे तरुण आणि शारीरिक सौंदर्य या घटकांकडे वयपरत्वे येणाऱ्या बुद्धिमत्तेपेक्षा अधिक जाणीवपूर्वक बघितले जाते, तिथे दृष्टिकोन भिन्न असतो. कारण तिथे वृद्धत्वाच्या जाणिवांशी लढा सुरु असतो. वयाचे वाढणे वर्षाच्या आकड्यांमध्ये आणि घड्याळाच्या काट्यांमध्ये मोजले जात असल्याने ते अपरिहार्य असते. मात्र त्याकडे आजार म्हणून बघितले तर ही बरी न होणारी व्याधी आहे.

**इंग्लंड** - जगण्याची पद्धत आणि फक्त अस्तित्वाची नोंद नाही.

**ऑस्ट्रेलिया** - सकारात्मक वर्तन, स्वतःबद्दल चांगले विचार राखण्याची, शारीरिकदृष्ट्या सक्षम, निरामय आणि वयाशी दोस्ती करण्याची रीत.

**न्यूझीलंड** - सवयी आणि अनुभवांचे प्रतिबिंब बरोबर घेऊन जगणारी वयस्क मंडळी आपोआप वयवाढीची प्रक्रिया तरुण मंडळींना समजावून सांगत असतात. त्यांत आर्थिक स्वातंत्र्य, तब्येत, कृतार्थता, सुरक्षितता हे सारं सामावलेलं असतं असं न्यूझीलंडच्या सामाजिक विकास मंत्रालयाने २००१ साली जाहीर केलं.

**अमेरिका**- यशस्वी रीतीने वय वाढवत नेणं या प्रक्रियेला अनेक कंगोरे असतात. व्याधींना गुंगारा देणे, परावलंबित्व टाळणे, शारीरिक क्षमता आणि त्याचबरोबर आकलन तल्लख ठेवणे, स्वतःला सामाजिक व उत्पादक कार्यामध्ये गुंगवून ठेवणे हे १९९७ सालचे विचार आहेत रोवे आणि कहान यांचे.

**जागतिक आरोग्य संघटना** - २०२० साली, ऐन कोरोनाच्या उच्छादात काळात डब्ल्यूएचओने अशी परिभाषा केलेली आहे. वाढत जाणाऱ्या वयात नैसर्गिकरित्या कार्य करण्याच्या क्षमतेचा विकास आणि त्याप्रतीची प्रतिबद्धता आपल्याला कल्याणाप्रती घेऊन जाते.

**जपान**- जपानमधील वेगवेगळ्या विचारवंत घटकांकडून बुद्धिस्ट, कंफूशियन आणि ताओइस्ट तत्त्वज्ञानाच्या परंपरांकडून आलेली प्रगल्भता म्हणजे वयवृद्धी. थोडक्यात वृद्ध असणे म्हणजे समाजासाठी मौल्यवान असणे, अगदी कामकाजात मग्न असताना किंवा नवी पिढी घडविल्यावर घेतलेला पुनर्जन्म म्हणजे ज्येष्ठत्व!

**चीन**- झोऊ, लिऊ आणि यू यांनी चिनी व्यक्तींच्या आयुर्मानाच्या निकषांचा विचार करून मत मांडलेलं. शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि पोषणमूल्यांच्या अंगांनी विचार करता डब्लूएचओच्या व्याख्येनुसार आणि रोवे आणि कहान यांच्या साच्यात बसतं ते वृद्धत्व!

**पूर्व युरोप खंड**- वाढत्या वयातही निरामय राहण्याचा हक्क बजावत, उलट सामाजिक व राजकीय क्षेत्रांमध्ये सक्रिय राहणे म्हणजे सक्रिय वृद्धत्व असं फॉस्टर आणि वाल्केर यांनी २०१५ साली मांडलं.

ज्येष्ठत्व आणि वाढतं वय एका तराजूत तोलता येत नाही. मात्र या दोन्ही शब्दांना समानार्थी वापरले जाते.

**कॅथलीन टॉमी म्हणतात**- १) वयाचे सणत्व साजरे करावे. २) अपेक्षांचा पराभव करणे ३) मैत्री वाढविणे

जीवनातील उत्तरायण मनाला सकारात्मक कौल देतं. वयाकडे समाधान आणि कृतज्ञतेची खूण म्हणून बघण्याचा! काहीतरी समाजोपयोगी उपक्रमांमध्ये स्वतःला गुंगवून ठेवायचे, सजगपणे जगाकडे बघायचे आणि मनःस्वास्थ्याची मशागत करणे एवढेच उतारवयात आपल्या हाती असते. बदलांना हसतमुखाने सामोरे जाणे, दृष्टिकोनात लवचिकता जोपासणे आणि अर्थवाही नाती जपणे यातूनच जीवनाचं पान पिकत जातं.

**अर्थकारण आणि भावी संधी** - डब्ल्यूएचओ च्या मते २०५० पर्यंत साठी पार केलेली लोकसंख्या दोन अब्ज होण्याची शक्यता आहे. आयुर्मान वाढल्याने विविध देश आता आरोग्यविमा अधिक महत्वाचा मानू लागले आहेत. त्यामुळेच मध्यम वयाकडून उत्तरायणाकडे जाण्याचे आव्हान आता अधिक जीवघेणं होत चाललंय. त्यामुळे वृध्वत्वाच्या व्याख्येकडे आता नवीन नजरेने बघणे गरजेचे झालेले आहे. एक पर्याय म्हणजे साठीनंतरही शरीर साथ देत असेल आणि उपजीविकेच्या संधी उपलब्ध असतील तर आजही ज्येष्ठ मंडळी काही ना काही कामात स्वतःला गुंतवून ठेवताना आढळतात. याद्वारे निवृत्तिवेतनाच्या वाटपाच्या मार्गातील अडचणी दूर होतील. तसेच व्यवसायाच्या नव्या संधीही निर्माण होतील. समाजात पिकल्या पानांची वाढती संख्या आर्थिक बाबींवरील लक्ष विचलित करू शकते. या वयस्कांसाठी नवी उत्पादने बाजारपेठेत आणण्याचे कार्य व्यवसाय करू शकतात. उदा. वयाच्या गरजेनुसार मदतनीस अशा खास रोबोटस निर्मिती १९८० पासून सुरु झाली आहे असिमो नामक उत्पादन होंडाने आपल्या संशोधनाच्या आधारे बाजारपेठेत आणले. हा पहिला मानवी रोबोट होता जो चालू शकतो, जिना चढू शकतो आणि पूर्वरचनेवर आधारित तो संपर्कही साधू शकतो.

**उत्तरायणाचे शास्त्र**- वाढतं वय पटकन स्वीकारणे अवघड जाते. तरुणपणीच्या कार्यक्षमतेवर आता प्रश्नचिन्ह लागलेले असते. हाडे ठिसूळ झाल्याने पटकन मोडतात आणि लवकर जोडली जात नाही. अंगदुखी आणि वेदना दैनंदिन झालेल्या असतात आणि ते सहन होत नसल्याने सतत तक्रारीचा सूर लागतो. दृष्टी अधू व्हायला सुरुवात झालेली असते. केस रंग बदलतात, कमी होतात. कान आणि नाक ताणले जाऊ शकतात. उंची कमी होते. चेहेऱ्यावर सुरकुत्या पडायला लागतात. हे अनुभव आपल्यावर मानसशास्त्रीय दृष्ट्या प्रभाव टाकतात, विशेषतः ज्या संस्कृतींमध्ये वयाचा सन्मान नसतो, तिथे हे नकोसे होते, स्वीकारायला त्रास होतो. समाजातील स्थानावरून, संस्थेतील पदावरून पायउतार व्हावे लागते. आणि बदललेल्या परिस्थितीत स्वतःच्या नव्या स्थानाचा शोध घ्यावा लागतो. मग स्वतःची पुनर्व्याख्या करावी लागते, पुनर्विकास करावा लागतो. स्वतःचे नवे जीवनहेतू विकसित करावे लागतात. ज्यांना शतायू होण्याची इच्छा असते, त्यांना तर हे विशेषत्वाने ध्यानात ठेवावे लागते. नाहीतरी आजकाल स्थापत्यशास्त्रात जुन्या इमारतींच्या जागी त्या पाडून नवे बांधकाम करण्याला सुरुवात झालेली आहेच.

२०३० पर्यंत अंदाजे दीड कोटी वृद्धांना मानसिक आणि वर्तनविषयक मदत लागेल असा अंदाज आहे. स्वतःच्या आजारपणाशी जुळवून घेणे, किंवा स्वजनांच्या आजाराची हाताळणी करणे वयाच्या त्या टप्प्यावर खिन्नमनस्कतेला निमंत्रण ठरते. स्वायत्तता गमावणे आणि एकाकीपण मानसिकदृष्ट्या खच्चीकरण करणारे ठरू शकते. एकेकाळी स्वतःच्या पायांवर उभे राहून दैनंदिन व्यवहार करू शकणारी व्यक्ती परावलंबी झाली तर निराशा, चिडचिड, आणि कुटुंबातील मतभेदांना निमंत्रण देण्यास कारणीभूत ठरते. जोडीदाराने मध्येच सोडून जाणे हे वार्धक्याचे दारुण सत्य त्या व्यक्तीला कोलमडून टाकणारे ठरते.

**वृद्धत्वाचे स्तंभ**- ग्रीक तत्वज्ञ, बायबल, रोमन्स या साऱ्यांनी वाढत्या वयाचा वेगवेगळ्या कोनातून अभ्यास केलेला आहे. हिंदू संस्कृतीमधील वानप्रस्थाश्रम आणि संन्यासाश्रम या शेवटच्या टप्प्यांचे त्यांनी समांतर अध्ययन केलेलं आहे. वयाकडे मूर्त पण समजण्यास अवघड अशा कोनातून जगभर बघितले गेले आहे. काही प्रसिद्ध संकल्पना अशाप्रमाणे आहेत-

* **जुंग** - उत्तरायुष्य म्हणजे आत्मनिरीक्षणाचा काळ!
* **एरिक्सन** - कृतार्थता आणि समाधान यांचे मूल्यांकन!
* **न्यूगारटेन**- यशस्वीपणे वाढत्या वयाचा सामना करायचा असेल तर तुमचे व्यक्तिमत्व हा त्यातील सर्वात महत्वाचा घटक ठरतो.
* **हविघार्स्ट** - समाधान आणि आनंद यांचा संगम म्हणजे उत्तर वय! असं असणं एकतर सजग तरी असतं किंवा अलिप्त करून सोडणारे असतं. त्यानेच यशस्वी वृद्धत्व अशी संकल्पना मांडली.
* **रिचर्ड, लिवसन आणि पीटरसन** - यशस्वीपणे जुळवून घेणे. १९६२ साली त्यांनी सादर केलेल्या संशोधनात ८७ व्यक्ती आणि त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या पैलूंवर केलेला अभ्यास होता. तीनप्रकारे वाढत्या वयाशी जुळवून घेता येते असं त्यांचं संशोधन मानतं. प्रगल्भ प्रवृत्ती, आरामखुर्चीत बसून विसावणारं व्यक्तित्व आणि कवच/चिलखतधारी वार्धक्य!
* **रोवे आणि कहान** - तीन घटकांची संरचनाः व्याधिमुक्तता, शारीरिक आणि आकलनदृष्ट्या सुसज्ज आणि समाजात गुंतणे यापूर्वीचे संशोधन आजारपण, व्याधी आणि घटत्या ऊर्जापातळीवर केंद्रित होते. वयोवृद्ध व्यक्तींचा सुद्धा उत्कर्ष होऊ शकतो या संकल्पनेचा त्यामध्ये समावेश नव्हता. यानंतरचा सर्वंकष दृष्टिकोन आहे स्टोवे आणि कॉनी यांचा वय म्हणजे अनादी प्रक्रिया, वेळ आणि स्थळ यांच्या सहवासातील आणि नात्यांच्या जाळ्याने वेढलेली आणि सोबतीला अंतस्थ समाजघटक!

जगभरातील बरेच देश जागतिक आरोग्य संघटनेच्या परिभाषेला पायाभूत मानतात. कारण ती एक प्रकारची धोरण आणि निर्णय प्रक्रियेशी संबंधित आहे. २००५ साली जागतिक आरोग्य संघटनेने सर्वांसाठी स्वास्थ्य हा मूल्यविचार मांडला. आपल्या स्वास्थ्याच्या पूर्णत्वाचा पाठलाग करणे सर्वांसाठी समान तत्व असते.

**त्यातील चार घटक**- (१) रुग्णाची निगा राखणे (२) लसीकरण, वेळेवर औषधोपचार, लवकर निदान (३) आरोग्यदायी जीवनशैलीचा पुरस्कार, त्यासाठी व्यायाम, सकस अन्न ग्रहण यांचे महत्व प्रशिक्षणातून समजावून सांगणे, व्यसनाधीनतेला प्रतिबंध (४) शारीरिक, सामाजिक आणि आर्थिक घटकांचा स्वास्थ्यावर होणारा परिणाम

**काही मनोरंजक निरीक्षणे**-

(१) वयस्क मंडळींना समाजमाध्यमे आवडतात. (२) वय वाढल्यावर स्वयंस्फूर्तीने सामाजिक कार्यात भाग घेणेही वाढते. (३) भावनिक स्थैर्यात वाढ (४) माहितीवर आधारित निर्णय घेण्यासाठी पूर्वीचे ज्ञान आणि अनुभव वापरण्याची मनाची क्षमता (५) इतरांच्या मतांची पर्वा न करणे- कुछ तो लोग कहेंगे या प्रवृत्तीने दुर्लक्ष करणे मनोवृत्तीवर वयाचा पडणारा प्रभाव, वय आणि कर्तृत्व, यशापयशाचे वयाशी जोडले गेलेले मापदंड आणि बदलते दृष्टिकोन यावर चालणाऱ्या संशोधनावर पुढील भागात विचार करू या...

# संतांच्या पंगती । श्रेष्ठ जाणा ।।

(भाग-५१)

साधता संवाद
प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी(वतनी)
भ्र. ९४०३०२९१७८

**मातीच्या संगती । बीज अंकुरते ।।**
**लोखंड गंजते । सर्वनाश ।।२।।**

आपल्याला जीवन जगणे तर अपरिहार्य आहेच. जीवन जातांना चांगल्या वांगल्यांचा सर्वांचा सहवास तर अटळच आहे. तेव्हा अतिशय सावधपणे संगत करावी. मातीच्या संगतीत बीज आणि लोखंड दोन्हीही येतात. तेव्हा माती एकाचा उध्दार करते तर दुसऱ्याचा सर्वनाश करते. इथे एक गोष्ट लक्षात घ्यावी की, बीज हे सत्व गुणाचे प्रतीक आहे तर लोखंड हे रज व तमोगुणाचे प्रतीक आहे आणि माती हे संतांचं प्रतीक आहे. या भवसागरातून आपली आपण सोडवणूक करून घ्यावयाची असेल तर आपण प्रथम संतानाच शरण जायला हवं. कारण प्रत्येकात थोड्याफार प्रमाणात सत्व,रज,तम हे तिन्ही गुण असतातच. यापैकी ज्या गुणाचे प्रभाव आपल्यात जास्त आहे, तसे आपले व्यक्तिमत्व बनते. रज तम गुणांचा नाश करून सत्व गुण वाढवून ईश्वराशी तादात्म्य साधावयाचे असेल तर संत संगती घडणे फार आवश्यक आहे.

ज्याप्रमाणे मातीच्या संगतीत बीज आले तर मेघांचा वर्षाव होताच त्या मातीत ते बीज रूजेल, अंकूरेल, उद्या त्याचा वटवृक्ष होईल आणि पाना, फुलांनी, व फळांनी तो वटवृक्ष बहरून येईल. आणि त्याच मातीच्या संगतीत जर लोखंड आले तर ते गंजून मातीच होऊन जाईल. त्याचा सर्वनाश होईल. पण तेच लोखंड जेव्हा परिसाच्या संगतीत येईल, परिसाचा त्याला स्पर्श होताच त्याचे सोने होईल. एकदा का परिस स्पर्शाने लोखंडाचे सोने झाल्यावर परत त्याचे लोखंड होत नाही. माऊली याविषयी फार छान सांगतात की, **लोह उभी खाय माती । परी ते परिसाचिया संगती। सोने जाल्यावरती। न शिवीजे मळे।।** ज्याप्रमाणे मातीच्या संगतीने बीज अंकुरते, त्याचा वटवृक्ष होतो पण पण मातीच्या संगतीत लोखंड आले की, त्याचा नाश होतो, पण तेच जर लोखंड परिसराच्या संगतीत आले तर मात्र त्याचे सोने होते. त्याप्रमाणे माय बापहो आपण कुणाच्या संगतीत राहतो याला फार महत्त्व आहे. आपण कुणाची संगत करावी हे आपल्याला ठरवता आलं पाहिजे. (लोखंडाने म्हणजे आपण मातीचा संग सोडून परिसाचा करायचा की मातीचाच करायचा हे ठरवावे लागेल) म्हणून इथे आपल्याला कळकळीचे सांगणे आहे की, आपण संत सज्जनांचीच संगती करावी. त्यामुळे वाल्याचे जसा वाल्मिकी मुनी झाले, तसाच आपला देखील उध्दार होईल यात तिळमात्र शंका बाळगू नये. **दांभिकांच्या संगे। ज्ञानी बिघडतो ।। मुढ ज्ञानी होतो। संतासंगे ।।३।।**

आपण म्हणाल की, आपल्या मनाचा निग्रह असेल तर संगत कुणाचीही असली तर त्यात काय बिघडतं?




खरं आहे .
आपल! मनाचा निग्रह तसा व्हायला हवा पण ते वाटतं तितकं सोपं नाही. कारण आपलं मन हे अतिशय चंचल आहे. ते एका जागी स्थिर राहतच नाही. म्हणून तर संत संगतीचा हा सारा खटाटोप चालला आहे. नेमकं संगतीचा परिणाम काय होतो? तर संगतीने रावाचा रंक आणि रंकाचा राव होऊ शकतो हे ध्यानात घ्यावे. विश्वामित्र ऋषीला काही काळ मेनकेचा संग घडला तर त्यांची कित्येक वर्षाची तपश्चर्या भंग पावली. याउलट वाल्याकोळ्याला काही क्षण नारदमुनींची संगत लाभली तर वाल्याचे वाल्मिकी मुनी झाले. हा संगतीचा मुलभूत परिणाम आहे हे ध्यानात घ्यावे. आपल्याकडे एक फार प्रसिद्ध म्हण आहे की, ढवळ्या संगे पवळ्या बांधला, वाण नाही पण गुण लागला संगतीचे परिणाम हे होतातच. दुर्दैवाने समजा दांभिकाची संगत जर लाभली तर आपली बुद्धी भ्रष्ट व्हायला वेळ लागत नाही. यावर जगद्गुरु तुकाराम महाराजांनी फार सुंदर भाष्य केले आहे. ते म्हणतात की, **बैसता चोरापाशी तैसी होय बुद्धी । देखताचि चिंधी मन धावे ।।** पुढे ते म्हणतात की, **व्याभिचाऱ्यापाशी बैसता क्षणभरी । देखताचि नारी मन धावे ।।** म्हणून मायबापहो, दांभिकांच्या संगतीत प्रकांड पंडित किंवा महाज्ञानी मनुष्य सुध्दा बिघडतो आणि संताच्या संगतीत मात्र माणूस कितीही मुर्ख असु द्या तो महाज्ञानी होतो. पण त्यासाठी संतांची कृपा होणे आवश्यक आहे. सदासर्वकाळ संतसंगतीत राहिल्यास कधी ना कधी तरी कृपा होतेच आणि तो महामुर्ख सुध्दा ज्ञनी होतो. **चोरांच्या संगती । सज्जनांचा घात ।। सोसेना अघात। संगतीचा ।।४।।** वाईटपणात प्रचंड ताकद असते. आयुष्यभर चांगले कर्म केले, खूप चांगुलपणाही कमावला आणि अनावधानाने का होईना पण क्षणभरच वाईटाचा संग लाभला तर एका क्षणात आयुष्यभर कमावलेला चांगुलपणावर पाणी फिरून तो मातीमोल ठरतो आणि पातकांच्या राशीच्या राशी माथी मारल्या जातात. हीरा हा कितीही मौल्यवान असेल तो भंगायला महाकठीण असेल पण वज्राहून कठीण आणि अतिशय मौल्यवान असणारा हीरा जर ढेकणाच्या संगतीत आला तर क्षणात त्याचे पाणी होऊन जाते. त्याचा सर्वनाश होऊन तो मातीमोल होऊन जातो. त्याप्रमाणे साधुलादेखील कुसंगती नडते. याविषयी जगद्गुरु तुकाराम महाराजांनी फार सुंदर भाष्य एका अभंगात केले आहे. ते म्हणतात की, ढेकणाच्या संगे हीरा जो भंगला । कुसंगे नाडल साधु तैसा ।। पुढे कुसंगतीने चांगल्या गोष्टी कशा नासतात हे महाराज आम्हाला अतिशय सोप्या उदाहरणातून सांगतात की, ओढाळाच्या संगतीने सात्विकता नासते, सोन्याला डाग लागला की सोन्याची किंमत कमी होते.

कितीही गोड पक्वान्ने असतील आणि त्यात विषाचा एक थेंब जरी पडला तरी ते पक्वान्न कडु होते एवढेच नाही तर आपल्या जीवाला हानिकारक ठरते एवढा कुसंगतीचा महाभयंकर परिणाम होतो. शेवटी महाराज आपल्याला उपदेश करतात की, बाबांनो सत्संग किंवा संतसंग केव्हाही चांगला जशी कुसंगतीत सर्वनाश करण्याची ताकद असते, तशी सत्संगतीतही आपला उध्दार करण्याची प्रचंड ताकद असते. कुसंगती चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यात अडकवते तर सुसंगती, सत्संगती किंवा संतसंगती चौऱ्यांशी लक्ष योनीच्या फेऱ्यातून मुक्त करते. माणूस कितीही चांगला सज्जन असला तरी त्याला चांगल्याचा सहवास लाभला तरच त्याच्या आयुष्याचं सोनं होतं. पण जर दुर्दैवाने चोरांची संगती लाभली तर तीचा फायदा होईल की तोटा होईल हे सांगणे कठीण आहे. पण त्यामुळे एक ना एक दिवस सज्जनांचा घात मात्र निशचितच होतो, हे मात्र खरं आहे आणि आज तर समाजात किती भामटे, दांभिक, चोर मातले आहेत हे आपण चांगलेच जाणता. ते वेगळे सांगण्याची गरज आहे असे वाटत नाही. पावलो पावली अशा लोकांची गर्दी झाली आहे. त्यामुळे हे परब्रह्म परमात्मा पांडुरंगा, विठ्ठला अशांच्या संगतीचा आघात आता सोहवेना रे. आता तुच काही तरी मार्ग दाखव बाबा... **करूनी विचार । साधावी संगती ।। संतांच्या पंगती । श्रेष्ठ जाणा ।।५।।**

मायबापहो, संगती विषयी पांडुरंगालाच साकडे घातले. तेव्हा त्यांनी आम्हाला खडसावून सांगितले की, बाळांनो तुकाराम, रामदास व इतर संतानी सर्व दृष्ट्या संगती विषयी सारासार विचारांनी तुम्हाला जागे केले आहे. आता या साऱ्यांचा विचार करूनच तुम्हाला निर्णय घ्यायचा आहे. संत संगतीतच किंवा सत्संगातच तुमचे खरे कल्याण होईल. संत सहवास घडला तर आपल्यातल्या षडविकारांसह अहंकारचा नाश होईल, आणि मन व बुद्धी स्वच्छ होईल. मग याने काय होईल? तर... याविषयी ह.भ.प. वसंत गडकर महाराजांनी सांगितलेला किस्सा आठवला की... एका घागरीला नऊ छिद्रे आहेत तर त्यात पाणी कसे भराल? छिद्रे बंद करून? पण ती बंदही करता येत नाहीत. मग कसे भरायचे घागरीत पाणी? पाणी भरता येत नाही ना? तर पाणी भरता येते. नऊ छिद्रे असलेली ही घागरच पाण्याने भरलेल्या तलावात ठेवा. आता पाण्यात ठेवलेल्या घागरीतून पाणी बाहेर जाईल का? नाही जाणार. कारण ती घागरच पाण्यात आहे. म्हणजे घागरीच्या आतही आणि बाहेरही पाणीच आहे. मुळात ती घागरच पाण्यात आहे. (क्रमशः)

# विकासाचा चक्रव्यूह निसर्गाला भकास करतोय

पुस्तक परिक्षण
प्रा. वसंत गिरी
भ्र. ९०११२२९२३२




रामदासजी राजेगावकर यांनी आपल्या लेखनीचा आरंभ बालसाहित्यापासून केला. 'विकासाचा चक्रव्यूह' हा त्यांचा लेखसंग्रह पर्यावरणासोबत नाळ जोडणारा आहे. बालसाहित्य निर्मितीनंतर त्यांनी अत्यंत गंभीर विषयाला हात घातला, त्यातून 'विकासाचा चक्रव्यूह' उदयास आला. सर्व जीवसृष्टीला न्याय देण्याचे कार्य अव्याहतपणे निसर्ग करीत आला आहे. सर्वांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे कार्यही निसर्गानेच हजारो वर्षापासून केले आहे. बदल्यात कालप्रवाहात मानवाच्या गरजाही बदलत गेल्या आणि त्या वाढतही गेल्या. त्यातील काही गरजा तर उद्योजक नावाच्या हावरट माणसाने आपल्या स्वार्थासाठी अकारण वाढविल्या आहेत. त्यात त्या साखळीत असणारे सर्व घटक अंतर्भूत आहेत. स्वार्थी आणि अविचारी राजकारणी तर सर्वात आघाडीवर आहेत.

भविष्याचा वेध घेवून येणारे संकट टाळण्याऐवजी माया गोळा करण्यासाठी सर्व जीवसृष्टीचे भवितव्य अंधकारमय करणाऱ्या या महत्वाकांक्षी राक्षसांना कोण थांबवणार? याची चिंता लेखकाला आहे. शास्त्रज्ञांनी केलेले संशोधन मानवी हितासाठी आहे पण याचा अर्थ निसर्ग ओरबडून खाण्याचा परवाना आम्हाला मिळाला आहे, असा मुळीच होत नाही. लेखकाचे या विषयावरील चिंतन खूप सखोल आहे. अनेक ज्वलंत प्रश्नाचा मागोवा लेखकांनी या ग्रंथात घेतला आहे. वाळूच्या होणाऱ्या उपशामुळे नद्यांचे पाणी किती प्रमाणात दूषित होत आहे. एकेकाळी लोक नदीकाठी वसाहत करुन राहत होते. नदीचे पाणी माणसांना पिण्यास योग्य होते. आता जनावरेही त्या पाण्यामुळे आजारी पडत आहेत. भविष्यात याचे होणारे परिणाम अत्यंत गंभीर आहेत. हा सूचक इशारा लेखकांनी दिला आहे. सतत पिके घेवून आणि रासायनिक खतांचा वापर करुन जमिनीतील कस कमी करणे हा भूमिवर होणारा अन्याय आहे. त्यामुळे भविष्यात नापिकी होऊ शकते याचा विचार करण्यासाठी मनुष्याला उसंत नाही. त्याची त्याला गरज वाटत नाही. केवळ धावत सुटणाऱ्या या अविचारी लेकरांना मातृभूमिने का वाचवावे? हा प्रश्न लेखकास पडला आहे. लोकसंख्येचा वाढत जाणारा विस्फोट तर भविष्यात प्रचंड प्रश्न घेवून समोर येणार आहे. वाढती लोकसंख्या प्रचंड प्रमाणात जंगलतोड करत आहे. अविचाराने होणारा भूगर्भातील सर्व संपत्तीचा वापर, वन्यप्राण्यांची होणारी उपासमार, त्यातून काही जैविकसाखळ्या नष्ट होत आहेत. वर्तमान स्थितीत ऐहिक सुखामागे धावणारे लोक शेखचिल्लीची भूमिका पार पाडत आहेत. दैववादी प्रवृती आणि अति हावरटपणा करुन निसर्गाचे शोषन करणारे दोन पायाचे पशू हिस्त्र प्राण्यापेक्षाही भंयकर आहेत. हे लेखकाचे आग्रही मत आहे आणि ते एक कटूसत्य आहे. पर्यावरणाचे आणि पारंपारिक संस्कृतीचे जतन करुन आपल्याला जुन्यातले सोने शोधता येईल आणि ते जीवंत ठेवता येईल. त्यातून आपल्याला मानवीय हीतसंबध जोपासता येईल. संस्कार आणि संस्कृती संवर्धनासाठी हे करणे त्यांना गरजेचे वाटते. लग्न जुळविणे ही एकविसाव्या शतकातील भिषन समस्या आहे. मुलामुलींचे निर्माण झालेले विषम प्रमाण आणि याशिवाय व्यक्तीस्वातंत्र्य व विचार स्वातंत्र्याच्या अतिरेकामुळे त्यांच्या विविहाचा निर्णय घेण्यास पालक असमर्थ ठरत आहेत. पाश्चात्य जीवनशैलीचे अनुकरण आपली विवाहसंस्था उध्वस्त करीत आहे. भविष्यात आपल्या कुटुंब व्यवस्थेवर त्याचे होणारे दुष्परिणाम अत्यंत भिषन आहेत. या संदर्भाने लेखकाने सखोल चिंतन केले आहे. शेतीच्या वाटण्या होत असल्यामुळे होणारे शेतीचे विभाजन आणि तुकडीकरणामुळे शेतीत मोठी गुंतवणूक करणे कठीण होत आहे. दळणवळण मार्ग वाढवत असतांना पर्यावरणाचे व पशूपक्षांच्या खाद्यान्नाचे प्रश्न भिषन होत आहेत. तात्कालिक गरज भागविण्यासाठी नष्ट न होणारे पर्यावरण विरोधी उत्पादन वाढवून जीवसृष्टीस धोके वाढविण्याचे काम उत्पादक करत आहेत. युवकातील व्यसनाधिनता व आपले भविष्य उध्वस्त करणारे आंतरजालातील खेळ तरुणाई उध्वस्त करत आहेत. प्रसार माध्यमातील हिंसाचार, अंगप्रदर्शन, अश्लीलता व व्यभिचाराला प्रोत्साहन देणाऱ्या घटनांनी लेखकाचे मन हेलाऊन जाते. पर्यावरणाचे रक्षण व जीवसृष्टीचे कल्याण हा हेतू लेखकास खूप महत्वाचा वाटतो. त्यावर आपले भवितव्य अवलंबून हा सूचक इशारा त्यांना 'विकासाच्या चक्रव्यूहा' मधून द्यायचा आहे. लेखक रामदास राजेगावकर यांनी भविष्याचा वेध घेवून जनहितार्थ केलेली ग्रंथनिर्मिती संग्रही ठेवावी आणि तिचा आनंद घ्यावा अशी आहे. त्यांच्या पुढील लेखनप्रवासास शुभेच्छा!

**पुस्तकाचे नाव** - विकासाचा चक्रव्यूह
**प्रकाशक**- अक्षरशिल्प प्रकाशन, अमरावती.
**लेखक**- रामदास राजेगावकर, मेहकर, जि. बुलडाणा. ९४२०२३३०३२

**अलिकडेच केंद्र आणि राज्य पातळीवर जाहीर झालेली कृषीविषयक धोरणे व्यापाराची दिशा बदलण्याची शक्यता समोर मांडतात. हल्ली पावसाचेही गणित बदलत आहे. दुसरीकडे जागतिक बाजारपेठांमध्ये नवनवीन प्रवाह बघायला मिळत आहेत. या सगळ्याचे शास्त्रशुद्ध संशोधन आणि अभ्यास करून आपल्या आयातनिर्यात धोरणात योग्य ते बदल केल्यास देश अधिक वेगाने विकासवाटांवर धावू शकतो, यात शंका नाही.**

# विकासावाटेवर आणण्यासाठी...



लक्ष्यवेधी
वरुण भालेराव
प्रसिद्ध शास्त्रज्ञ

या वर्षी राज्य तसेच देशस्तरावर शेतीच्या बाबतीत दोन मोठ्या घोषणा करण्यात आल्या आहेत. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी पाहिलेले नदीजोड प्रकल्पाचे स्वप्न मुख्यमंत्री फडणवीस यांनी महाराष्ट्रात साकार करणार असल्याची घोषणा केली. दुसरीकडे केंद्रीय अर्थसंकल्पानंतर पंतप्रधान मोदी यांनी प्रथमच शेती समृद्ध करण्याचा विडा उचलला आहे. या वर्षी कधी नव्हे ते महाराष्ट्रात फेब्रुवारी महिन्यामध्ये शहरे तसेच खेड्यांमध्ये पाणीटंचाई जाणवू लागली आहे.

राज्यात अलिकडे शेतीच्या पाण्यासाठी बोअरवेल घेण्याकडे कल वाढला आहे. परंतु, तेदेखील आताच कोरडे पडू लागले आहेत. म्हणून शेतकऱ्यांनी उपाय शोधला असून ते आता सरकारी अनुदानाची वाट न पाहता स्वखर्चाने ठिबक सिंचन यंत्रणा बसवण्यास प्राधान्य देत आहेत. यापूर्वी ऊसशेतीसाठी कधीही या पद्धतीचा वापर झाला नव्हता. गेली ३५ वर्षे महाराष्ट्र सरकार ठिबक सिंचन प्रकल्पांसाठी भरपूर अनुदान देत असून ऊस घेणाऱ्या शेतकऱ्यांनी याचा वापर केला नव्हता. परंतु या वर्षी मात्र ठिबक सिंचनाच्या वापरासाठी ऊस पिकवणारे शेतकरी धडपडत असल्याचे चित्र महाराष्ट्राच्या दृष्टीने खूपच आशादायी म्हणावे लागेल. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी इतक्या वर्षांनंतर नदीजोड प्रकल्पाचा ध्यास का घेतला असावा, याचे सरळसोपे कारण असे आहे की, गेल्या ३५ वर्षांमध्ये राज्याची सिंचनक्षमता केवळ दोन टक्क्यांनी वाढली आहे.

शेती समृद्ध करायची असल्यास पाण्याखेरीज गत्यंतर नाही, हे फडणवीस साहेबांनी ओळखलेले दिसते. यापूर्वी राज्यात बरीच धरणे बांधून झाली आहेत. पण त्याचे जलस्रोत अपुरे पडू लागल्यामुळे अलिकडे दोन प्रकारच्या कल्पना पुढे आल्या होत्या. पहिली कल्पना घाटमाथ्यावरून कोकणाकडे अर्थात समुद्राकडे वाहून जाणारे पाणी पूर्वेकडे वळवण्याची होती. परंतु, ती अत्यंत खर्चिक असल्यामुळे अनेक वर्ष ऊहापोह होऊनही कोणतेही सरकार त्यावर कार्यवाही करू शकलेले नाही. नदीजोड प्रकल्प त्यातल्या त्यात सोपा आणि कमी खर्चाचा असल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी कारभाराची सूत्रे हाती घेतल्यानंतर लगेचच कोणीही मागणी केली नसताना पुढाकार घेऊन राज्य हा प्रकल्प राबविणार असल्याची घोषणा केली. ती अत्यंत स्वागतार्ह म्हणावी लागेल.

पंतप्रधान मोदी यांनी यावर्षी आपला ११ वा अर्थसंकल्प सादर केला आणि त्यामध्ये इतर घटकांप्रमाणे शेतीलाही महत्त्व दिल्याचे दिसले. भारतामध्ये पाण्याखालील शेतीचे क्षेत्र ३४ टक्के आहे. वाजपेयी यांच्या स्वप्नाप्रमाणे हेच क्षेत्र नदीजोड प्रकल्पाद्वारे ५० टक्क्यांपर्यंत जाऊ शकते. अर्थात आता पंतप्रधानांनी नदीजोड प्रकल्पाची घोषणा केलेली नाही. परंतु शेती समृद्ध करणार असल्याचे ठाम आणि ठोसपणे सांगितले आहे. अर्थात पाण्याखेरीज शेती समृद्ध होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांच्या मनात कोणत्या कल्पना दडल्या आहेत, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

येत्या काळात याबाबत स्पष्टता येण्याची आशा आहे. अर्थात यासंदर्भात त्यांनी एक चांगली घोषणा केली. ती शेतीमालाच्या निर्यात धोरणाविषयी फेरबदलाची आहे. इथे आपण कांद्याचे उदाहरण घेऊ. सर्वसामान्य शेतकरी पैशासाठी हे पीक मोठ्या प्रमाणावर घेतो. राज्यातील निवडणुकीच्या काळात कांद्याची निर्यात खुली केली गेली. त्यामुळे अनेक शेतकरी मालामाल झाले. अगदी कोरडवाहू क्षेत्रातील शेतकऱ्यांनीही मोटरगाड्या विकत घेतल्या. याचा अर्थ निर्यात धोरणामध्ये काही तरी चुकीचे आहे, हे पंतप्रधानांना पटले असावे.

आपण सुमारे एक लाख कोटी रुपयांचे खाद्यतेल आयात करतो. मागील अर्थसंकल्पामध्ये डाळी आणि तेलबियांचे उत्पन्न वाढविण्यासाठी अर्थमंत्र्यांनी बऱ्याच प्रोत्साहनात्मक तरतुदी जाहीर केल्या होत्या. परंतु, अपेक्षित परिणाम दिसला नाही. याचे कारण देशात पिके शकणारे शेतीमालाचे २०० प्रकार बाहेरच्या देशांमधून आयात करत आहोत. म्हणजेच स्वातंत्र्य मिळाल्यापासून आजपावेतो शेतीमालाबाबतचे आपले आयात- निर्यातीचे धोरण परंपरागत पद्धतीचे राहिले आहे. आता याची जाणीव पंतप्रधानांना झाली आहे. महाराष्ट्र देशामध्ये फलोत्पादन आणि दूध क्षेत्रामध्ये प्रथम क्रमांकाचा प्रांत आहे. महत्त्वाचे म्हणजे ही क्रांती लहान लहान शेतकऱ्यांनी केली आहे. पण या बाबतीत कोकणच्या शेतकऱ्यांकडे अपेक्षित लक्ष दिले गेले नसल्यामुळे मलेशिया, इंडोनेशिया येथे सहज येणारा तेल्यामाड कोकणातही येऊ शकतो आणि आपली याबाबतची आयात थांबवून एक लाख कोटी वाचवू शकतो, याकडे कदाचित भविष्यात केंद्र तसेच राज्य सरकारचे लक्ष जाईल अशी अपेक्षा आहे.

आपल्या तीनही बाजूंची समुद्रकिनारपट्टी तेल्यामाड उत्पादकाला पोषक असताना उत्पादन न वाढवता आपण आयात सुरू ठेवली. मात्र आता केंद्र शासनाच्या लक्षात आल्याने यावर इलाज केला जाण्याची चिन्हे दिसत आहेत. इस्रायलने वालुकामय उष्ण प्रदेश आणि पाण्याची टंचाई असूनही शेतीक्षेत्रात क्रांती करून जगातील सर्व बाजारपेठांमध्ये शेतीमाल पाठवून आपल्या देशाला अत्यंत महत्त्वाचे परकीय चलन मिळवून दिले. त्याचप्रमाणे भारतही विचार करण्याची अपेक्षा आहे. कारण इस्रायल हा देश आपल्याकडील दोन जिल्ह्यांएवढा असला, तरी शेतीक्षेत्रातील योग्य निर्यात धोरण अवलंबून, अभ्यास करून, मालाची टंचाई असणाऱ्या ठिकाणी तो माल पोहोचवून शेती समृद्ध करू शकतो तर तेच मॉडेल किंवा त्यापेक्षा वेगळे आयात-निर्यात धोरण अवलंबून पंतप्रधानांना शेती समृद्ध करण्यासाठी मार्ग अवलंबावे लागतील.

इस्रायलप्रमाणेच नेदरलँडआणि न्यूझीलंड या देशांनी दूधक्षेत्रातील निर्यातीमध्ये कमालीची उंची गाठली आहे. आपण अजूनही नेदरलँडकडून दुधाच्या भुकटीची आयात करतो. याचा अर्थ आपल्या दुग्धक्षेत्र आणि निर्यातीमध्ये समन्वय नाही. त्यामुळेच दुग्धक्षेत्रासाठी नवीन निर्यात धोरण आखणे गरजेचे वाटते. आपल्या जवळची असणारी युरोपियन बाजारपेठ फळांच्या क्षेत्रात दक्षिण अमेरिकेतील ब्राझीलने इतक्या लांबवरून काबीज केली आहे. त्यामुळेच महाराष्ट्र फळ उत्पादनात अग्रेसर असेल तर राज्य तसेच केंद्र सरकारला युरोप आणि आखाती देशातील बाजारपेठांचा विचार करून ब्राझीलशी स्पर्धा करणे शक्य आहे. ही बाजारपेठ मिळवण्यासाठी आक्रमक धोरण आखले तर बराच पुढचा टप्पा गाठणे शक्य होईल. सध्या युरोप आणि आखाती देशांमध्ये ऑर्गेनिक फूडला प्रचंड मागणी आहे.

महाराष्ट्रातील शेतीचे ८१ टक्के क्षेत्र पावसाच्या पाण्याखाली आहे. तेथील शेतकरी उत्पादनामध्ये कोणतेही रासायनिक खत वा औषधे वापरत नाहीत. युरोपच्या कोणत्याही प्रयोगशाळेत ही उत्पादने तपासली गेली तर त्यात काहीही वावगे आढळणार नाही. पण या बाबतीतही आपण कोणतेही धोरण आखले नाही वा विचारही केलेला नाही. युरोप आणि आखाती देश ९५ टक्के मांसाहारी आहेत. आज त्यांना ऑर्गेनिक मांसाची गरज आहे. त्यामुळेच आपण धनगर समाजाच्या साह्याने सर्व कसोट्यांवर खरे उतरून ही गरज पूर्ण करू शकतो. केंद्र शासनाच्या भावी निर्यात धोरणात याचाही विचार व्हायला हवा.

आपण देशाचा विचार न करता निर्यातीच्या दृष्टिकोनातून केवळ राज्याचा विचार केला तर काही उत्पादने निश्चितपणे ऑर्गेनिक म्हणून जाहिरात तंत्रज्ञान वापरून, ब्रँड तयार करून जगाच्या बाजारपेठेत लोकप्रिय करू शकतो. विदर्भ, मराठवाडा, खानदेशमध्ये पिकणारा कापूस हे त्यातील महत्त्वाचे उत्पादन ठरू शकेल. कारण कपड्यांच्या क्षेत्रातही ऑर्गेनिक कपडे वापरण्यातील उपयुक्तता परदेशी लोकांना पटली आहे.

आजमितीला आपल्या वस्त्रोद्योगाची निर्यात नगण्य आहे. त्यामुळेच ऑर्गेनिक कापूस आणि वस्त्रोद्योग हातात हात घालून निर्यातीसाठी बाहेर पडल्यास विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश हे भाग इस्रायलच्या शेतीप्रमाणे चमकू लागतील यात शंका नाही. त्याचप्रमाणे आपला मांस उद्योग आणि जनावरांची अफाट संख्या याचा मेळ घालून या उद्योगाला प्रेरणा दिली गेली तर भाकड जनावरे पाळण्याची वेळ कमी होऊन शेतकरी जनावरे धष्टपुष्ट करण्याकडे लक्ष वळवतील आणि या क्षेत्रातही क्रांती घडवून आणू शकतील. एकूणच आपण अन्न प्रक्रिया उद्योगामध्ये खूप कमी गुंतवणूक केली आहे. आपले तंत्रज्ञान जगाच्या मानाने बरेच मागास आहे. या क्षेत्रातही आमूलाग्र बदल करण्याची गरज आहे.

# तुझी-माझी धाव आहे ब्रिफकेसकडून बॅकपॅककडे!

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

या १९८० च्या दशकापर्यंत जगभरात कॅनव्हासचे साधे बूट किंवा शूज मिळत नव्हते, असे नव्हे. पण असा एक अलिखित नियम होता की, कॅनव्हासचे शूज कोणताही खेळ खेळताना, धावण्याचा सराव करताना, कवायत करताना वापरायचे. ते साधारणपणे पांढरेशुभ्र असायचे नि ते तसे ठेवले जातील, राहतील. याची काळजी खेळाडू, प्रशिक्षक, शिक्षक, विद्यार्थी, पालक असे सगळेच संबंधित लोक घ्यायचे. शाळेच्या पी.टी.च्या गणवेश परीक्षणात पायातले शूज पांढरेशुभ्र नसतील तर रांगेतून बाहेर काढून फटके दिले जात असत.

साधारण १९८५-९० या काळात या कॅनव्हासच्या शूजचा एकदम भाग्योदय झाला. त्यांना 'कॅनव्हास शूज' म्हणणारे लोक एकदम गावंढळ ठरले आणि 'स्निकर्स' म्हणणारे लोक एकदम फैनाबाज ठरले. याला कारण ठरल्या खेळाचे सामान बनवणाऱ्या दोन अग्रगण्य कंपन्याआदिदास आणि नाईकी.यापैकी नाईकीही जगातली सर्वात मोठी क्रीडा साहित्य उत्पादन कंपनी आहे. ती अमेरिकन आहे. एन-आय-के-ई याचा उच्चार खरे तर 'नाईक' असा झाला पाहिजे. पण तो 'नाईकी' असा केला जातो. का?तर म्हणे, नाईकी ही ग्रीक पुराण कथांमधली विजयाची देवता आहे. 'आदिदास' हे नाव आपल्याला संस्कृत वाटू शकेल, पण तसे काही नाही. ॲडॉल्फ डेसलर आणि त्याचा भाऊ रुडॉल्फ डेसलर यांनी 'गेब्रूडर डेसलर शूर्फब्रिक' या नावाने जर्मनीत क्रीडासाहित्य उत्पादन कंपनी सुरू केली. पुढे रुडॉल्फ वेगळा झाला. ॲडॉल्फ डेसलरने स्वतःच्याच नावाचे लघुरूप करुन 'आदिदास' हे नाव घेतले. आज नाईकीपाठोपाठआदिदास ही जगातली क्रमांक दोनची क्रीडासाहित्य उत्पादन कंपनी आहे. वेगळा झालेल्या रुडॉल्फ डेसलेरने आपली 'प्युमा' ही वेगळी कंपनी काढली. क्रीडा क्षेत्रात 'प्युमा' हेही आज एक मोठे नाव आहे. चामड्याचे जोडे किंवा बूट हे आवाज करतात. किंबहुना बायकांच्या बुटांनी टाक-टुक, टाक-टुक असा नाजूक आवाज; तर पुरुषांच्या बुटांनी खाड्-खाड् असा मर्दानी आवाज केलाच पाहिजे. त्या आवाजांमधूनसुद्धा ऐकणाऱ्यांच्या कानांपर्यंतमनांपर्यंत काही संदेश पोहोचत असता. इथे थोडे विषयांतर करून एक सुंदर आठवण सांगतो.

विजयादशमीला सर्वत्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संचलने निघतात. मुंबईतल्या अशाच एका संचलनानंतरच्या उत्सवात, संघाचे तत्कालीन सरकार्यवाह हो.वै. शेषाद्रीजी हे प्रमुख वक्ता होते. संघ स्वयंसेवकाच्या प्रत्येक हालचालीतूनसुद्धा काहीतरी संदेश जात असतो, हे सांगताना शेषाद्रीजी म्हणाले, 'संचलनात चालताना बुटाची टाच जोरात आपटली पाहिजे. असो.



तर चामड्याचे बूट आवाज करतात, पण कॅनव्हासचे शूज अजिबात आवाज करीत नाहीत. कारण त्यांचे तळवे रबरी असतात. 'टु स्नीक' म्हणजे आवाज न करता हालचाली करणे, अशा अर्थाने या कॅनव्हास शूजना 'स्निकर्स' असा शब्द अमेरिकन बोलीभाषेत-स्लँगमध्ये प्रचलित होताच. अमेरिकन नाईकी कंपनीने १९८५-९० च्या सुमारास नव्या पद्धतीचे कॅनव्हास शूज बाजारात आणले आणि त्यांना नाव दिले 'स्निकर्स. यांच्या बांधणीत नवीन काय होते? तर वाजवीपेक्षा मोठा रबरी तळवा आणि वाजवीपेक्षा फारच मोठा बाह्य आकार; आतला पावलाचा आकार मात्र यथायोग्य. कोकणात अनेक ठिकाणी वेताळ, वेतोबा, मूळपुरुष, राखण्या अशा ग्रामदेवांची मंदिरे आहेत. या देवांना दरवर्षी ठरावीक दिवशी भल्यामोठ्या चामड्याच्या चपला दिल्या जातात. या चपला पायात घालून देव रात्री गावात फिरतो आणि गावाचे रक्षण करतो, अशी समजूत आहे. वर्षभरात चपला झिजलेल्या आढळतात. असो.तर माझा एक खेळाडू मित्र एकदा हे वाजवीपेक्षा भलेमोठे दिसणारे स्निकर्स घालून आमच्या घरी आला. तेव्हा माझी आजी हसत हसत त्याला म्हणाली, 'हे तुझे बूट की वेताळाचे?' पण लोकांना ही फॅशन आवडली. मग काय, बघता- बघता नाईकीसह आदिदास, प्युमा आणि सगळ्याच गावगन्ना शूज उत्पादकांनी स्निकर्सच्या विविध प्रकारांनी बाजार गजबजून टाकला. खेळताना किंवा कॅज्युअल वेअर म्हणूनच कॅनव्हास शूज वापरायचे आणि ऑफिसमध्ये जाताना मात्र कटाक्षाने चामडी बूटच घालायचे, असा जो अलिखित संकेत पूर्वी होता, तो आता पूर्णपणे बदलला आहे. मोठेमोठे बिझनेस एक्झिक्युटिव्ह किंवा सरकारी अंमलदारसुद्धा बेधडक स्निकर्स वापरतात. अगदी हाच प्रकार ब्रीफकेसच्या बाबतीत झाला आहे. पूर्वी विद्यार्थी शाळेच्या वह्या-पुस्तके ठेवण्यासाठी दोन्ही खांद्यावर येणारे बंद म्हणजे हँडल असलेली दफ्तरे वापरत. श्रमिक लोक कामावर जाताना डबा ठेवण्यासाठी चक्क कापडी पांढऱ्या पिशव्या वापरत; तर पांढरपेशे लोक डबा आणि थोडेफार इतर साहित्य नेण्यासाठी दोन बंदवाल्या चामडी किंवा रेक्झिनच्या छोट्या बॅगा वापरत. या बॅगा हातात धरल्या जात किंवा बंद खांद्याला अडकवून बगलेत धरल्या जात. त्या पुढचा टप्पा म्हणजे ब्रीफकेस. ऐटबाज ब्रीफकेस घेऊन ऑफिसला जाणारा इसम हा कुणीतरी अंमलदार असलाच पाहिजे, असे लोक समजत. मग फॅशन आली एका खांद्यावर किंवा क्रॉस पट्टा अडकवायच्या काळ्या कुळकुळीत चामडी किंवा रेक्झिन बॅगची.

साधारण १९९०-२००० च्या दशकातली तरुण पोरे अशा बॅगांमधून त्यावेळचा वजनाला जड असा लॅपटॉप घेऊन हिंडायची आणि आपणच बिल गेट्स किंवा स्टीव्ह जॉब्स आहोत, असा फुकट रुबाब मारायची. पण यापेक्षा वेगळ्या प्रकारची बॅग कुणी ऑफिसला आणणे, हे फारच गावंढळ समजले जात असे. जग सतत बदलतच असते. पिट्टू किंवा हॅवरसॅक यांना बॅकपॅक ही सामान पिशवी एकेकाळी हायकिंग-ट्रेकिंग करणारे आणि सैनिकच वापरायचे. तीच बॅकपॅक थैली आज इतकी लोकप्रिय ठरली आहे की, सर्व व्यवसायांमधले साहेबापासून शिपायापर्यंत सर्व लोक सर्रास बॅकपॅक वापरू लागले आहेत. लोकांच्या आवडीचा हा बदलता कल पाहून 'दिओर', 'शॅनेल', 'सेंट लॉरेंट', 'मिस्टरी रँच' अशा मोठमोठ्या डिझायनर कापडविक्या कंपन्या विविध प्रकारचे आकर्षक, टिकाऊ बॅकपॅक बनवत आहेत. तुम्हाला आश्चर्य वाटेल की, गेल्या दोन वर्षांपासून युद्धमान स्थितीत असलेल्या युक्रेन देशातली 'पॅकोलॅब' ही कंपनी सध्या सर्वाधिक लोकप्रिय आहे. तिने बनवलेला बॅकपॅक सध्या साधारण ४०० डॉलर्सना विकला जात आहे. केदारनाथ हे देवस्थान उत्तराखंड राज्याच्या गढवाल भागात मंदाकिनी नदीच्या तीरावर बसलेले अत्यंत प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. ते सुमारे ११ हजार फूट उंचावर आहे. संपूर्ण देशभरातून सर्व वयोगटांतले स्त्री- पुरुष यात्रेकरू तिथे येत असतात. ज्यांना चालणे- चढणे शक्य नाही, त्यांच्यासाठी दोन सोयी आहेत. पहिली म्हणजे घोडा. पण अनेकांना घोड्यावर बसायची भीती वाटते. त्यांच्यासाठी दुसरा पर्याय म्हणजे पिट्टू. एक माणूस बूडआणि पाठ टेकवून बसू शकेल, एवढी मजबूत गवती करंडी किंवा टोपली असते. तिला दोन बाजूंना बंद असतात. यात्रेकरू त्या करंडीत बसतो. त्याला वाहून नेणारा माणूस करंडीचे बंद आपल्या दोन्ही खांद्यांवर अडकवतो आणि डोंगर चढू लागतो.



थोडक्यात, पाढुंगळी बसण्याचाच प्रकार, पण बसणाऱ्याने चालणाऱ्याची कंबर दोन्ही पायांनी धरायची आणि हातांनी त्याचे खांदे धरायचे, हे जास्त दमछाक करणारे असते.शिवाय महिला यात्रेकरूंना अशारीतीने हमालाच्या पाढुंगळी बसायला फारच संकोच वाटतो. त्यासाठी करंड्याची योजना एकदम छान. यालाच म्हणतात पिट्टू. कदाचित गढवाली भाषेत, पाढुंगळी घेणे, यालाच पिट्टू असे म्हणत असतील. हा प्रकार इंग्रजी ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांना इतका आवडला की, सैनिकांच्या पाठीवरच्या सामानाच्या थैल्यांना सर्रास 'पिट्टू' हाच शब्द रूढ झाला. नंतर त्यांना पिट्टूबरोबरच हॅवरसॅक किंवा नुसतेच सॅक म्हणू लागले. १९८० च्या दशकात महाराष्ट्रात गिर्यारोहण आणि गडकिल्ल्यांचे पदभ्रमण हा छंद झपाट्याने वाढू लागला. यात खूप मोठा वाटा होता दुर्गभ्रमण छंदाचे पितामह म्हणता येईल अशा गोपाळ नीळकंठ उर्फ अप्पासाहेब दांडेकरांचा.

गोनीदांच्या शिवदुर्ग पदभ्रमण मोहिमांनी आणि त्या मोहिमांच्या रसाळ वृत्तांत लेखांनी भारावलेली खूप तरुण मुले प्रथम सह्याद्रीत आणि मग हिमालयात पदभ्रमण करू लागली. आता पदभ्रमण म्हटले की, थोडेफार सामान बरोबर हवेच. मग त्यासाठी पाठीवर मजबूत पिट्टू किंवा हॅवरसॅक हवेच. सामानाचा भार पाठीवर आणि कमरेवर गेला की, दोन्ही हात मोकळे. मला आठवतेय की, पुण्याच्या जुन्या बाजारात भारतीय सैन्याच्या रद्दीत काढून टाकलेल्या हॅवरसॅक यायच्या. तशाच दिल्लीच्या चांदणी चौकातल्या बाजारात भारतीय लष्कराच्या नि क्वचित अमेरिकन सैन्याच्यासुद्धा रद्दीत काढलेल्या हॅवरसॅक मिळायच्या. आम्ही ट्रेकर मित्र त्या मिळविण्यासाठी जीव टाकायचो. गर्द शेवाळी रंगाच्या त्या लष्करी हॅवरसॅक पाठीवर टाकून शिवरायांचे गड चढताना आम्हाला, आम्ही पण कुणीतरी शूर लष्करी जवान आहोत, असे वाटायचे. ट्रेकर्स आणि सैनिकांपुरताच वापर असणारे ते पिट्टू, त्या हॅवरसॅक किंवा ते बॅकपॅक आज लेटेस्ट फॅशन बनले आहेत. शाळा-कॉलेजच्या विद्यार्थ्यांपासून ते बिझनेस एक्झिक्युटिव्ह ते उच्च अंमलदारापर्यंत सर्व लोक सर्रास बॅकपॅक वापरत आहेत. मोठमोठ्या डिझायनर कंपन्या ते बॅकपॅक अधिक सोयीस्कर, अधिक शोभिवंत कसे दिसतील, यासाठी कल्पना लढवत आहेत. लोकांना आश्चर्य वाटत आहे की, सामानाचे सगळे वजन पाठीवर आणि कमरेवर टाकून, हात मोकळे ठेवणारी ही पिशवी, आम्हाला यापूर्वीच का नाही मिळाली? उगाच आम्ही त्या ब्रिफकेसी हातात वागवायचो! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)